कुंभमेळा हा १२ वर्षांनी भरतो आणि हा कुंभमेळा हिंदू संस्कृतीतील साधुसंतांचा सर्वात मोठा उत्साहपूर्ण मेळावा असतो. कुंभमेळा ही परंपरा खूप प्राचीन आहे. भारतामध्ये प्रयागराज, नाशिक, उज्जैन, हरिद्वार या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो. कुंभमेळा हा नदीच्या काठावर होत असतो. या धार्मिक उत्सवात लाखो भाविक पवित्र नदीच्या काठावर एकत्र जमतात व पवित्र स्नान करतात. या स्नानामुळे पापांचे नाश होऊन मोक्ष प्राप्ती होते अशी श्रद्धा आहे. कुंभमेळ्याचे तीन प्रकार पडतात- अर्धकुंभ, पूर्ण कुंभ आणि महाकुंभ. दर सहा वर्षांनी भरतो त्याला अर्धकुंभ म्हणतात, दर बारा वर्षांनी भरतो त्याला पूर्ण कुंभ तर दर १४४ वर्षांनी भरतो त्याला महाकुंभ असे म्हणतात. २०२५ मध्ये उत्तर प्रदेशमधील प्रयागराज येथे महाकुंभ मेळावा पार पडला. या ठिकाणी गंगा, यमुना आणि सरस्वती असा त्रिवेणी संगम आहे. यामध्ये सरस्वती नदी ही लुप्त होते. ती कोणालाही दिसत नाही. ती भूगर्भातून वाहते. महाकुंभ मेळा हा हिंदू धर्मातील सर्वात मोठा धार्मिक मेळा आहे. कुंभमेळ्यात भारताच्या प्रत्येक भागातून लाखोंच्या संख्येने



लोक या ठिकाणी येतात. यामुळे आपल्याला भारतीय संस्कृतीचे दर्शन होते.

**भारतीय संस्कृती :**

कुंभमेळा हा केवळ धार्मिक उत्सव नसून तो भारतीय संस्कृती आणि परंपरेचा एक महत्त्वाचा भाग आहे. हा मेळा पापक्षालणासाठी आणि मोक्षप्राप्तीसाठी महत्त्वाचा मानला जातो. अनेक तरूण कुंभमेळ्यात संन्यास घेतात. ते आपल्या जीवनातील सर्व सुखसोयींचा त्याग करतात व महादेवाच्या सेवेत रुजू होतात. अनेक साधू नग्नावस्थेत या मेळ्यात सामील होतात. ते वस्त्राचा त्याग करतात, अन्नाचा त्याग करतात व शमशान तपस्या, अंगाला राख लावून ते महादेवाचे ध्यान करतात.

**कुंभमेळ्यातील स्नान :**

कुंभमेळ्यातील शाही स्नानाला विशेष महत्त्व आहे. या स्नानात विविध आखाड्यातील साधू सहभागी होतात. या आखाड्यातील साधूंची शोभायात्रा निघते. हे साधू वर्षानुवर्षे दुर्मिळ ठिकाणी तपस्या करतात. ते आपल्याला फक्त कुंभमेळ्यातच पहायला मिळतात. हे साधू आपला सर्व मोह त्याग करतात. या पवित्र स्नानाने सर्व पापं धुतली जातात अशी भाविकांची श्रद्धा आहे.

**साधुसंतांचे महत्त्व :**

कुंभमेळ्यात साधुसंतांना विशेष महत्त्व असते. ते आपल्या ज्ञानाचे व अनुभवाचे भाविकांना मार्गदर्शन करतात आणि भाविकांना दर्शन देतात.

**सामाजिक महत्त्व :**

कुंभमेळा हा सामाजिक समरसतेचा एक उत्साह आहे. या उत्सवात विविध जाती, धर्माचे लोक एकत्र येतात, एकमेकांशी संवाद साधतात. यामध्ये सामाजिक एकता दिसून येते. या मेळ्यात भाविकांना नैसर्गिक महत्त्व सांगितले जाते. नदीची स्वच्छता, पर्यावरणाचे रक्षण यावर भर दिला जातो.

**आध्यात्मिकता :**

कुंभमेळ्यात लाखो भाविक भक्ती व मोक्षप्राप्ती या हेतूने एकत्र येतात. हे आध्यात्मिकतेचे प्रतीक आहे. या उत्सवात भाविक त्यांच्या पापांचे प्रायश्चित करण्यासाठी आणि मोक्ष मिळविण्यासाठी एकत्र येतात. काही साधू आपल्या जीवनाचा त्याग करून पिंडदान करतात. आपल्याला भारतातील विविधता व सांस्कृतिक, भाषिक, अन्न, वेशभुषा, भाषा यामध्ये असलेली विविधता या कुंभमेळ्यात बघायला मिळते.

# स्वामी दयानंद सरस्वती

**टेंकाळे प्रिती चंद्रकांत**
एम.ए.प्रथम वर्ष

स्वामी दयानंद हे एक महान शिक्षणतज्ज्ञ, समाजसुधारक व सांस्कृतिक राष्ट्रवादी देखील होते. ते प्रकाशाचे एक महान सैनिक, देवाच्या जगात एक योद्धा मानव आणि संस्थांचे शिल्पकार होते. दयानंद सरस्वती यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे आर्य समाजाची स्थापना. ज्याने शिक्षण व धर्म क्षेत्रात क्रांती घडवून आणली. स्वामी दयानंद सरस्वती हे अलीकडील काळात भारताने ओळखलेल्या सर्वात महत्त्वाच्या सुधारक व अध्यात्मिक शक्तींपैकी एक आहेत.



दयानंद सरस्वती यांचे तत्त्वज्ञान त्यांच्या 'सत्यार्थ प्रकाश', 'वेद भाष्य भूमिका' आणि 'वेद भाष्य' या तीन प्रसिद्ध योगदानांवरून ओळखले जाते. त्यांच्या संपादीत 'आर्य पत्रिका' या नियतकालीकातही त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब आहे. आर्य समाजाचे महान संकल्पना संस्थापक स्वामी दयानंद हे आधुनिक भारताच्या राजकीय विचारांच्या इतिहासात एक अद्वितीय स्थान व्यापतात. जेव्हा भारतातील सुशिक्षित तरुण युरोपीय संस्कृतीच्या वरवरच्या पैलूंची गुलामगीरीने नक्कल करत होते व भारतीय लोकांच्या प्रतिभा व संस्कृतीकडे दुर्लक्ष करून इंग्लंडच्या राजकीय संस्था भारतीय भूमीत स्थापन करण्यासाठी आंदोलन करत होते, तेव्हा स्वामी दयानंद सरस्वती यांनी पश्चिमेच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय वर्चस्वाविरुद्ध

भारताचा विरोध धाडसाने केला.

स्वामी दयानंद यांचा जन्म १८२४ मध्ये काठीयावाडातील मोरवी राज्यातील टंकारा येथील एका सनातनी ब्राह्मण कुंटुंबात झाला. ते शिवमंदिरात पुजारी म्हणून काम करत. दयानंद यांचे बालपणीचे नाव मुळशंकर होते. त्यांच्या वडीलांच्या प्रेमळ संगोपणाखाली त्यांनी लहानपणापासूनच वेद, संस्कृत, व्याकरण व संस्कृती भाषेत प्रभुत्व मिळवले होते. गौतम जीवनातील चार सामान्य दृष्य पाहून बुद्ध झाले, त्याप्रमाणे एका घटनेनंतर दयानंद यांची जीवनशैली बदलली. चौदा वर्षांचे असताना त्यांनी इतर सदस्यांसह शिवरात्रीचा उपवास केला. त्यांनी रात्री शिवाची पूजा केल्यानंतर कुंटुंबातील इतर सदस्य झोपू लागले. पण मुळाजी जागरूक राहिले. त्यांनी शिवाला अर्पण केलेला नैवेद्य खात असलेल्या उंदराला पाहिजे. या घटनेने त्यांना असे वाटू लागले की शिवाची मूर्ती खरा देव असू शकत नाही. जेव्हा मूर्ती तिला अर्पण केलेल्या नैवेद्याचे रक्षण करू शकत नाही, तेव्हा ती कधीही संपूर्ण जगाचे रक्षण करू शकत नाही. या अनुभवाने त्यांचा विवेक जागृत झाला व दयानंद हिंदू धर्माच्या दुर्गुणांविरुद्ध कट्टर धर्मयुद्धवीर बनले.

त्यांच्या वडिलांनी त्यांच्या स्वतंत्र मनावर बंधने आणली. त्यांना लग्नाच्या बंधनात अडकवण्याचा प्रयत्न केला. दयानंद कौटुंबिक जीवनाच्या बंधनात अडकण्यास तयार नव्हते म्हणून ते घरातून पळून गेले आणि मथुरेला पोहोचले.

१८६१ मध्ये मथुरा येथे दयानंद स्वामी ब्रिजानंद यांच्या संपर्कात आले. हा संपर्क त्यांच्या कारकिर्दीतील निर्णायक टप्पा होता. ते त्यांचे शिष्य बनले आणि प्राचीन धार्मिक साहित्य, विविध पौराणिक पुस्तके व संस्कृत व्याकरणाचा अभ्यास केला. दयानंदांचा ब्राह्मण समाजाशी संपर्क होता. ते वेदाचे श्रेष्ठत्व आणि आत्म्याचे स्थानांतरण स्वीकारण्यास तयार नव्हते. आपल्या जीवनाचे ध्येय पूर्ण करण्यासाठी त्यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबईत आर्य समाजाची स्थापना केली व उर्वरित आयुष्य वेगवेगळ्या ठिकाणी आर्य समाजाच्या शाखा स्थापन करण्यात घालवले. दयानंदांच्या सुधारणावादी उत्साहाने सनातनी हिंदूंना संताप आला व ३० ऑक्टोबर १८८३ रोजी त्यांचे अन्न विषबाधेतून निधन झाले.

**महिला शिक्षण धर्म व लोकशाही :**

महिलांमध्ये सुधारणांच्या प्रश्नावर दयानंद बालविवाह व विधवा या वाईट प्रथांना विरोध करत होते. ज्याला त्यांच्या मते वेदांची मान्यता नव्हती. पुनर्विवाहाला मनाई करणाऱ्या समाजातील बालविधवांची दयनीय स्थिती त्यांना सर्वात जास्त चिंता निर्माण करत होती म्हणूनच त्यांनी 'निगोपा' आणि नंतर विधवा पुनर्विवाह देखील सुचवला.

'आर्यावर्त' (भारत)च्या समृद्धीसाठी दयानंदांच्या जागतिक दृष्टीकोणातून शिक्षणाला महत्त्वाचे स्थान होते. नैतीक व धार्मिक पायावर आधारीत व पुरुष आणि स्त्री यांच्या चारही वर्गासाठी असलेले शिक्षण दयानंद सरस्वती यांना हवे होते. त्यांच्या मते या शिक्षणाचा भार राजा किंवा राज्याने उचलायला हवा, ते सक्तीच्या शिक्षणाचे समर्थक होते.

दयानंद सरस्वती यांच्या राजकीय तत्त्वज्ञानात दोन केंद्रीय कल्पना आहेत- एकमेकांशी काही प्रकाणात विरोधाभासी. पहिली म्हणजे- प्रबुद्ध राजेशाही, ही संकल्पना त्यांनी मनुस्मृतीतून घेतली होती. म्हणजेच धर्माच्या आज्ञापालनात पूर्णपणे रूजलेली राजेशाही. दुसरी काहीशी परस्परविरोधी कल्पना म्हणजे निवडक प्रतिनिधीत्वाची. म्हणजेच लोकशाहीची. तथापि, वेदांत विधानसभा आणि राज्याच्या निवडणुकीच्या तत्वावर भर देऊन ते राजाला विधानसभेचा अध्यक्ष म्हणून व्याख्या करतात.

**राजकीय कल्पना :**

दयानंदांचे राजकीय विचार पुढीलप्रमाणे आहेत-

स्वामी दयानंद हे राजकारणातील आदर्शवादी होते आणि त्यांना वेदांच्या अभ्यासातून प्रेरणा मिळाली. वेदांचा अर्थ लावण्याची त्यांची पद्धत पारंपरिक पद्धतीपेक्षा खूपच वेगळी होती. त्यांनी प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा सुरू केली की वेदांमध्ये असे सत्य आहे जे त्यांच्या वापरात सार्वत्रिक आहेत आणि जे तीव्र वक्र आणि शोध विज्ञानाच्या कसोटीवर टिकू शकतात. भारतीय परंपरा अशी आहे की वैद्यकशास्त्र, गणित, संगीत, खगोलशास्त्र, राजकारण व अर्थशास्त्र यांसारखी विज्ञानेदेखील वेदांवर आधारीत आहेत.

**राज्य सिद्धांत :**

स्वामी दयानंद राज्याच्या उत्पत्तीबद्दल कोणतीही चौकशी करत नाही. ते त्यांचे लक्ष पूर्णपणे संघटीत राज्याच्या सर्व प्रशासकीय अवयवांच्या स्वरूपाच्या चर्चे वर केंद्रीत करतात. त्यांच्या मते, राज्य हे जीवनातील सर्वोच्च उद्दीष्टांच्या प्राप्तीसाठी आहे. राज्याचे उद्दीष्ट केवळ नागरिकांच्या धर्मनिरपेक्ष आणि भौतिक कल्याणाकडे पाहणे नाही तर मानवी जीवनाच्या चारही उद्दिष्टांचे म्हणजेच धर्म, भौतिक, समृद्धी उपयोग आणि मोक्ष यांचे आश्वास देणे आहे. त्यांना असे वाटत होते की, राज्याने आपले कार्य अशा प्रकारे निर्देशित करावे की या गोष्टी जगाच्या बंधनातून मुक्त होण्यास मदत करतील.

**सरकारचे स्वरूप :**

स्वामी दयानंद सरस्वती एका माणसाच्या राजवटीच्या विरोधात आहेत. त्यांच्या सत्यार्थ प्रकाशात ते म्हणतात की, संपूर्ण सत्ता एकाच माणसाकडे सोपवता कामा नये. एक हुकूमशहा राजा कधीही इतरांना त्यांच्या बरोबरीचे होऊ देत नाही. त्याचे स्वत:चे व्यक्तिमत्त्व इतरांच्या व्यक्तिमत्त्वावर सावली देऊ शकते. ते घोषित करतात की, एक हुकुमशहा स्वत:चा स्वार्थी हेतू पूर्ण करण्यासाठी पक्षपाती असतो. राज्याच्या एकतेचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी राष्ट्रपती असणे आवश्यक आहे. हे स्वामी दयानंद यांनी मान्य केले. लोकांवर राज्य करण्याचा अधिकार लोकांना स्वत: प्रदान करायचा आहे. दयानंद त्यांच्या प्रजासत्ताकवादाच्या सिद्धांतात धर्मशास्त्रांनी मांडलेल्या राजेशाहीच्या दैवी अधिकारांशी जुळतात. ते असे निरीक्षण करतात की, जर राज्य कारभार सोपवण्यात आलेले व्यक्ती विद्वान असतील तर ते राज्यासाठी मोठी सत्ता मिळवू शकतील.

**कायद्याचे राज्य :**

स्वामी दयानंदांनी कायद्यालाच खरा राजा मानले. ते सर्वांना वैदीक ग्रंथातील शिकवण लक्षात ठेवण्याचा आग्रह करतात. ज्यामध्ये म्हटले आहे की, 'खरोखरच न्याय, कायदा हाच खरा राजा आहे. हो, न्याय कायदा हाच धर्म आहे' त्यांनी लिहिलेल्या अवैयक्तीक कायद्यावर टिका करताना ते कायद्याला राजापेक्षा वरचढ ठेवतात. केवळ कायदा हाच खरा राज्यकर्ता आहे. जो लोकांमध्ये सुव्यवस्था राखतो. कायदा हाच त्यांचा रक्षक आहे. सर्व लोक गाढ झोपेत असताना कायदा जागृत राहतो म्हणून शहाणे लोक कायद्यालाच धर्म किंवा अधिकार मानतात. जेव्हा कायदा योग्यरित्या चालवला जातो तेव्हा कायदा सर्व लोकांना आनंदी करतो. परंतु जेव्हा चुकीच्या पद्धतीने चालवले जाते तेव्हा न्यायाच्या आवश्यकतांचा योग्य विचार न करता ते राजाला उद्ध्वस्त करते.

राजा आणि इतर उच्च अधिकारांच्या खटल्यांसाठी स्वतंत्र न्यायालये उपलब्ध करून देणेही स्वामी दयानंदांना आवडत नाही. ते या म्हणण्याचे समर्थन करतात आणि राजाला देण्यात येणारी शिक्षा सामान्य माणसापेक्षा हजारपट जास्त असावी, असे ते स्पष्ट करतात.

**सरकारची कार्ये :**

स्वामी दयानंद यांच्या मते, सरकार हे समाजाचे

प्रतिनिधी आहे. त्यांना केवळ अंतर्गत आणि बाह्य धोक्यांपासून सुरक्षा प्रदान करायची नाही तर मानवी जीवनाच्या सर्वोच्च उद्दिष्टांना प्रोत्साहन द्यायचे आहे. नागरिकांना खाजगी मालमत्ता बाळगण्याची परवानगी देण्याची गरज ते मान्य करतात. संपत्तीच्या विभाजनाच्या असमानतेवर त्यांचा विश्वास आहे. परंतु त्याचवेळी त्यांना भीती वाटते की श्रीमंत लोक सरकारला त्रास देऊ शकतात.

त्यांनी एक मजबूत सैन्य राखण्यावरही खूप भर दिला. ते वर्णन करतात की, देशाच्या आत एक मजबूत संरक्षण दल उभारण्याशिवाय राज्याचे स्वातंत्र्य राखण्याचा दुसरा कोणताही मार्ग नाही. स्वामीजींच्या मते, सरकार हे अशा लोकांचे पालक व संरक्षक आहे जे वृद्धापकाळ आणि अशक्तपणामुळे किंवा स्वत:ची काळजी घेण्यास खूपच लहान असल्याने आपली उपजिवीका करू शकत नाहीत असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. मृत अधिकाऱ्यांच्या पत्नी व अल्पवयीन मुलांचा सरकारच्या मदतीचा हक्क आहे. तथापी, जर त्यापैकी कोणी क्रुर जीवन स्वीकारले तर त्याला किंवा तिला कोणतीही मदत मिळू शकत नाही.

**दयानंद सरस्वती आणि आर्य समाज :**

७ एप्रिल १८७५ रोजी दयानंद सरस्वती यांनी मुंबईत आर्य समाजाची स्थापना केली. ही एक हिंदू सुधारणा चळवळ होती. ज्याचा अर्थ 'महाराजांचा समाज' होता. आर्य समाजाचे दहा सिद्धांत पुढीलप्रमाणे-

१. देव हा सर्व खऱ्या ज्ञानाचा आणि ज्ञानाद्वारे जाणल्या जाणाऱ्या सर्व गोष्टींचा स्त्रोत आहे.
२. देव अस्तित्वात आहे, बुद्धीमान व आनंदी आहे. तो निराकार, सर्वज्ञ, न्यायी, दयाळू, अजन्मा, अंतहीन, अपरिवर्तनीय, आदिहिन, अतुलनीय, पवित्र आणि सर्वांचा निर्माता, तोच केवळ भक्ती करण्यास पात्र आहे.
३. वेद हे सर्व खऱ्या ज्ञानाचे धर्मग्रंथ आहेत. त्यांचे वाचन करणे, शिकवणे, पाठ करणे व ते वाचताना ऐकणे हे सर्व आर्यांचे परम कर्तव्य आहे.
४. सत्य स्विकारण्यास व असत्याचा त्याग करण्यास नेहमी तयार असले पाहिजे.
५. सर्व कृती धर्मानुसार म्हणजे काय बरोबर आणि काय चुक याचा विचार करून केल्या पाहिजेत.
६. आर्य समाजाचा मुख्य उद्देश जगाचे कल्याण करणे आहे. म्हणजेच प्रत्येक शारीरिक, आध्यात्मिक व सामाजिक कल्याण करणे.
७. सर्वांशी आपले वर्तन प्रेम, नितीमत्ता व न्यायाने निर्देशित असले पाहिजे.
८. आपण अविद्या दूर करून विद्या वाढवली पाहिजे.
९. कोणीही केवळ स्वत:चे भले करण्यात समाधानी राहू नये. याउलट सर्वांचे भले करण्यात स्वत:चे भले शोधले पाहिजे.
१०. सर्वांच्या कल्याणासाठी ठरविलेल्या समाजाच्या नियमाचे पालन करण्यासाठी स्वत:ला बंधनात समजले पाहिजे.

आर्य समाजाची ही १० संस्थापक तत्त्वे वापरून महर्षी दयानंद यांनी भारताची सुधारणा करण्याचा प्रयत्न केला आणि लोकांना वेद व त्यांच्या आध्यात्मिक शिकवणीकडे परत जाण्यास सांगितले.

**महिलांचे उत्थान :**

आर्य समाजाने केवळ भारतीय मानसिकतेचे आध्यात्मिक पुनर्गठन करण्याचा प्रयत्न केला नाही तर विविध वाईट सामाजिक प्रथा नष्ट करण्यासाठीही काम केले. त्यापैकी प्रमुख म्हणजे विधवा पुनर्विवाह व महिला शिक्षण. १८८० च्या दशकात समाजाने विधवा पुनर्विवाहाला पाठींबा देण्यासाठी कार्यक्रम सुरू केले. महर्षी दयानंद यांनी मुलांना शिक्षित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले व बालविवाहाला विरोध केला. त्यांनी घोषित केले की, समाजाच्या सर्वांगीण

हितासाठी शिक्षित पुरुषाला शिक्षीत पत्नीची आवश्यकता असते.

**शुद्ध चळवळ :**

स्वेच्छेने किंवा अनैच्छिकपणे इस्लाम किंवा ख्रिश्चन धर्मात धर्मांतरीत झालेल्या व्यक्तींना हिंदू धर्मात परत आणण्यासाठी महर्षी दयानंद यांनी शुद्धी चळवळ सुरू केली. हिंदू धर्मात परत येऊ इच्छिणाऱ्यांना शुद्धी किंवा शुद्धीकरण देण्यात आले आणि समाजाच्या विविध स्तरांमध्ये प्रवेश करून, निराश वर्गांना हिंदू धर्मात परत आणण्याचे उत्कृष्ट काम केले.

**शैक्षणिक सुधारणा :**

महर्षी दयानंद यांना पूर्ण खात्री होती की, ज्ञानाचा अभाव हा हिंदू धर्मातील भेसळीमागील मुख्य दोष आहे. त्यांनी आपल्या अनुयायांना वेदांचे ज्ञान शिकवण्यासाठी व ते ज्ञान पुढे पसरवण्यासाठी अनेक गुरुकुलांची स्थापना केली. त्यांच्या श्रद्धा, शिकवणी व कल्पनांनी प्रेरीत होऊन त्यांच्या शिष्यांनी १८८३ रोजी लाला हंसराज यांच्या नेतृत्वाखाली लाहोर येथील पहिले डीव्ही हायस्कूल स्थापन केले.

**धार्मिक सुधारणा :**

दयानंदांनी वेदांना अमर केले असले तरी त्यांनी मूर्तीपूजेला विरोध केला. त्यांनी कर्मकांडात्मक धार्मिक प्रथाविरुद्ध आवाज उठवला. त्या धार्मिक कार्यक्रमांमुळे भारताचे सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक अधोगती होईल. त्यांनी भारतीय पौराणिक कथात असलेल्या कल्पनांनाही नाकारले.

त्यांनी बहुदेववाद किंवा वेगवेगळ्या स्वरूपात देवाची पूजा करण्याचा निषेध केला. त्यांनी यावर भर दिला की, या बहुदेववादामुळे हिंदू समाजात फुट पडली आहे. एकेश्वरवादावर आणि निराकार देवाला समर्पित होण्यावर भर देऊन त्यांनी 'सत्यर्थ प्रकाश'मध्ये लिहिले आहे की, 'एकेश्वरवादी सामान्यत: त्याला दिलेल्या सर्व गुणांसह एकच देव आहे. म्हणून जगाच्या तुलनेत वेद शाश्वत आहेत. परंतु देवाच्या तुलनेत ते अंतर्गत नाहीत.'

अशा प्रकारे दयानंदांनी धर्माच्या क्षेत्रात अढळ क्रांती घडवून आणली. त्यांनी सांगितले की, आध्यात्मिक विकासासाठी आंतरिक शुद्धता आवश्यक आहे. धर्म हा मोठ्या प्रमाणात माणसाचे शरीर, मन आणि आत्मा नियंत्रित करण्यासाठी होता. म्हणून धर्म, सत्य, शुद्धता नैतीक आचरण हे त्यांच्यासाठी समानार्थी शब्द आहेत.

# महाकुंभ : एक अद्भुत संयोग

**डोंगरे ऐश्वर्या अंबादास**
एम.ए.प्रथम वर्ष

महाकुंभ मेळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नाही तर तो भारतीय संस्कृती, परंपरा, रूढी आणि सामाजिक अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग आहे. जिथे लाखो लोक एकत्र येतात. आध्यात्मिकतेची भावना अनुभवतात आणि विविध संस्कृतीचा संगम साधतात.

**महाकुंभ मेळा : धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व :**

कुंभमेळा हिंदू धर्मात अत्यंत महत्त्वाचा आणि विशेष मानला जातो, जिथे लोक नद्यांमध्ये स्नान करतात, पापांपासून मुक्त होतात आणि आध्यात्मिक शक्ती प्राप्त करतात आणि यामुळेच आपल्या दिव्य भारतीय संस्कृतीचा अनुभव होतो.



**सामाजिक एकता :**

कुंभमेळा विविध प्रादेशिक, सामाजिक आणि धार्मिक लोकांना, गटांना एकत्र आणतो. ज्यामुळे सामाजिक उद्देशाला चालना-प्रोत्साहन मिळते.

**संस्कृतीचा संगम :**

या कुंभमेळ्यात विविध प्रकारच्या सांस्कृतिक पारंपरिक परंपरा रुढी आणि चालीरिती एकत्र येतात. ज्यामुळे भारतीय संस्कृतीचा एक समृद्ध अनुभव व आध्यात्मिक संस्कृतीचा अनुभव मिळतो.

**आध्यात्मिक अनुभव :**

कुंभमेळा साधू, संन्यासी आणि भक्तांना एकत्र आणतो. जिथे ते ध्यान, योग आणि इतर आध्यात्मिक क्रिया, विधी करतात. त्या कालावधीमध्ये काही जण संन्यास घेऊन साधू होतात आणि त्या आध्यात्मिक शक्तीचा अनुभव येतो.

**शैक्षणिक आणि सामाजिक अभ्यास :**

कुंभमेळा सामाजिक अभ्यासासाठी एक उत्तम ठिकाण आहे जिथे लोक हिंदू जीवनशैली, रूढी, परंपरा आणि सामाजिक रचनांचा अभ्यास करू शकतात.

**यमुना-गंगा आणि सरस्वती नद्यांच्या संगमाचे महत्त्व :**

प्रयागराजमध्ये होणारा महाकुंभमेळा गंगा, यमुना आणि सरस्वती नद्यांच्या संगमावर होतो. जिथे लाखो भाविक स्नान करतात आणि आध्यात्मिक शुद्धी मिळवतात, मोक्ष प्राप्ती करतात.

**पुण्यप्राप्ती :** कुंभमेळ्यातील पवित्र स्नानाने पुण्यप्राप्ती होते अशी लोकांची मनोभावे श्रद्धा आहे.

**जागतिक सांस्कृतिक वारसा :** युनेस्कोने कुंभमेळ्याला जागतिक सांस्कृतिक वारसा म्हणून घोषित केले आहे.

**रोजगार आणि अर्थव्यवस्थेतील योगदान :** सदरील कुंभमेळा



या काळामध्ये लाखो लोकांना तात्पुरता रोजगार मिळवून देतो आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतो.

**कुंभमेळ्याचे प्रकार :** कुंभमेळ्याचे चार प्रकार पडतात आणि ते चार म्हणजे - पूर्ण कुंभ, अर्ध कुंभ, कुंभ आणि महाकुंभ.

**पुष्कर कुंभमेळा :** गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा येथील प्राणहिता नदीवर दर बारा वर्षांनी पुष्कर कुंभमेळा भरतो.

कुंभमेळा हा केवळ एक उत्सव नाही तर तो आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मूल्यांचा संगम आहे. जो भारताचे सार परिभाषित करतो. चार ठिकाणी महाकुंभ, कुंभमेळाचे आयोजन होते. हरिद्वार, उज्जैन, नाशिक आणि प्रयागराज. येथील पवित्र नद्यांच्या पवित्र तीरावर आयोजित या भव्य कार्यक्रमात लाखो भाविक पवित्र पाण्यात डुबकी मारून आध्यात्मिक मुक्ती आणि आशीर्वाद मिळवतात. परंतु कुंभमेळ्याला खरोखरच आकर्षक बनवणारी गोष्ट म्हणजे आध्यात्मिक क्षेत्राच्या पलीकडे असलेल्या भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंवर असलेला त्याचा खोलवर प्रभाव!

महाकुंभमेळा, कुंभमेळा हा उत्सव परंपरा, कला, अर्थशास्त्र आणि सामाजिक गतिशीलतेचे एक प्रत्यक्ष व जीवंत उदाहरण आहे, झलक आहे. कुंभमेळा भारताच्या सांस्कृतिक मूल्यांनी आकार घेतो आणि अशा असंख्य मार्गांचा शोध घेत असताना आपल्याला एकता, परंपरा, रूढी, नावीन्य, अखंडता आणि आध्यात्माच्या कथा उलगडतात.

कुंभमेळ्याची मुळे भारतीय पारंपरिक कथा आणि इतिहासाच्या समृद्ध रचनेत खोलवर रूजलेली आहेत. ज्यामुळे ती केवळ धार्मिक सभा नाही तर एक जीवंत वारसा आहे. प्राचीन शास्त्रानुसार कुंभमेळ्याची उत्पत्ती (सुरुवात) पौराणिक समुद्र मंथन किंवा वैदिक महासागराच्या मंथनात आढळते. ही खगोलीय पौराणिक घटना अमर होण्याचे अमृत मिळवण्यासाठी एक शोध होती. ज्यामध्ये देव आणि दानव दोघेही एका वैश्विक युद्धात सहभागी होते. असे मानले जाते की, या मंथनादरम्यान या अमृताचे काही थेंब पृथ्वीवर त्या चार ठिकाणी पडले जिथे 'कुंभमेळा' आता साजरा केला जातो. हरिद्वार, उज्जैन, नाशिक आणि प्रयागराज. शतकानुशतके ही पौराणिक घटना एका सामूहिक तीर्थयात्रेत रूपांतरित झाली. ज्यामुळे केवळ ऋषी आणि संतच नव्हे तर अध्यात्मिक मोक्ष मिळवण्यासाठी रोज आणि सामान्य लोक देखी आकर्षित झाले. सातव्या शतकातील हुआन त्सांग सारख्या चिनी प्रवाशाच्या वृतांतासह ऐतिहासिक नोंदीमध्ये भारतातील कुंभमेळ्याचा उल्लेख आढळून येतो. या गोष्टी कुंभमेळा प्राचीन काळातही एक स्थापित आणि महत्त्वपूर्ण घटना असल्याचे पुरावे देतात. या इतिहासात कुंभमेळ्याला श्रद्धेचा एक भव्य देखावा म्हणून चित्रित केले गेले आहे, ज्यामध्ये मोठ्या संख्येने लोक उपस्थित राहतात.

कुंभमेळ्याचे प्रचंड सांस्कृतिक महत्त्व आहे, कारण ते भारतीय जीवनातील विविध पैलूंच्या संगमाचे प्रतीक आहे. कुंभमेळ्याचा असा एक काळ आहे जेव्हा आध्यात्मिक आणि लौकिक गोष्टी एकत्र येतात. खगोलीय पिंड्याच्या निरीक्षणामुळे उत्सवाच्या शुभ तारखा निश्चित केल्या जातात. शिवाय कुंभमेळा हा भारताच्या विविध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरांचा जीवंत संग्रह म्हणून काम करतो. हा एक असा काळ आहे जेव्हा प्राचीन विधी, मंत्र आणि पद्धती सार्वजनिकरित्या केल्या जातात. ज्यामुळे भारताच्या आध्यात्मिक वारशाच्या समृद्ध इतिहासाची झलक दिसून येते. हा उत्सव हिंदू विचारांच्या विविध शाळांचे मिश्रण आहे. ज्यामध्ये विविध पंथ आणि समुदाय एकत्र येतात आणि भारतीय आध्यात्माचे बहुलवादी स्वरूप प्रदर्शित करतात.

कुंभमेळा हा केवळ एक आध्यात्मिक कार्यक्रम नाही, हा एक महोत्सव आहे जो यजमान शहरांना आणि संपूर्ण देशाला प्रचंड आर्थिक बळकटी देतो.

कुंभमेळा सांस्कृतिक देवाणघेवाण आणि शिक्षणाचे एक व्यासपीठ म्हणून काम करतो. जगभरातील विद्वान संशोधक आणि पर्यटक केवळ निरीक्षक नव्हे तर सहभागी म्हणून या महोत्सवाला भेट देतात. जे भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरांबद्दलजाणून घेण्यास आणि अनुभवण्यास उत्सुक असतात. या देवाणघेवाणीमुळे परस्पर आदर आणि समजूतदारपणा वाढतो. सांस्कृतिक दरी भरून काढतो आणि जागतिक सुसंवाद वाढतो.

थोडक्यात कुंभमेळा हा भारतीय समाजाचे एक सूक्ष्म

विश्व आहे. जो त्याच्या सांस्कृतिक समृद्धतेचा सामाजिक गुंतागुंतीचा आणि आध्यात्मिकतेचा समावेश करतो. हा एक असा उत्सव आहे, जिथे लोक सांस्कृतिक वारसा साजरा करतात, ज्यामध्ये सामाजिक बंध मजबूत केले जातात, ज्यामुळे तो भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक रचनेचा अविभाज्य भाग बनतो.

कुंभमेळा त्याच्या आध्यात्मिक भव्यतेसह आणि सांस्कृतिक विविधतेसह, शतकानुशतके कलाकार, लेखक आणि चित्रपट निर्मात्यांसाठी प्रेरणेचा समृद्ध स्त्रोत राहिला आहे. कला, साहित्य आणि माध्यमांच्या विविध प्रकारांवर अतिशय मोठी छाप या कुंभमेळ्याने सोडली आहे. तसेच जगभरातील सृजनशील आणि बुद्धीजीवींच्या कल्पनाशक्तीला या आध्यात्मिक मेळ्याने आकर्षित केले आहे. कुंभमेळ्यातील दृश्य आणि असंख्य मानवी अनुभवांनी कलाकार आणि लेखकांना मोहित केले आहे. त्यांच्या कलाकृतींमध्ये याचे सार साकारण्याची प्रेरणा त्यांना यातून मिळाली आहे. चित्रकार त्यांच्या कलेतून या उत्सवाचे मोहक रंग टिपतात. भगवे कपडे घातलेल्या साधूंपासून ते पवित्र नदीच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या गर्दीपर्यंत ते मोहक चित्र रेखाटतात. यात्रेकरूंच्या आध्यात्मिक शोधांपासून ते भारतीय संस्कृती आणि परंपरेच्या गुंतागुंतीच्या व आध्यात्म आणि सांस्कृतिक समृद्धतेने भरलेल्या कथांनी साहित्यिक जगाला समृद्ध करतात.

चित्रपट निर्माते आणि माहितीपटकारांनाही कुंभमेळ्याबाबत तितकेच आकर्षण आहे. या महोत्सवावर असंख्य माहितीपट बनवण्यात आले आहेत. त्याचा उद्देश या भव्य कार्यक्रमाचे सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि सामाजिक महत्त्व जाणून घेणे आणि समजून, अनुभव घेणे आहे. या सर्व माध्यमातूनच सर्वांना जटील आणि उत्साही उत्सवाची ओळख करून दिली आहे आणि हा उत्सव मनोभावे अनुभवला जातो व पार पाडला जातो.

भारतीय उत्सव कुंभमेळ्याबाबत असे सांगितले जाते की, वसाहतकालीन काळातील साधारण १७९६ आणि १८०८ मध्ये कुंभमेळ्याला २० ते २५ लाख यात्रेकरू उपस्थित होते. १८९२ ते १९०८ च्या दरम्यान ब्रिटीशकालीन भारतात मोठ्या दुष्काळी काळात ही उपस्थिती ३ ते ४ लाखपर्यंत घसरली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात इंधनाचा तुटवडा कमी करण्यासाठी वसाहतवादी सरकारने कुंभमेळ्यावर बंदी घातली. प्रत्येक कुंभमेळ्यात अंदाजे २० ते ४० लाख यात्रेकरू जमत होते. नंतर काही काळाने भारताच्या स्वातंत्र्यानंतर या उपस्थितीमध्ये झपाट्याने वाढ झाली. अमावस्येला तीन प्रमुख स्नानांच्या तारखांपैकी एक १९५४ च्या कुंभमेळ्यात ५ दशलक्षांहून अधिक लोक उपस्थित होते. १९७७ च्या कुंभमेळ्याला सुमारे १ कोटी तर १९८९ च्या कुंभमेळ्याला सुमारे १५ दशलक्ष लोक उपस्थित होते.

२००१ च्या कुंभमेळ्याला साधारण ३-४ कोटी तर नंतर २००७ मध्ये प्रयागराज येथील ४५ दिवसांच्या अर्धकुंभमेळ्याला ७ कोटी यात्रेकरू उपस्थित होते. २०१८ मध्ये प्रयागराज कुंभमेळ्याला १२ कोटी यात्रेकरू उपस्थित होते तर नाशिकमध्ये सर्वाधिक ७ कोटी ५० लाख यात्रेकरूंनी उपस्थिती नोंदवली होती. प्रयागराज येथील महाकुंभ हा जगातील सर्वात मोठा महाकुंभ आहे ज्याची उपस्थिती आणि तयारीचे प्रमाण हे दर महाकुंभ मेळ्याला उत्सवासोबत वाढतच जाते.

२००७ मध्ये नॅशनल जिओग्राफिने प्रयाग कुंभमेळ्याच्या 'इनसाईड निर्वाण' नावाचा एक माहितीपट चित्रित केला होता व नंतर २०१३ मध्ये नॅशनल जिओग्राफिने परत येऊन 'इन साईड द महाकुंभ' हा माहितीपत्र चित्रित केला. भारतीय व परदेशी लोकांनी, वृत्त माध्यमांनी कुंभमेळ्याचे नियमित कव्हरेज केले आहे. अशा रितीने अनेक माध्यमांतून लोकांनी भारतीय आध्यात्मिकरित्या सर्वत्र नागरिकांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे व भारतीय संस्कृतीला प्रोत्साहन दिले आहे.

# मराठी : एक अभिजात भाषा

**हनवते नम्रता उत्तरेश्वर**
एम.ए.प्रथम वर्ष

अभिजात भाषेचे भारतीय संस्कृतीतील योगदान,
हे एक महत्त्वाचे व पवित्र बंधन,
भारतीय जीवनाच्या गाभ्यात वसले,
संस्कृतीचे दीप जसे तेजाने उजळले.

संस्कृत वाङ्मयाचा अपार ठाव,
आत्मा उलगडणारा ज्ञानाचा भाव,
वेद, उपनिषद आणि पुराणांची गाथा,
यातच आढळते भारताची महानता.

गीतेचे शाश्वत संदेश,
धर्माचे आदर्श आणि सत्वविवेक,
अर्जुनाच्या जीवनातील निर्णायक संवाद,
त्यातून शिकता येतो योग्य मार्गाचा शोध.

महाभारतातील युद्ध आणि काव्य,
त्याच्यात लपले असतात शाश्वत तत्त्वज्ञानाचे श्वास,
रघुकुल आणि रामकथा हेच गुण,
भाषेच्या माधुर्याने जिंकते हृदय, उठते मन.

काव्य, शास्त्र, संगीत आणि कलाही,
अभिजात भाषेचे असते गोड सांगणं,
चाणक्याच्या नीती, कालिदासाचे काव्य,
हेच संस्कृतीचे तेजस्वी आरंभ आणि उच्चार.

भारतीय संस्कृतीतले महान योगदान,
ज्याने केली भाषेची निर्मिती व प्रगल्भता,
चांगुलपणाचा संदेश व प्रगल्भ ज्ञान,
संस्कृतीला दिले समृद्धतीचा अनमोल ठसा
संस्कृत भाषेने भारतीय जीवनात रंग भरले,
विचार, तत्त्वज्ञान, धर्म आणि अध्यात्मतेला
खूप शांती दिले,
भारताची अद्वितीयता अभिजात भाषेच्या नितीमध्ये
तेच संस्कृतीचे अमूल्य रत्न, हेच तिचे महत्व.

तेच ते संस्कृत, प्राकृत, तमिळचे सूर,
भारताच्या विविधतेला दिले सुंदर रूप,
हाच अभिजात भाषेचे अनमोल ठसा
यातच समावले भारताचे वैशिट्य व अस्मिता.



# अहिल्याबाई होळकर यांचे सांस्कृतिक कार्य

**कांबळे शुभांगी हणमंत**
एम.ए.प्रथम वर्ष

महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला, नदीकाठ बांधले आणि लोकांना रोजगार मिळावा यासाठी औद्योगिक धोरणे आखली, ज्यामुळे माळवा प्रदेशात सांस्कृतिक समृद्धी आणि स्थिरता वाढली.

**मंदिरे आणि धार्मिक स्थळे :**

अहिल्याबाई होळकर यांनी भारतभर अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. विशेषत: काशी विश्वनाथ मंदिर, विष्णुपद मंदिर (गया) अशा अनेक तीर्थक्षेत्रांमध्ये त्यांनी पुनरूत्पादन करून त्या तीर्थक्षेत्रांना नवसंजीवनी मिळवून दिली. त्यांनी प्रत्येक नदीकाठी घाट बांधले जसे की मणिकर्णिका घाट, दशाश्रमेघ घाट, जनाना घाट, अहिल्या घाट, शितळा घाट इत्यादी.

**राजकीय आणि प्रशासकीय कार्ये :**

त्यांच्या राजवटीत माळव्याला शांतता, समृद्धता आणि स्थिरता प्राप्त झाली. त्यांची राजधानी महेश्वर हे साहित्य, संगीत, कला आणि औद्योगिक व्यवसायांचे केंद्र बनले.

**लोककल्याण :**

त्यांनी लोकांना रोजगार मिळावा यासाठी औद्योगिक धोरणे आखली. त्यांनी अनेक धर्मशाळा आणि सार्वजनिक कामांवर लक्ष केंद्रीत केले. अहिल्याबाई होळकर यांनी विविध कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन दिले ज्यामुळे माळवा प्रदेशात सांस्कृतिक समृद्धी वाढली.

अहिल्यादेवी होळकर यांच्या नावामागे पुण्यश्लोक अशी उपाधी लावली जाते. पुण्यश्लोक या विशेषणाचे उच्चारण झाले की फक्त अहिल्यादेवींचेच स्मरण होते. या नावात सात्विकता, आध्यात्मिकता या सगळ्याचा सार असल्याची जाणीव होऊन जाते. अहिल्यादेवी भारत कार्यकाल, राजकीय आणि सामाजिक परिस्थिती लक्षात घेता त्यांनी दिलेले वेगळे योगदान अविस्मरणीय आणि तितकेच मोलाचे ठरते. त्यांनी समाजसुधारणेला अनन्यसाधारण मौल्यवान मार्गदर्शन दिले आहे, त्यांचे निर्णय आणि कार्य एक धर्मरक्षक शासक म्हणून आजही जगाला प्रेरणा देत आहे.

अहिल्याबाई होळकर यांचे जीवन म्हणजे भारतातील समाजसुधारक, इंग्लिश शिक्षण आणि पाश्चात्य विचारांना संपूर्ण देवता तथाकथित ‘अभिजात’ वर्गाला एक सणसणीत चपराक आहे. कदाचित अन्याय आणि धार्मिक फुटीच्या पार्श्वभूमीवर अहिल्यादेवींकडे आलेली प्रशासकाची जबाबदारी एक पटकथापूर्वक वाटून जाते. सत्ताधारी काँग्रेसच्या आश्रयाने ज्या इतिहासाने जगाला ओळख दिली. अहिल्या देवींचे जीवन तर संपूर्ण भारताचा इतिहास एक विशिष्ट जगाच्या मांडणीचे मुद्दे होते. मात्र गेल्या काही वर्षात ही स्थिती बदलली आहे. खरा इतिहास मांडण्यासाठी अनेक अभ्यासक पुढे येत आहेत आणि तथाकथित इतिहासकारांची विश्वासार्हता जगासमोर येत

आहे.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर माळवा प्रांताच्या (सध्याचा मध्य प्रदेश) शासक होत्या. मात्र त्यांची दृष्टी संपूर्ण भारताला कवेत घेण्यास समर्थ होती. अहिल्यादेवी या भारतीय ऐक्याचे प्रतीक आहेत. अहिल्यादेवींशी संबंधित अनेक ठिकाणे भारतभर पसरलेले आहेत. ही ठिकाणे धार्मिक स्वरूपाची आहेत. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे भारतातील संस्कृती आणि धार्मिक ऐक्याचा फार मोठा वस्तुपाठ आहे. माळवा प्रांताच्या शासक विचाराला असता भारतातील इतर ठिकाणाचा विचार केला जातो. याचा विचार पाश्चात्य मार्गदर्शकांनी करणे आवश्यक आहे. अहिल्यादेवी यांनी आपल्या कार्याने सांस्कृतिक राष्ट्रवादाची वास्तविक मजबूती दिली.

अहिल्यादेवी यांचे जीवनकार्य भारतातील भाविक विश्व बळकट करते आणि अहिल्याबाई यांच्यामुळे त्याला नवीन ऊर्जा प्राप्त होते. आपल्याला लहानपणापासून शिकवले गेले की, भारतीय समाज संस्कृती पुरुष प्रधान आहे. आम्ही हे सदोदित ऐकत आलो की, राजा किंवा शासन एका विशिष्ट जातीचा असावा. वर्षानुवर्षे आम्हाला त्यात यश आले. भारतीय राजे शासक उपलब्ध झाले आहेत. पाश्चात्य विचारांचे मार्गदर्शक लोकांनी हे ठसविण्याचा प्रयत्न केला. भारत हे कधीही एक राष्ट्र आणि एक भूभाग होता. १८५६ चे समर हे एक बंड होते. समाजहिताची दृष्टी भारतीय शासक धोरणं असे आम्हाला शिकवत आले. अहिल्यादेवी यांनी मानव जीवनाच्या सर्व पैलूंसाठी निर्णय घेतला. यामध्ये राज्य, शेती, जलसंपदा पासून मंदिर आणि व्यवस्थापन यांचे महत्त्व समाविष्ट होते. हे एक महिला शासक करत होती हे सदैव ध्यानात ठेवणे आवश्यक आहे.

अध्यात्मिकता आणि धार्मिकता हा अहिल्यादेवी यांचा स्थायीभाव होता. त्या भगवान शंकराच्या निस्सीम भक्त होत्या किंबहुना शिवभक्त ही त्यांची खरी ओळख आहे. अहिल्यादेवी होळकर म्हणजे राजा हा राज्याचा उपभोगशून्य स्वामी असतो या भारतीय विचार परंपरेच्या सर्वार्थाने पाईक होत्या.

माजी लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर आधारित मातोश्री हे पुस्तक लिहिले आहे. २००२ मध्ये देवी अहिल्याबाई नावाच्या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली होती. त्यात देवी अहिल्याबाईंच्या भूमिकेत मल्लिका प्रसाद, हरकुबाई (खांदा राणी, मल्हारराव होळकर यांच्या पत्नी) म्हणून शबाना आझमी आणि अहिल्याबाईंचे सासरे मल्हारराव होळकर म्हणून सदाशिव अमरापूरकर यांचा समावेश होता.

महाराष्ट्रातील ठाणे शहरात एका बाल उद्यानाला त्यांच्या नावावरून अहिल्यादेवी होळकर उद्यान असे नाव देण्यात आले आहे. तसेच त्याच शहरात एका रस्त्यालाही त्यांचे नाव देण्यात आले आहे. इंदूर येथील विमानतळाचे नाव देवी अहिल्याबाई होळकर विमानतळ असे ठेवण्यात आले आहे. मध्य प्रदेशातील इंदूर येथे देवी अहिल्या विश्व विद्यालय आणि महाराष्ट्रातील सोलापूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ अशी दोन विद्यापिठे आहेत. २००६ मध्ये उपराष्ट्रपती भैरवसिंग शेखावत यांच्या हस्ते संसद ग्रंथालय इमारतीच्या आवारात अहिल्याबाईंच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले.

**अहिल्यादेवींचे स्थापत्य क्षेत्रातील योगदान सौंदर्यसृष्टी आणि कलात्मकता :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव घेताच डोळ्यासमोर सर्वप्रथम उभे राहतात ते त्यांनी नदीकाठी उभारलेले देखणे घाट. केवळ घाटच नाही तर असंख्य मंदिरे, किल्ले, राजवाडे, तलाव, विहिरी, बारवांच्या निर्मितीतून अहिल्यादेवींची स्थापत्य क्षेत्रातील एकूणच योगदानाविषयी आणि त्यांच्या त्यामागील कलात्मक व पर्यावरणपूरक दृष्टीकोनाचा आढावा घेतला जातो.

मध्ययुगीन कालखंडामध्ये भारताच्या इतिहासामध्ये ज्या महान स्त्रिया होऊन गेल्या त्यांच्यामध्ये अहिल्यादेवी होळकरांचे स्थान अद्वितीय आहे. जन्माने मराठी

असणाऱ्या या कन्यारत्नाने आपल्या धार्मिक व सामाजिक, राजकीय कर्तृत्वाने भारतभर मोठी किर्ती नावलौकिक मिळवले. इ.स. १७५४ मध्ये अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभरात अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले. प्रसिद्ध हिंदू मंदिरांचा त्यांनी जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना सुंदर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या बनल्या.

**अहिल्याबाई किल्ल्याचा इतिहास :**

मध्य भारतातील महेश्वर शहरात अहिल्या किल्ला पवित्र नर्मदा नदीच्या काठी उंचावर आहे. महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी १७६५ ते १७९६ या काळात येथे राज्य केले. किल्ल्यामध्ये अहिल्या वाडा, त्यांचे वैयक्तिक निवासस्थान, कार्यालये आणि दरबार, प्रेक्षकगृहे बांधली. राणी अहिल्याबाई या हिंदू मंदिराच्या एक महान प्रनेत्या आणि निर्मात्या होत्या. त्यांनी संपूर्ण भारतात शेकडो मंदिरे आणि धर्मशाळा बांधल्या. अहिल्याबाईचा जन्म सध्याच्या अहमदनगर जिल्ह्यातील चौंडी गावात झाला. त्यांचे वडील माणकोजीराव शिंदे हे गावचे पाटील होते.

अहिल्याबाईंनी पडदा प्रथा कधीच पाळली नाही. त्या रोज जनतेचा दरबार भरवीत असत व लोकांची गाऱ्हाणी ऐकण्यास नेहमीच उपलब्ध असत. जरी राज्याची राजधानी ही नर्मदातीरावर असलेल्या महेश्वर येथे होती, तरीही इंदूर या खेड्याचा विकास करून त्याचे सुंदर मोठ्या शहरात रूपांतर करणे या अहिल्यादेवींनी केलेले फार मोठे कार्य होते. त्यांनी माळव्यात रस्ते व किल्ले बांधली. अनेक उत्सव भरवले. हिंदू मंदिरांची कायमस्वरूपी पूजा सुरू व्हावी म्हणून अनेक दान दिले. माळव्याबाहेरही त्यांनी मंदिरे, घाट, विहिरी, तलाव व धर्मशाळा बांधल्या.

अहिल्याबाई यांना सावकार, व्यापारी, शेतकरी आदी आर्थिकदृष्ट्या सुदृढ झालेले पाहून आनंद होत असे. परंतु त्यांनी आपला अधिकार त्यांच्यावर असल्याचे कधीच जाणवू दिले नाही. त्यांनी सर्व राज्य कारभार हा सुखी व धनाढ्य लोकांकडून नियमांतर्गत मिळालेल्या धनापासून चालविला होता असे दिसते. अहिल्यादेवीनी रयतेच्या काळजीपोटी अनेक गोष्टी केल्या. त्यांनी अनेक विधवांना पतीची मिळकत त्याच्याजवळच ठेवण्यात मदत केली. अहिल्याबाईंच्या राज्यात कोणीही विधवा मुलाला दत्तक घेऊ शकत असे. एकदा त्यांच्या एका मंत्र्याने लाच घेतल्याशिवाय दत्तक घेण्याच्या मंजुरीस नकार दिला तेव्हा अहिल्यादेवींनी स्वत: दत्तक विद्यालयाचा कार्यक्रम आयोजित करून रीतसर कपडे व दागिन्यांचा आहेर दिला. अहिल्यादेवी होळकरांच्या स्मृतीस अभिवादन म्हणून सन १९९६ मध्ये इंदुरातील नागरिकांनी त्यांच्या नावे एक पुरस्कार सुरू केला आहे. दरवर्षी जनसेवेचे विशेष काम करणाऱ्यास तो पुरस्कार दिला जातो.

# कुंभमेळा एक जागतिक उत्सव

**सिरसाठ शुभांगी सूर्यकांत**
एम.ए.प्रथम वर्ष

भारतीय परंपरेत कुंभमेळ्याला वेगळेच महत्त्व आहे. कुंभमेळ्याला ज्या प्रचंड संख्येने भाविक गोळा होतात तितक्या संख्येने पृथ्वीवर क्वचितच दुसऱ्या कोणत्या धार्मिक बाबीसाठी माणसं गोळा होत असावीत असे म्हटले जाते.

अनामिका रॉय अलाहाबाद विद्यापीठात ‘प्राचीन इतिहास’ या विषयाच्या प्राध्यापक आहेत आणि विद्यापीठाच्या कला विभागाच्या अधिष्ठाता (डीन) आहेत. त्यांच्या मते ऐतिहासिक पुराव्यांनुसार कुंभमेळ्याची सुरुवात सम्राट हर्षवर्धनाच्या राजवटीत झाली होती.

चिनी प्रवासी ह्यूएन त्सांग याच्या म्हणण्यानुसार, सम्राट हर्षवर्धन यांच्या राजवटीत दर पाच वर्षांनी कुंभमेळ्यासारख्याच एका भव्य कार्यक्रमाचे आयोजन केले जात असे. जेव्हा या प्रकारचा मेळा किंवा कार्यक्रम दर पाच वर्षांनी इथे भरवला जायचा तेव्हा हर्षवर्धन प्रयागला यायचे. त्याचप्रमाणे कवी आणि अध्यात्माच्या मार्गावर चालणारे साधक देखील यायचे. हर्षवर्धन त्यांना भिक्षा द्यायचे किंवा दान करायचे. कुंभमेळ्या संदर्भातील हा पहिला ऐतिहासिक संदर्भ आहे, असे अनामिका रॉय सांगतात.

त्यांनी पुढे सांगितले की, हर्षवर्धनांच्या राजवटीच्या आधी गुप्त काळात कुंभमेळा झाल्याचे कोणतेही ऐतिहासिक



पुरावे नाहीत.

**ऐतिहासिक नोंद :**

मुगलकालीन कागदपत्रांमध्ये कुंभमेळ्याच्या उत्सवाचे संदर्भ आढळतात. खुलासातू-त-तारीख या सोळाव्या शतकातील ग्रंथात असा उल्लेख असल्याचे इतिहासाचे अभ्यासक नोंदवतात. पण याविषयी सर्वच अभ्यासक एकमताने काही नोंदवतात असे नाही, त्यांच्यामध्ये मत-मतांतरे आहेत.

**भाविकांची उपस्थिती :**

भारतभरातून कोट्यवधी हिंदू भाविक कुंभमेळ्यात हजेरी लावतात व पवित्र गंगा नदीत स्नान करतात. इस.स. २००१ साली पार पडलेल्या महाकुंभमेळ्यात अधिकृत अंदाजानुसार ३ ते ७ कोटी भाविकांनी भाग घेतला होता.

**ज्योतिषीय संबंध :**

सूर्याभोवती भ्रमण करणारे नऊ ग्रह एका रेषेत येतात त्यावेळी सूर्याचे किरण ज्या स्थानावर पडतात तिथे कुंभमेळ्याचे औचित्य असे मानले जाते.

**शाही स्नान :**

शाही स्नान हे कुंभमेळ्यातील विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. शाही स्नान म्हणजे एखाद्या विशिष्ट मुहूर्तावर तीर्थक्षेत्र स्थानी जाऊन तेथील नदीमध्ये स्नान करणे, सूर्याला अर्घ्य देणे, नदीची पूजा करणे असे याचे स्वरूप असते. कुंभमेळ्यातील शाही स्नानात विविध आखाडे आणि त्यातील साधू यांना अग्रक्रम दिला जातो. त्याची विशेष शोभायात्रा निघते. त्यांचे स्नान झाल्यावर नंतर अन्य भाविक नदीत स्नान करतात अशी प्रथा प्रचलित आहे.

**जागतिक सांस्कृतिक वारसा :**

कुंभमेळा हा असा धार्मिक उत्सव आहे की ज्याचे कोणतेही औपचारिक निमंत्रण दिले जात नाही, असे असूनही भाविक या सोहळ्याला मोठ्या प्रमाणावर उपस्थित राहतात. हे वैशिष्ट्य लक्षात घेता युनेस्कोने कुंभमेळ्याला 'जागतिक सांस्कृतिक वारसा' म्हणून घोषित केले आहे.

**साधू समुहाचा सहभाग :**

कुंभमेळ्यात विविध आखाड्यांच्या साधू मंडळींचा सहभाग असतो हे याचे वैशिष्ट्य आणि अविभाज्य भाग मानला जातो. या विषयावर अख्यायिका मानली जाते की, भगीरथाने प्रयत्न करूनही गंगा नदी पृथ्वीवर अवतरण करायला तयार होत नव्हती, त्यावेळी तिला असे सांगितले गेले की, कुंभमेळा प्रसंगी तुझ्या पाण्यात साधू स्नान करतील. हे ऐकताच तिने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. त्यामुळे कुंभमेळ्यात विविध आखाडे आणि साधू यांचे विशेष महत्व आहे. या उत्सवात विविध साधू आणि त्यांचे आखाडे यामध्ये होम-हवन, वैदिक मंत्रांचे पठण, प्रवचने, लोकांना उपदेश करणे असे अनेक विविध उपक्रम पहायला मिळतात.

**आखाडा संकल्पना :**

कुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या साधू त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण आखाड्याचे सदस्य असतात. काही साधू स्वतंत्रपणेही सहभागी होताना दिसतात. शैव, वैष्णव, उदासीन, नागा, नागपंथी, परी (केवळ स्त्रिया), किन्नर (तृतीय पंथीय सदस्य) असे आखाडे आहेत.

मुस्लिम शासकांच्या आक्रमणापासून हिंदू धर्माचे तसेच हिंदू तीर्थक्षेत्र स्थळांचे रक्षण करण्यासाठी असे आखाडे निर्माण झाले असे मानले जाते. सैनिकांच्या समूहाप्रमाणे या आखाड्यांचे नियम, आचरण असते. कुंभमेळ्यात या सर्व

आखाड्यांच्या साधूंचे विशेष आदराने स्वागत केले जाते. त्यांना सेवा-सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात.

**पर्यटन :**

कुंभमेळा आणि त्याचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व हे जगभरात मान्यता पावले आहे. त्यामुळे कुंभमेळा पहायला केवळ भाविकच येतात असे नाही तर जगभरातून देशी आणि विदेशातील पर्यटकही या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी येतात. कुंभमेळा हे आर्थिक उलाढालीचे केंद्र मानले जाते.

**अघोरी कोण असतात :**

लंडनमधील स्कूल ऑफ आफ्रिकन अँड ओरिएंटल स्टडीज्मध्ये संस्कृत शिकवणारे जेम्स मॅलिन्सन सांगतात, 'आध्यात्मिक ज्ञान मिळवायचे असेल आणि ईश्वराला भेटायचे असेल तर शुद्धतेच्या नियमांपलीकडे जावे लागेल, असा अघोर दर्शनाचा सिद्धांत सांगतो.'

मॅलिन्सन स्वत: एक महंत आणि गुरु आहेत. मात्र त्यांच्या पंथात अघोरी संप्रदायातील प्रक्रिया वर्ज्य आहेत. मॅलिन्सन अनेक अघोरी सांधूंशी बोलले आहेत. त्या आधारावर ते सांगतात, सामान्यपणे ज्या गोष्टींची घृणा वाटते त्यांचा सामना करून ती घृणा नष्ट करणे हा अघोरी साधूंचा सिद्धांत आहे. चांगलं आणि वाईटाविषयीचे सामान्य नियम त्यांना मान्य नसतात. आध्यात्मिक प्रगतीचा त्यांचा मार्ग माणसाचे मांस आणि स्वत:चेच मल भक्षण करण्यासारख्या विचित्र क्रियांमधून जातो. मात्र इतरांनी वर्ज्य केलेल्या गोष्टींचे भक्षण करून ते परम चेतना प्राप्त करतात असा त्यांचा विश्वास आहे. अघोरी सामान्यपणे महादेवाची पूजा करतात त्यासोबतच ते महादेवाची पत्नी शक्तीचीही उपासना करतात.

उत्तर भारतात स्त्रिया अघोरी संप्रदायाच्या सदस्य बनू शकतात. पश्चिम बंगालमध्ये स्त्रिया स्मशानभूमीतही दिसतात. मात्र अघोरी संप्रदायातील स्त्रियांना कपडे परिधान करावे लागतात.

ठक्कर म्हणतात, बहुतांश माणसे मृत्युला घाबरतात. स्मशानभूमी मृत्यूचे प्रतीक आहे. मात्र अघोरी इथूनच सुरुवात करतात. ते सामान्य समाजाची मूल्य आणि नैतिकतेला आव्हान देऊ इच्छितात.

**कुंभ आणि महाकुंभ :**

कुंभ मेळा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा धार्मिक सोहळा आहे. शेकडो वर्षांपासून कुंभ मेळ्याची परंपरा सुरू आहे. यंदाचा कुंभमेळा अनेक अर्थांनी विशेष आहे. कारण यंदाचा कुंभ हा महाकुंभ असणार आहे. उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे या कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले असून जगभराती ४० कोटी नागरिक महाकुंभाला हजेरी लावणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. याच पार्श्वभूमीवर कुंभ आणि महाकुंभ यांच्यातील फरक समजवून घेऊ आणि कुंभ किती प्रकारचे असतात हे देखील जाणून घेऊ.

कुंभमेळ्याचे आयोजन चार शहरात केले जाते. ज्यामध्ये हरिद्वार, प्रयागराज, नाशिक व उज्जैनचा समावेश आहे. नाशिक व उज्जैन येथील कुंभमेळ्याला सामान्यत: सिंहस्थ म्हणतात आणि अन्य शहरात कुंभ अर्धकुंभ व महाकुंभाचे आयोजन केले जाते. कुंभमेळा हा दर तीन वर्षांनी असतो, महाकुंभमेळा दर १२ वर्षांनी असतो आणि महाकुंभ मेळा सर्वात पवित्र मानला जतो. कुंभमेळ्याचे चार प्रकार आहेत- पूर्ण कुंभ, अर्ध कुंभ, कुंभमेळा व महाकुंभ मेळा (महान).

**कुंभ :** कुंभचा अर्थ होतो कलश. प्रत्येक तीन वर्षांनी उज्जैन सोडून हरिद्वार, प्रयागराज व नाशिकमध्ये कुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. या पवित्र स्थानांवरील नद्यांमध्ये डुबकी मारून पापांपासून मुक्ती मिळते आणि मोक्ष प्राप्त होतो अशी भाविकांची श्रद्धा आहे.

**अर्धकुंभ :** अर्धचा अर्थ होतो अर्धा. हरिद्वार व प्रयागराज

या दोन पवित्र ठिकाणी दर सहा वर्षांनी अर्धकुंभ मेळ्याचे आयोजन होते.

**पूर्णकुंभ :** प्रत्येक १२ वर्षांनी पूर्णकुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. उदा. उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन होत आहे त्याच्या तीन वर्षानंतर हरिद्वार, त्यानंतर पुन्हा तीन वर्षानंतर प्रयागराज आणि पुन्हा पुढील तीन वर्षानंतर नाशिक येथे कुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. हे चक्र पूर्ण झाल्यास याला पूर्णकुंभ असे म्हणतात. याच पद्धतीने जेव्हा हरिद्वार, नाशिक किंवा प्रयागराजमध्ये १२ वर्षानंतर कुंभ मेळ्याचे आयोजन केले जाईल तेव्हा त्याला पूर्ण कुंभ असे म्हटले जाईल. हिंदू पंचांगानुसार देवतांचे १२ दिवस म्हणजे माणसांची १२ वर्षे असतात, असे म्हटले जाते. त्यामुळे पूर्ण कुंभ मेळ्याचे आयोजन देखील प्रत्येक १२ वर्षांनी होते.

**महाकुंभ :** मान्यतेनुसार प्रयागराजमध्ये १४४ वर्षांमध्ये एकदा महाकुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते. १४४ वर्षेच का? तर अशी मान्यता आहे की, कुंभमेळा १२ असतात, त्यातील चार मेळ्यांचे आयोजन पृथ्वीवर तर उर्वरित आठ देवलोकांत आयोजित केले जातात. या मान्यतेनुसार प्रत्येक १४४ वर्षानंतर प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्याचे आयोजन होते. २०१३ साली प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कारण त्याच वर्षी १४४ वर्षे पूर्ण झाली होती. आता पुढील कुंभ मेळा १३८ वर्षांनी आयोजित होणार असल्याचे सांगितले जाते.

**सिंहस्थ :** सिंहस्थचा संबंध सिंह राशीबरोबर आहे. सिंह राशीमध्ये बृहस्पती आणि मेष राशीमध्ये सूर्याचा प्रवेश झाल्यास उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हा योग प्रत्येक १२ वर्षांनंतर येतो. याच प्रकारचा योग घडून आल्यास नाशिकमध्येही सिंहस्थचे आयोजन केले जाते. या कुंभमुळेच ही धारणा प्रचलित झाली की, कुंभमेळ्याचे आयोजन प्रत्येक १२ वर्षांनी होते; पण हे खरे नाही. कुंभमेळा उज्जैन सोडल्यास इतर तीन शहरात तीन-तीन वर्षांनीच आयोजित होतो.

**कुंभमेळ्यासाठी महत्त्वाची ठिकाणे :**

**हरिद्वार :**

कुंभ राशीत बृहस्पतीचा प्रवेश झाल्यास आणि मेष राशीमध्ये सूर्याचा प्रवेश झाल्यास हरिद्वारमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. हरिद्वार व प्रयागराजमध्ये दोन कुंभ पर्वांमध्ये सहा वर्षांच्या अंतरात अर्धकुंभ मेळ्याचे आयोजन केले जाते.

**प्रयागराज :**

मेष राशीच्या चक्रात बृहस्पती किंवा सूर्य आणि चंद्राने मकर राशीत प्रवेश केल्यास अमावस्येच्या दिवशी प्रयागराजमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

**नाशिक :**

सिंह राशीत बृहस्पतीच्या प्रवेशानंतर कुंभमेळ्याचे आयोजन गोदावरीच्या तटावर नाशिकमध्ये केले जाते. अमावस्येच्या दिवशी बृहस्पती, सूर्य व चंद्र या ग्रहांनी कर्क राशीत प्रवेश केल्यानेही नाशिकमध्ये कुंभ मेळ्याचे आयोजन होते. या कुंभमेळ्याला सिंहस्थ म्हणतात. कारण या कार्यकाळात सिंह राशीत बृहस्पतीचा प्रवेश होतो.

**उज्जैन :**

सिंह राशीमध्ये बृहस्पती आणि मेष राशीमध्ये सूर्याच्या प्रवेशानंतर उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. या व्यतिरिक्त कार्तिक अमावस्येच्या दिवशी चंद्र व सूर्य एकत्र असताना आणि बृहस्पतीने तुला राशीत प्रवेश केल्यास उज्जैनमध्ये कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. यातदेखील सिंह राशीचा समावेश असल्याने याला सिंहस्थ कुंभमेळा असे म्हटले जाते.

# अभिजात मराठी भाषा

**जाधव ओंकार धनंजय**

बी.ए.तृतीय वर्ष

मराठी भाषा, जी भारतीय उपखंडातील एक प्रमुख भाषा आहे तिचा इतिहास आणि सांस्कृतिक वारसा अत्यंत समृद्ध आहे. दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ज्यामुळे तिच्या विकासाला एक नवा आयाम मिळाला आहे. हा निर्णय केवळ भाषिक ओळखीतच नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक स्तरावरही महत्त्वाचा आहे.



**अभिजात भाषेचा दर्जा...**

अभिजात भाषेचा दर्जा मिळवणे म्हणजे त्या भाषेतील साहित्य, कला आणि संस्कृतीच्या गौरवाची मान्यता मिळवणे. मराठी भाषेला हा दर्जा दिला गेल्यामुळे तिच्या ऐतिहासिक परंपरा साहित्यिक योगदान आणि सांस्कृतिक वारसा यांना मान्यता मिळाली. अभिजात भाषांच्या यादीत समावेश झाल्यामुळे मराठी भाषेची ओळख जागतिक स्तरावर वाढली आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी काही निकष आहेत. या भाषेचा इतिहास प्राचीन असावा, त्यात मौल्यवान साहित्य असावे आणि ती दुसऱ्या भाषांवर अवलंबून नसावी. मराठी भाषेचा इतिहास किमान १५०० ते २००० वर्षांचा आहे. आणि तिचे साहित्य विविध शतकांमध्ये विकसित झाले आहे. यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी आवश्यक निकष पूर्ण होते म्हणून केंद्र शासनाने दि. ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात दर्जा दिला गेला आहे.

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर होणारे लाभ...

**१) संशोधन आणि अभ्यासाला चालना :**

अभिजात दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेच्या बोलीचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन मिळेल. यामुळे भाषाशास्त्रज्ञ आणि संशोधकांना अधिक संधी उलपब्ध झाल्यावर मराठी भाषेत मोठ्या प्रमाणावर संशोधन मोहिम सुरू होऊन मराठी भाषा अधिक विस्तृत होईल.

**२) विद्यापिठांमध्ये शिक्षण :**

भारतातील ४५० विद्यापिठांमध्ये मराठी भाषा शिकण्याची सुविधा उपलब्ध होईल. यामुळे मराठी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातील कोणत्याही विद्यापिठात त्यांच्या मातृभाषेत उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळेल त्यामुळे मराठी भाषेचा अधिक प्रचार व प्रसार होऊन संपूर्ण देशभरात मराठी भाषेचे अभ्यासक निर्माण होतील व ते त्यांच्या त्यांच्या पद्धतीने मराठी भाषेमध्ये लिखाण करतील. त्यामुळे मराठी भाषेच्या साहित्यात आणखी भर पडेल.

**३) प्राचीन ग्रंथांचे अनुवाद :**

मराठीतील प्राचीन ग्रंथांना अनुवादित करण्यास सुरुवात होईल. ज्यामुळे या ग्रंथांचा व्यापक प्रसार होईल आणि त्यांचे महत्त्व अधिक लोकांपर्यंत पोहोचेल. मराठीतील हे प्राचीन ग्रंथ अनेक भाषांत अनुवादित झाल्यानंतर मराठी भाषा ग्रंथ संस्कृती यांचा अधिक मोठ्या प्रामणावर विस्तार होण्यास मदत मिळणार आहे.

**४) ग्रंथालयांचे सशक्तीकरण :**

राज्यातील हजारो ग्रंथालयांसाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरेल. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे राज्यातील ग्रंथालयांना अधिक संसाधने आणि अनुदान मिळेल. ज्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र वाढेल. प्रत्येक ग्रंथालयामध्ये मोठ्या प्रमाणावर ग्रंथ साहित्य खरेदी होईल व ते पर्यायाने मराठी भाषिक वाचकांपर्यंत पोहोचेल. त्यातून मराठी साहित्याचा प्रचार व प्रसार होऊन भाषा अधिक समृद्ध होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू राहिल.

**५) संवर्धनासाठी मदत :**

मराठी भाषेच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना मोठी मदत मिळेल. यामुळे भाषेच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम राबवले जातील. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे मराठी भाषेसाठी कार्य करणाऱ्या विविध संस्था, व्यक्ती आणि विद्यार्थ्यांना भाषेच्या प्रचार प्रसारणासाठी तसेच भाषा वृद्धींगत करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मदत मिळणे शक्य होणार आहे. ही मदत मिळाल्यानंतर मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध उपक्रम ग्रामस्तरापासून ते शहरी भागापर्यंत राबवणे शक्य होणार आहे. त्यातून मराठी भाषेचा अधिक जोमाने विकास होण्यास नक्कीच मदत मिळेल.

**६) राष्ट्रीय पुरस्कार :**

अभिजात भाषेतील स्कॉलर्ससाठी दरवर्षी दोन राष्ट्रीय पुरस्कार दिले जातात. यामुळे मराठी भाषेत काम

करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळेल. प्रत्येक वर्षी मराठी भाषेसाठी कार्य करणाऱ्या साहित्यिकांना दोन राष्ट्रीय पुरस्कार देण्यात येतात. असे पुरस्कार मिळाल्यास मराठी भाषा संवर्धनात कार्य करणाऱ्या अनेकांसाठी ते प्रोत्साहन ठरेल व त्यातूनच मराठीचा विकास होण्यास मदत होईल.

**मराठी भाषेचे सांस्कृतिक महत्त्व :**

मराठी भाषा केवळ एक संवाद साधण्याचे साधन नाही तर ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. मराठी भाषेत अनेक महान कवी, लेखक आणि विचारवंत झाले आहेत. ज्यांनी आपल्या लेखनाद्वारे समाजातील विविध मुद्द्यांवर प्रकाश टाकला आहे. मराठी भाषेच्या साहित्याने भारतीय साहित्याला एक अद्वितीय स्थान दिले आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषेत आपल्या विचारांची मांडणी केली आहे. यामुळे मराठी भाषेचा सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध झाला आहे.

**भाषेच्या संवर्धनाची आवश्यकता :**

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषेच्या संवर्धनाची आवश्यकता० अधिक महत्त्वाची बनली आहे. भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले जाणे गरजेचे आहे, जसे की,

भाषा शास्त्रीय संधोधन : भाषा शास्त्रज्ञांनी मराठी भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

साहित्यिक उपक्रम : साहित्यिक कार्यक्रम, कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे.

तंत्रज्ञानाचा वापर : डिजीटल माध्यमांचा वापर करून मराठी भाषेचा प्रसार करणे आवश्यक आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे तिच्या विकासाला एक नवा आयाम मिळाला आहे. या दर्जामुळे मराठी भाषेच्या अभ्यास, संशोधन आणि साहित्यिक कार्याला प्रोत्साहन मिळेल. यामुळे मराठी भाषेचा सांस्कृतिक वारसा जपला जाईल आणि तिचा विकास होईल. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. जेणेकरून भविष्यातही ही भाषा समृद्ध होईल.

मराठी भाषा केवळ संवाद साधण्याचे एक साधन नाही तर ती एक सांस्कृतिक ओळख आहे. सामाजिक एकता आणि शैक्षणिक समृद्धीचे प्रतीक आहे. यामुळे मराठी भाषेच्या संवर्धनाकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी राज्यशासन प्रयत्नशील आहेच तसेच ते प्रयत्नही करत आहेत. परंतु प्रत्येक मराठी भाषिकाची ही जबाबदारी आहे की आपली मातृभाषा समृद्ध झाली पाहिजे. तर चला आपण सर्वजण मिळून मराठी भाषेचे संवर्धन करू या! जेणेकरून येणाऱ्या पिढ्या या समृद्ध वारशाचा भाग बनू शकतील.

# महाकुंभ मेळा : आध्यात्मिक उन्नतीचे प्रतीक

**माशाळकर वैष्णवी संतोष**
बी.ए.द्वितीय वर्ष

महाकुंभ मेळा हा भारतीय संस्कृतीचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि पवित्र सण आहे. हा मेळा प्रत्येक १२ वर्षांनी चार वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचे आयोजन केले जाते. ते चार पवित्र स्थान म्हणजे प्रयागराज (इलाहाबाद), हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक होय. यातील प्रत्येक ठिकाणी तीन वेगवेगळ्या कुंभमेळ्यांचे आयोजन केले जाते. त्यामुळे प्रत्येक स्थानावर प्रत्येक १२ वर्षांनी महाकुंभ मेळा भरतो. हा मेळा हिंदू धर्मातील सर्वात मोठा धार्मिक सण मानला जातो आणि यात लाखो-करोडो भाविक सहभागी होतात. महाकुंभ मेळा हा एक विशिष्ट धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे. तर भारतीय संस्कृती ही एक विशाल आणि बहुआयामी संकल्पना आहे, ज्यात भारताच्या इतिहासात परंपरा, धर्म, कला, साहित्य, तत्त्वज्ञान आणि जीवनशैलीचा समावेश होतो.

**१) प्रयागराज :**

प्रयागराज हे गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती या तीन नद्यांच्या संगमावर वसलेले आहे. या संगमाला 'त्रिवेणी संगम' असे म्हणतात.

**धार्मिक महत्त्व :**

हिंदू धर्मात प्रयागराजला सर्वात पवित्र तीर्थक्षेत्र मानले जाते. तेथे स्थान केल्याने मोक्षप्राप्ती होते अशी हिंदू धर्मातील भाविक लोकांची श्रद्धा आहे.

**महाकुंभ मेळा :**

प्रयागराज येथे महाकुंभ मेळा सर्वात मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. येथे 'माघ मेळा' (सामान्य कुंभ) आणि महाकुंभ मेळा असे दोन उत्सव साजरे केले जातात.

**पौराणिक संदर्भ :**

पुराणांनुसार समुद्र मंथनातून निघालेल्या अमृत कलशाचे थेंब प्रयागराज येथे पडल्याने प्रयागराजमध्ये महाकुंभ मेळा दर १२ वर्षांनी येथे साजरा केला जातो.

**२) हरिद्वार :**

हरिद्वार हे गंगा नदीच्या काठावर वसलेले शहर आहे. गंगा नदी हिमालयाच्या पायथ्याशी आहे.

**धार्मिक महत्त्व :**

हरिद्वारला 'गंगाद्वार' असेही म्हणतात, कारण गंगा नदी हिमालयातून येथे प्रवेश करते. येथे स्नान केल्याने पापे धुतली जातात अशी भाविक लोकांनी श्रद्धा आहे.

**महाकुंभ मेळा :**

हरिद्वार येथे महाकुंभ मेळा हा प्रत्येक १२ वर्षांनी भरतो. येथे 'हर की पौडी' हे सर्वात पवित्र स्थान आहे. येथे हरिद्वार येथील पवित्र स्नान या ठिकाणी केले जाते.

**पौराणिक संदर्भ :**

हरिद्वार येथे अमृत कलशाचे थेंब पडल्याने या ठिकाणी महाकुंभ मेळा पवित्र मानला जातो.

**३) उज्जैन (मध्य प्रदेश)**

उज्जैन हे शिप्रा नदीच्या काठावर वसलेले आहे. हे शहर प्राचीन काळापासून हिंदू धर्मातील सात पवित्र तीर्थ क्षेत्रांपैकी एक आहे.

**धार्मिक महत्त्व :**

उज्जैनला 'महाकालाची नगरी' म्हणून ओळखले जाते. येथे 'महाकालेश्वर ज्योतिर्लिंग' आहे, जे हिंदू लोकांसाठी अत्यंत पवित्र स्थान आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी ते एक आहे.

**महाकुंभ मेळा :**

उज्जैन येथे महाकुंभ मेळा प्रत्येक १२ वर्षांनी भरतो. उज्जैन येथे 'सिंहस्थ कुंभमेळा' म्हणून ओळखला जाणारा उत्सव साजरा केला जातो.

**पौराणिक संदर्भ :**

उज्जैन येथे अमृत कलशाचे थेंब पडले असे मानले जाते. त्यामुळे उज्जैन येथे महाकुंभ मेळा भाविक लोकांसाठी दर १२ वर्षांनी साजरा केला जातो.

**४) नाशिक (महाराष्ट्र) :**

नाशिक हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले शहर आहे. गोदावरी ही दक्षिण भारतातील सर्वात पवित्र नदी मानली जाते.

**धार्मिक महत्त्व :**

नाशिकला 'पंचवटी' म्हणूनही ओळखले जाते. कारण रामायण काळात भगवान राम, सीता आणि लक्ष्मण यांनी येथे वास्तव्य केले होते. नाशिक येथे 'काळाराम मंदिर' आणि 'त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग' आहे.

**महाकुंभ मेळा :**

नाशिक येथे महाकुंभ मेळा १२ वर्षांनी भरतो. येथे 'रामकुंड' आणि 'कुशावर्त कुंड' ही पवित्र स्नान करण्याची ठिकाणे आहेत.

**पौराणिक संदर्भ :**

नाशिक येथे अमृत कलशाचे थेंब पडल्याने येथे म्हणजेच नाशिकमध्ये महाकुंभाचे आयोजन केले जाते.

**अमृत कलशाचे थेंब पडण्याचे कारण**

महाकुंभ मेळ्याच्या पौराणिक कथेच्या संदर्भात समुद्र मंथानाशी आहे, जे हिंदू धर्मातील प्रमुख घटनांपैकी एक मानले जाते. या कथेचा उल्लेख विष्णू पुराण, भागवत पुराण आणि महाभारतासारख्या ग्रंथामध्ये आढळतो. समुद्र मंथनावेळी देवता आणि आसुरांनी एकत्र येवून क्षीरसागर मंथन केले. या मंथनातून अनेक रत्ने, विष आणि शेवटी अमृतकुंभ (अमृत कलश) प्रकट झाला. अमृतावर अधिकार मिळवण्यासाठी देवता आणि आसुरांमध्ये संघर्ष सुरू झाला. अमृतकलश मिळाल्यानंतर देवतांनी त्यांचे रक्षण करण्याची जबाबदारी भगवान विष्णुवर सोपवली. त्यांनी मोहिनी अवतार धारण करून अमृत फक्त देवतांनाच मिळेल याची व्यवस्था केली. मात्र या संघर्षादरम्यान गरुडाने अमृतकलश घेवून उड्डाण केले आणि पृथ्वीवरील चार प्रमुख ठिकाणी अमृताचे काही थेंब पडले व तेथे मंदिरांची उभारणी होऊन प्रत्येक १२ वर्षाला महाकुंभ होण्याचे आयोजन केले. ते प्रमुख चार ठिकाणी प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक ही पवित्र स्थाने मानली जातात. या ठिकाणी दर १२ वर्षांनी महाकुंभ मेळा साजरा केला जातो. असे मानले जाते की या ठिकाणी कुंभमेळ्याच्या वेळी स्नान केल्याने मोक्ष मिळतो आणि पापांचे क्षालन होते.

**महाकुंभ मेळ्याचे महत्त्व :**

महाकुंभ मेळा हिंदू धर्मातील सर्वात मोठा उत्सव आहे आणि तो अनेक कारणांमुळे महत्त्वाचा मानला जातो.

**पौराणिक संदर्भ आणि आध्यात्मिकता :**

कुंभमेळ्याची उत्पत्ती ही समुद्र मंथनाच्या कथेवर आधारित आहे. असे मानले जाते की, चार ठिकाणी अमृताचे

थेंब पडले. त्यामुळे या ठिकाणी स्नान केल्याने मोक्षाची प्राप्ती होते. या काळात ग्रह नक्षत्रांची स्थिती अत्यंत शुभ असते, त्यामुळे धार्मिक आणि आध्यात्मिक ऊर्जा अधिक शक्तीशाली मानली जाते.

**पवित्र स्नान (शाही स्नान) :**

कुंभमेळ्यातील सर्वात मोठा सोहळा म्हणजे पवित्र स्नान होय. असे मानले जाते की, या काळात पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने सर्व पापांपासून मुक्ती मिळते आणि आत्मा हा शुद्ध होतो. लाखो-करोडो भाविक, साधू-संत आणि आघोरी साधू हे गंगा, यमुना, क्षिप्रा आणि गोदावरीमध्ये स्नान करतात.

**संत, महात्मे आणि आखाड्यांचे मिलन :**

कुंभमेळा हा संत, महात्म्यांचा महासंगम असतो. विविध आखाड्याचे साधू आणि योगी येथे एकत्र येतात व त्यांच्या शिकवणी आणि प्रवचनांमधून आध्यात्मिक ज्ञान मिळते. हा योगी, साधू आणि गुढ तत्वज्ञ यांच्या भेटीचा अद्वितीय योग असतो.

**संस्कृती आणि परंपरांचे जतन :**

महाकुंभ मेळा हा भारतीय संस्कृती आणि हिंदू धर्माच्या परंपरांचे दर्शन घडवणारा उत्सव आहे. विविध प्रकारात धार्मिक विधी, भजन, कीर्तन, प्रवचने, योग शिबिरे आणि आध्यात्मिक चर्चासत्रे आयोजित केली जातात. महाकुंभ मेळ्यामध्ये भारतीय संस्कृतीचे आणि परंपरांचे जतन केले जाते. महाकुंभ मेळ्यात लाखो भाविक भक्तांची गर्दी दिसून येते.

**जगातील सर्वात मोठी धार्मिक यात्रा :**

महाकुंभ मेळ्यात लाखो भाविक भक्त सहभागी होतात. त्यामुळे हा जगातील सर्वात मोठा धार्मिक आणि सांस्कृतिक उत्सव मानला जातो. भारताच्या वेगवेगळ्या भागातून आणि जगभरातून लोक येथे एकत्र येतात. त्यामुळे विविध संस्कृतीचा मोठ्या प्रमाणात संगम या ठिकाणी होतो.

**महाकुंभ मेळ्यातील सामाजिक आणि सांस्कृतिक महत्त्व :**

महाकुंभ मेळा हा केवळ धार्मिक उत्सव नसून त्याला सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही मोठे महत्त्व आहे. हा मेळा भारतातील विविध समाज घटकांना आणि संस्कृतींना एकत्र आणण्याचे काम करतो. देशभरातून आणि जगभरातून लाखो भाविक या मेळ्यात सहभागी होतात. यात वेगवेगळ्या जाती, पंथ, वर्ग आणि भाषिक



पार्श्वभूमी असलेले लोक एकत्र येतात. त्यामुळे सामाजिक ऐक्य आणि एकात्मतेला चालना मिळते. विविध संत-महात्म्यांची प्रवचने आणि विचार यामुळे समाजात सहिष्णुता आणि बंधुभाव वाढतो.

महाकुंभ मेळ्यात अनेक समाजसेवी संस्था आणि धार्मिक संघटना गरीब, गरजू आणि भुकेल्यांना अन्नदान, वस्त्रदान, मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आणि अन्य सेवाभावी उपक्रम आयोजित करत असतात. योग, ध्यान आणि आयुर्वेद यांसारख्या भारतीय पारंपरिक शास्त्रांचे महत्त्व पटवून दिले जाते. जगभरातून साधू-संत, विचारवंत आणि योगगुरू येथे येवून त्यांच्या शिकवणी आणि ज्ञानाचा प्रसार करतात. लाखो लोकांच्या सहभागामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. हॉटेल, वाहतूक, हस्तकला व्यवसाय आणि धार्मिक साहित्य विकणाऱ्या छोट्या व्यावसायिकांना मोठ्या प्रमाणात फायदा होतो. स्थानिक कलाकार आणि पारंपरिक व्यवसायांना देखील प्रोत्साहन मिळते.

महाकुंभ मेळा हा भारतीय संस्कृतीचे संचित आणि धार्मिक परंपरांचा एक महत्त्वाचा भाग आहे. विविध प्रदेशातील भक्त वेगवेगळ्या पारंपरिक वेशभुषा, नृत्य, संगीत आणि भजन-कीर्तन यासह सहभागी होतात. वेद, उपनिषिदे, पुराणे आणि संतवाणी यांचा प्रचार आणि प्रसार या ठिकाणी केला जातो. गंगा, यमुना, क्षिप्रा आणि गोदावरी या नद्यांच्या पावित्र्याची शिकवण या मेळाव्यातून दिली जाते.

विविध आखाड्यांचे संन्यासी, नागा साधू, आघोरी साधू, वैदिक विद्वान आणि संत पुरुष महाकुंभात सहभागी होतात. त्यांच्या विचारधारा आणि तत्त्वज्ञान यांचा प्रचार या ठिकाणी केला जातो. यामुळे भारतीय आध्यात्मिकतेचा वारसा पुढे जातो. महाकुंभ मेळ्यात धर्म, तत्त्वज्ञान, योग, आयुर्वेद आणि ज्योतिष यांसारख्या विषयांवर चर्चा आणि प्रवचने आयोजित केली जातात. संत महात्मे आणि विचारवंत एकत्र येवून अध्यात्म आणि जीवनशैलीवरील चर्चा करतात, त्यामुळे नव्या विचारसरणीचा प्रसार होतो.

**महाकुंभ मेळ्यातील स्नान :**

महाकुंभ मेळ्यातील पवित्र स्नान (शाही स्नान) हा सर्वात महत्त्वाचा धार्मिक विधी आहे. या स्नानाला मोक्षप्राप्तीचे साधन मानले जाते. लाखो भाविक या वेळी नद्यांमध्ये पवित्र स्नान करण्यासाठी एकत्र येतात. महाकुंभ मेळ्यातील प्रमुख स्नानाचे दिवस (शाही स्नानाचे मुहूर्त) हे विशिष्ट तीथीवर ठरलेले असतात. या दिवसांना 'शाही स्नान' किंवा राजयोग स्नान' असे म्हणतात.

१) मकर संक्रांती स्नान : कुंभमेळ्याची सुरुवात.
२) पौष पौर्णिमा स्नान : साधू-संतांचे आगमन.
३) मौनी अमावस्या स्नान : सर्वात मोठा स्नान दिवस.
४) वसंत पंचमी स्नान : ज्ञान आणि विद्या प्राप्तीसाठी.
५) माघी पौर्णिमा स्नान : दान आणि पुण्य कर्मासाठी.
६) महाशिवरात्री स्नान : आत्मशुद्धीसाठी.

महाकुंभ मेळ्याच्या आयोजनाचे स्थान म्हणजे त्रिवेणी संगम. जिथे गंगा, यमुना आणि पौराणिक सरस्वती नद्या एकत्र येतात. या संगमात स्नान केल्याने पापांचे नाश होवून मोक्ष मिळतो अशी श्रद्धा आहे. २०२५ मध्ये आयोजित केलेला महाकुंभ मेळा विशेष भाविकांनी मिळून आलेला होता. कारण त्यावेळी ग्रंहांची अशी स्थिती होती जी १४४ वर्षांत एकदाच येते. या मेळ्यात ६६ कोटीहून अधिक भाविकांनी सहभाग घेतला. ज्यामुळे तो जगातील सर्वात मोठा धार्मिक उत्सव ठरला. महाकुंभमेळ्याच्या काळात विविध धार्मिक विधी, सांस्कृतिक कार्यक्रम आणि साधू-संतांचे उपदेश आयोजित केले जातात. ज्यामुळे लाखो भक्त आध्यात्मिक उन्नतीसाठी एकत्रित येथे येतात.

# माय मराठी

**गोरे सुरज सिद्धेशवर**
बी.ए.तृतीय वर्ष

तो सूर्य ते चंद्र तारे
मराठीची माझ्या थोरवी गाती सारे
आकाशा परी मया तिची
ती आपुलकीची नाळ म्हणजे, माय मराठी।।

सह्याद्रीच्या कडाकडातून घुमते
नद्याच्या त्या डोहात डुंबते
मातीच्या कणाकणात रमते
ती विजयाची डरकाळी म्हणजे, माय मराठी।।

जिजाऊंच्या शिकवणीत झळकली
शिवरायांच्या म्यानात तळपली
सुलतानीचे मस्तक छाटती
ती स्वराज्याची तलवार म्हणजे, माय मराठी।।

लेखणी झाली समाज सुधारकांची
ती क्रांती झाली क्रांतीकारांची
गाथा झाली अमर वीरांची
ती लढाई स्वातंत्र्याची म्हणजे, माय मराठी।।

भजन गाता टाळ मृदंगात रमली
तुकयाच्या अभंगात रंगली
अमर झाली जी देवा चरणी
ती ज्ञानेशाची प्रार्थना म्हणजे, माय मराठी।।



# वंदे मातरम् : एक स्फुरण गीत

**पाचंगे देवांश बालाजी**
बी.ए.द्वितीय वर्ष

वंदे मातरम् हे भारताचे राष्ट्रीय गीत आहे जे बंकिमचंद्र चट्टोपाध्याय यांनी लिहिले आहे, जे आनंदमठ या त्यांच्या कादंबरीतून १८८२ साली प्रकाशित झाले. रविंद्रनाथ टागोर यांनी १८९६ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात हे गीत प्रथम गायले होते. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात हे गीत प्रेरणास्त्रोत ठरले. १९५० मध्ये भारताच्या संविधान सभेने हे भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले.

वंदे मातरम् या गीताची भाषा ही संस्कृत बंगाली मिश्रित आहे. 'वन्दे मातरम्' या शब्दाचा अर्थ आई / मातृभूमी मी तुला नमन करतो, वन्दन करतो. या वंदे मातरम् गीतातून भारतभूमीचे नैसर्गिक सौंदर्य, भारतीयांचा क्रांतीचा, शांतीचा, आपुलकीचा, प्रगतीचा नाद, त्यांचे धैर्य, सामर्थ्य, विद्वत्ता, मातृभूमीची वत्सलता व्यक्त होते. स्वातंत्र्य लढ्यात जनमनाच्या उद्घोषातून हे गीत बळ देत होते. आजही हे गीत राष्ट्रवादाला, देशभक्तांना नवी प्रेरणा, उभारी देते.

सुजलाम् सुफलाम मलयजशीतलाम्
सस्य श्यामला मातरम्

भारतभूमी / भारत देश हा सर्व जलस्त्रोतांनी परिपूर्ण आहे, सुजलाम आहे. भारताला सप्त सिंधूचा प्रदेश म्हणून ओळखले जाते. गंगा, यमुना, नर्मदा, कृष्णा, गोदावरी, कावेरी, ब्रह्मपुत्रा या नद्यांनी भारतीय प्रदेश समृद्ध केला. या जलसंपन्नतेमुळेच कवी प्रथम म्हणतो की भारतभूमी मातृभूमी ही सुजलाम आहे. शीतल निर्मळ पवित्र जल वाहत भारत देशात पाण्याला तीर्थ म्हणतात. जीवन अमृत म्हणतात. यातूनच आपली भारतीय संस्कृती ही जलस्त्रोतांना मान देत महत्त्व देते हे दिसून येते. ऋग्वेदात जलसूक्त आहे नासदीय सुक्तामध्ये 'उदक मंगलम' म्हणून तर जलसुक्तात 'आपोदेवम' म्हणजेच जलदेवता म्हणून संबोधले आहे. भारतभूमी सुफलाम् आहे. सुफलाम हा संस्कृत शब्द आहे. भारतभूमी ही सुखद फुलासारखी फुललेली, फळलेली आहे. कार्य किंवा ध्येय पूर्णपणे यशस्वी झाल्यावर आपण ते कार्य सुफळ संपूर्ण झाले असे म्हणतो. त्याचप्रमाणे सर्व प्रकारचे ध्येय कार्य, उत्कर्ष यशस्वी करणारी ही भूमी सुफलाम आहे. परिपूर्णतेसाठी सुफलाम हा शब्द वापरतात. भारतीय भूमी सुफलाम आहे.

केरळच्या प्रदेशात मलय पर्वत आहे. त्या पर्वतावर चंदनाची वृक्ष आहेत. त्यामुळे चंदनाला मलय असे सुद्धा म्हणतात किंवा त्या पर्वतावरून वाहणारा वारा म्हणजे मलयज आणि तो चंदनाच्या गुणांमुळे शीतल होऊन वाहतो. त्याप्रमाणे भारतीय धरा ही चंदनासारखी मलयजासारखी शीतल आहे. (तिथे पवर्ततावरून वाहणारा म्हणजेच मलयापासून जन्मलेला वारा म्हणजे 'मलयज' वाऱ्यासारखी शीतल आहे).

भारत भूमी ही कृषीवलांची शेतकऱ्यांची भूमी आहे. भारत हा कृषी प्रधान देश आहे. सस्य म्हणजे पीक. या धान्यांनी, कणांनी बहरलेले पीक, शेत यामुळे धरती हिरवीगार वाटते. या गडद हिरव्या रंगामुळे या काळ्या मातीमुळे भारतमाता श्यामल वाटते. सस्यशामल आहे. सुंदर

दिसते.

शुभ्र पांढऱ्या आकाशातल्या लुकलुकणाऱ्या चमचमणाऱ्या ज्योत्सना. त्यांच्या चांदण्याने पुलकीत हर्ष आनंदित रात्रींनी फुललेल्या फुलांच्या गोड हसण्याने कुसुमांनी फुलांनी वृक्षांचे दल त्या दलांनी समुहांनी भारत भूमी आपली मातृभूमी सुशोभित झाली आहे. शोभून दिसत आहे. तारका मंडल, नक्षत्र, तीनही ऋतुतील रात्री, नाना प्रकारची फुलं, प्रांताप्रांतातील वृक्ष या विविधतेने नटलेली ही भारत भूमी आहे.

फुलापानांतून, लहान मुलांच्या हास्यातून, संगीताच्या मधुर स्वरांतून भारतमाता ही सुहासिनी वाटते. सुंदर स्मित हास्य करणारी आई हास्यवदना वाटते. भारतीयांच्या प्रत्येक आनंदोत्सवात गायल्या जाणाऱ्या गीतांमधून, संगीतातून जणू भारतमाताच सुमधूर भाष्य करते, बोलते आहे. अशी ही भारत माता सुमधूर गोड बोलणारी आहे. भारतीय संस्कृती ही सर्वांना जोडणारी सर्वांशी प्रेमाने वागणारी आहे. म्हणूनच कवींनी भारत मातेला सुहासिनी, सुमधुर भाषिणी म्हटले आहे. अशा या सुखांनी परिपूर्ण भरलेल्या मातृभूमीस सौख्याचा वर देणाऱ्या मातेस मी वंदन करतो, नमन करतो.

सप्त कोटी कंठ कलकल निनाद कराले
द्विसप्तकोटि भुजैर्धृतखर-करवाले
के बोले मा तु मि अबले
बहुबल धारिणीम नमामि तारिणीम्
विपुदलवारिणीम् मारतम्।।

सात नद्यांच्या सात पर्वतांच्या प्रदेशातील सर्व भारतीयांच्या या सप्त कोटी भारतीयांच्या कंठातून पाण्यासारखा कलकल करत वाहणाऱ्या पाण्यासमान कानांना प्रिय वाटणारा नाद निनाद. तो नाद एकजुटीचा, राष्ट्रभक्तीचा, शांतीचा, आपुलकीचा, प्रेमभावनेचा असेल. याच भारतीयांचे कष्टाने, मेहनतीने, राकट बळकट झालेले सात कोटी लोकांच्या द्विसप्त कोटी हात, त्या हातांनी खंङग् अर्थात तलवार धारण केली आहे. क्रांतीसाठी, शांतीसाठी, स्वातंत्र्यासाठी या सर्व भारत पुत्रांना बळ देणारी भारत माता. मग या भारत मातेला कोण आहे जो अबला म्हणेल. नाही, नाही आई तू अबला नाहीस, दुर्बल नाहीस. आपल्या पुत्रांना बळ देणारी, बळ धारण करणारी आहेस. संकटापासून रक्षण करणारी, तारणारी आहेस. शत्रूच्या दलांना समूहांना मारणारी आहेस, त्यांना हरवून जिंकणारी आहेस. अशा या भारत मातेला मी वंदन करतो. नमन करतो. भारतीयांच्या मनातला कमीपणाचा, दुर्बलतेचा न्यूनगंड दूर करून कवी म्हणत आहे की, तुम्ही वीर आहात. तुमचे हात तलवारी समान कणखर आहेत. तुमच्या या बाहुबलानेच शत्रूदल मरून जाईल. तुम्ही विजयी व्हाल. अशा वीर पुत्रांची आईही वीरच आहे. भारतीय संस्कृती ही शांती आणि क्रांतीची संस्कृती आहे. क्षमेसोबत शौर्य, दंडही आहे. हा देश दुर्बलांचा नाही. वीरांचा आहे. भारतीयांना उद्देशून सांगत आहे. भारत माता ही भारतीयांचे प्रतीक आहे आणि भारतीय स्त्रियांही शूर वीर धाडसी आहेत. त्यांनीही वेळोवेळी आपल्या शौर्याने भारतमातेला अभिमानास पात्र केले आहे.

तुमि विद्या तुमि धर्म तुमि हृदि तुमि मर्म
त्व हि प्राणा: शरीरे बाहुते तुमि मा शक्ति
हृदये तुमि मा भक्ती
तौमारै प्रतिमा मन्दिरे मन्दिरे।।

कवी भारत मातेस संबोधून म्हणत आहे की, हे भारत माता, तूच विद्या आहेस, ज्ञान आहेस. तू धर्म आहेस, तू योग्य मार्ग, कर्म आहेस, तू समृद्धी आहे, तूच जीवनाचा सार आहेस, गूढ आहेस, मर्म आहेस. भारतीयांचे ज्ञान, विज्ञान, संस्कार, कर्तव्य हा धर्मही तूच आहेस. विकास प्रगती तूच आहेस. तुझ्यामुळेच हे शक्य आहे. तू प्रत्येकाच्या शरीरातील प्राण आहेस. बाहुबळांमधील तू शक्ती आहेस. हृदयातली तू भक्ती आहेस. ही मातृभूमीच आमचा प्राण, आमची शक्ती अन आमची भक्ती आहे. इथल्या प्रत्येक मंदिरामध्ये हे भारतमाता तुझीच प्रतिमा

आहे. आम्ही वेगवेगळ्या रूपात स्वरूपात तुझी पूजा अर्चना करतो. आमच्या मन मंदिरातही तूच आहेस. एका राष्ट्राला- जमिनीला आईचा दर्जा देवून राष्ट्रभक्ती निर्माण करणे ही भारतीय संस्कृती आहे. अशा या मनमंदिरात विराजीत भारत मातेला मी वंदन करतो.

त्वं ही दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदल विहारीणी
वाणी विद्यादायिनी नमामित्वाम
नमामि कमलां अमलां अतुलाम्
सुजलाम सुफलाम मातरम्

हे भारत माते तू दुर्गा आहेस, आपल्या दहा हातांमध्ये शस्त्र धारण केलेली देवी आहेस. 'दुर्गा दुर्गती नाथिनी'. अज्ञान अविद्या यांचा नाश करणारी शक्ती आहेस. भारतीयांचे कार्यक्षम हात म्हणजे दशप्रहरणधारिणी दुर्गा ती शक्ती रूपाने आपल्याला सहाय्य करते. प्रगती विकास घडवून आणते. दुर्गतीचा नाश करते. दुर्गा ही भारतीय स्त्री शक्तीचेही प्रतिनिधित्व करते. ज्या कृषी, व्यापार, शिक्षण अशा अनेक क्षेत्रात क्रांती घडवून योगदान देत आहेत. नवनिर्मितीचे प्रतीक म्हणजे कमळ. भारतीय संस्कृतीत कमळाला विशेष महत्त्व आहे. कमला म्हणजे लक्ष्मी, अर्थात धन-समृद्धता. भारतीय व्यापार उद्योग धंदे, कारखाने यातून राष्ट्राचा विकास होतो. अर्थविनिमयता होत असते. पैसा हे चलन आहे. लक्ष्मी ही चल आहे. ती विहार करत असते. या चलनांमधूनच आर्थिक विकास होत असतो. म्हणूनच कवीने लक्ष्मीचे रूपक वापरले आहे.

वाणी, भाषा, विद्या देणारी तू सरस्वती आहेस. साहित्य, संपदा, वाङ्मय, ग्रंथ, विचारवंत, संत यांच्या वाणीने उपदेशाने भारतीय लोक हे सुज्ञ, शहाणी झाली आहेत. भारत भूमी ही ज्ञानाने प्रकाशमान आहे. म्हणून भारताला 'आभायाम रत इति भारत' असे म्हणतात. जो ज्ञानाच्या प्रकाशात रत आहे तो भारत. 'तमसो मा ज्योतिर्गमय' ही भारतीय संस्कृती आहे. अशा या भारत मातेस नमन आहे. निर्मळ कमळासारख्या, विशुद्ध अमल व जिची तुलना करता येणार नाही. अतुल्य भारतास जलाने संपन्न, परिपूर्ण सुफल अशा या भारत मातेला मी वंदन करतो, नमन करतो.

श्यामलां सरलां सुस्मितां भूषिताम्
धरणी भरणी मातरम्
वन्दे मातरम्... वंदे मातरम्

हिरव्या रंगाने काळ्या धरतीत श्यामल, सरल, सुहास्य स्मिताने भूषित भारतीयांना धारण करणारी, त्यांचे अन्न, धान्य, पाणी, स्वच्छ हवा, जीवन संसाधनांनी भरण पोषण करणारी भारत माता ही आई आहे. या मातेस मी वंदन करतो, नमन करतो.

# कुंभमेळा आणि भारतीय संस्कृती

**पांचाळ व्यंकट विलास**
एम.ए.द्वितीय वर्ष

कुंभमेळा एक प्रमुख हिंदू धार्मिक यात्रा आहे जो की भारतामध्ये दर चार वर्षांमध्ये साजरा केला जातो. हा कुंभमेळा भारतातील प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक या चार प्रमुख ठिकाणी आयोजित केला जातो. ही यात्रा विशेष करून अशा वेळी आयोजित करतात की जेव्हा ग्रहांची स्थितीचे एक विशेष धार्मिक महत्त्व आहे.

कुंभमेळा आयोजन संप्रदाय, संस्कृती आणि धर्म यांचा सामूहिक अनुभवांचे प्रतीक आहे. यामध्ये लाखो भाविक स्नान करण्यासाठी येतात. तसेच पूजा, आरती करणे व संतांचे आशीर्वाद घेण्यासाठी येतात. कुंभमेळ्याचे आयोजन तेव्हा केले जाते जेव्हा सूर्य, चंद्र आणि गुरू ग्रह एका विशिष्ट राशीमध्ये येतात. त्यास 'महाकुंभ' असे म्हणतात. या वेळी विशेष धार्मिक महत्त्व आहे आणि भाविक गंगा, यमुना आणि इतर पवित्र नदींमध्ये स्नान करतात व त्यांचे पाप नष्ट होऊन त्यांना मोक्षाची प्राप्ती होते. कुंभमेळ्याचे आयोजन एक अद्भूत धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उत्सव आहे. यामध्ये केवळ भारतातीलच नाही तर इतर देशांमधील लोक या ठिकाणी मोठ्या संख्येने येतात.

कुंभमेळा भारतीय संस्कृतीचा एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक भाग आहे. भारतीय जीवनशैली, धार्मिकता, परंपरा आणि आध्यात्मिकतेचा अद्वितीय संगम आहे. कुंभमेळा भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंना उजागर करतो आणि त्या माध्यमातून एकजूट, समर्पण आणि सकारात्मकतेचा संदेश दिला जातो.

**भारतीय संस्कृतीतील महत्त्व :**

भारतीय संस्कृती ही इतर संस्कृतींपेक्षा नेहमी श्रेष्ठ समजली जाते. कारण येथे असणारी धार्मिक वैविध्यता, रूढी, प्रथा, परंपरा यामुळे तिला वेगळे स्थान प्राप्त झालेले दिसून येते.

कुंभमेळा विविध पंथातील, भाषांतील आणि संस्कृतीतील लोकांना एकत्र आणतो. यामुळे असा एक संदेश जातो की भारतीय धर्म आणि संस्कृतीमध्ये विविधतेला मान्यता आहे आणि त्यामध्ये एकात्मतेचे दर्शन घडते.

कुंभमेळा हा आध्यात्मिक उन्नती व शांती साधण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. या ठिकाणी अनेक साधू, संत, तपस्वी व योगी येतात व त्यांच्या सान्निध्यात व्यक्ती आपली आध्यात्मिक उन्नती करतो व मन शांती प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो.

कुंभमेळ्यात परंपरा, संगीत, नृत्य, काव्य आणि इतर कलांचे मोठ्या प्रमाणात संवर्धन होताना दिसून येते. येथे विविध कलांचे आयोजन, तसेच साधू, संतांच्या उपदेश, कीर्तन, प्रवचन यातून आदान-प्रदान घडताना दिसून येते आणि भारतीय परंपरेचे जतन व संवर्धन होते.

कुंभमेळ्यात विविध जाती, धर्म, वंश आणि पंथाचे

लोक एकत्र येतात व त्यांच्यामध्ये विचारांची देवाण-घेवाण होत असते. या माध्यमातून जिथे सांस्कृतिक विविधतेची आदान-प्रदान होते. यातून लोकांमध्ये सामाजिक ऐक्याचे मूल्य रूजताना दिसून येते.

कुंभमेळ्यात अनेक लोक मोठ्या भक्तीभावाने स्नान करतात. मोठ्या श्रद्धेने धार्मिक अनुष्ठान, पूजा, आराधना करताना दिसून येतात. त्यातून लोकांमधील भक्तीचे दर्शन प्रकर्षाने जाणवते. कुंभमेळा केवळ धार्मिक उत्सव नसून भारतीय जीवनशैली, परंपरा व सांस्कृतिक धरोहराचे दर्शन आहे.



# मराठी भाषा व भारतीय संस्कृती

**पोलावार नंदिनी शिरिष**
बी.ए.प्रथम वर्ष

**संस्कृती म्हणजे काय:**

संस्कृती म्हणजे लोकांच्या विचार आणि वर्तनाचे नमुने होय. यात श्रद्धा, मूल्ये, आचार, नियम आणि सामाजिक, राजकीय आणि आर्थिक संघटनेचे नमुने समाविष्ट आहेत. आपण जे कपडे घालतो, जे अन्न खातो, जी भाषा बोलतो आणि ज्या देवाची पूजा करतो ते सर्व संस्कृतीचे पैलू आहेत. संस्कृती हा राष्ट्राचा आत्मा असतो. संस्कृतीच्या आधारे आपण त्याच्या भुतकाळातील आणि वर्तमानातील समृद्धीचा अनुभव घेऊ शकतो. आपल्या धार्मिक प्रथा, कर्मकांड, खेळ, कला आणि साहित्यात हे दिसून येते.



**भारतीय संस्कृती :**

भारतीय संस्कृती ही जगातील सर्व संस्कृतींमध्ये सर्वात जुनी आहे. अनेक चढ-उतारांचा सामना करूनही भारतीय संस्कृती आपल्या वैभवाने झळाळत आहे. ग्रीस, इजिप्त, रोम इत्यादी प्राचीन संस्कृती कारांतराने नष्ट झाल्या आणि त्यांचे अवशेष उरले. पण भारतीय संस्कृती आजही जीवंत आहे. त्याची मूलभूत तत्त्वे प्राचीन काळी होती तशीच आहेत. भगवान कृष्ण, महावीर आणि बुद्ध यांच्या शिकवणी आजपर्यंत जीवंत आहेत आणि प्रेरणास्त्रोत आहेत.

**मराठी अभिजात भाषा :**

मराठी भाषा जी भारतीय उखंडातील एक प्रमुख भाषा आहे. तिचा इतिहास आणि सांस्कृतिक वारसा अत्यंत समृद्ध आहे. दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. ज्यामुळे तिच्या विकासाला एक नवा आयाम मिळाला आहे. हा निर्णय केवळ भाषिक ओळखीतच नाही तर सांस्कृतिक आणि सामाजिक स्तरावरही महत्वाचा ठरला आहे.

**अभिजात भाषेचा दर्जा :**

अभिजात भाषेचा दर्जा मिळविणे म्हणजे त्या भाषेतील साहित्य, कला आणि संस्कृतीच्या गौरवाला मान्यता मिळवणे. मराठी भाषेला हा दर्जा दिला गेल्यामुळे तिच्या ऐतिहासिक परंपरा, साहित्यिक योगदान आणि सांस्कृतिक वारसा यांना मान्यता मिळाली. अभिजात भाषांच्या यादीत समावेश झाल्यामुळे मराठी भाषेची ओळख जागतिक स्तरावर वाढली आहे. अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी काही निकष आहेत. या भाषेचा इतिहास प्राचीन असावा, त्यात मौल्यवान साहित्य असावे आणि ती दुसऱ्या भाषांवर अवलंबून नसावी. मराठी भाषेचा इतिहास किमान दीड ते दोन हजार वर्षांचा आहे आणि मराठी भाषेचे साहित्य विविध शतकांमध्ये विकसित झाले आहे. यामुळे मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळवण्यासाठी आवश्यक निकष पूर्ण होते यामुळेच केंद्र शासनाने दिनांक ३ ऑक्टोबर २०२४ रोजी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे.

**मराठी भाषेचे सांस्कृतिक महत्त्व :**

मराठी भाषा केवळ एक संवाद साधण्याचे साधन नाही तर ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. मराठी भाषेत अनेक महान कवी, लेखक आणि विचारवंत आहेत. ज्यांनी आपल्या लेखनाद्वारे समाजातील विविध मुद्यांवर प्रकाश टाकला आहे. मराठी भाषेच्या साहित्याने भारतीय साहित्याला एक अद्वितीय स्थान दिले आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांनी मराठी भाषेत आपल्या विचारांची मांडणी केली आहे. यामुळे मराठी भाषेचा सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध झाला आहे.

# कुंभमेळा : भारतीय संस्कृतीचे महादर्शन

**रत्नपारखे अक्षय बालाजी**
एम.ए.प्रथम वर्ष

कुंभमेळा – भारतीय परंपरेत विशेषत: हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा सोहळा! कुंभमेळ्याची परंपरा ही शेकडो वर्षांपासून चालत आहे. दर १२ वर्षांनी आयोजित केल्या जाणाऱ्या कुंभमेळ्याला जगभरातून कोट्यवधी भाविक हजेरी लावतात. त्यात विशेषत्वाने उल्लेख करावा लागेल त्या नागा साधूंचा. ते फक्त कुंभमेळ्यातच जगासमोर येतात, इतर वेळेला त्यांचे निवासस्थान कोठे असते याचा आपण अंदाज देखील लावू शकत नाही. निसर्गाच्या सान्निध्यात निर्जनस्थळी त्यांचे वास्तव्य असते असा अंदाज बांधण्यात येतो. त्याबरोबरच विविध संत, महंतांच्या आखाड्यांच्या उपस्थितीमुळे कुंभमेळ्यास धार्मिक महत्त्व प्राप्त होते. संगमतीर्थावर नियोजित मुहूर्तांच्या वेळी होणाऱ्या शाही स्नानाच्या विधीमुळे कुंभमेळ्याचे धार्मिकरित्या महत्त्व वाढते.



जगभरातून कोट्यवधी भाविक कुंभमेळ्यासाठी दाखल होतात. ज्या शहरातील नद्यांच्या किनाऱ्यावर कुंभमेळा आयोजित केला जातो त्या नद्यांना देखील भारतीय परंपरेत विशेष महत्त्व प्राप्त आहे. कुंभमेळ्याचा उल्लेख प्राचीन कथा, ऐतिहासिक कागदपत्रांमध्ये आढळतात. या मागील प्राचीन कथा विशेष लोकप्रिय आहे. समुद्रमंथनावेळी देव आणि दानांमध्ये 'अमुल्य रत्न' आणि अमृत प्राप्त करून घेण्यासाठी मंद्राचल पर्वतास 'रवी' तर नागराजा वासुकीचा 'दोर' म्हणून उपयोग करण्यात आला. मंथनातून अमृतकलश बाहेर येत असल्याची बाब इंद्रपूत्र जयंतने हेरली व दानवांना अमृतकलश हाती लागू नये म्हणून धन्वंतरीच्या हातातून हा कुंभ घेऊन तो पळाला. राक्षस गुरु शुक्राचार्यांनी साध केल्याने राक्षसांनी त्याचा पाठलाग केला. देवलोकातील कालगणनेप्रमाणे देवांचा एक दिवस पृथ्वीवरील एक वर्ष एवढा मानला जातो. कलश दानवांच्या हाती पडू नये म्हणून बारा दिवस कलश घेऊन इंद्रपुत्र जयंत पळत होता. या कालावधीत ज्या चार ठिकाणी जयंताने कलश ठेवला ती चार ठिकाणे म्हणजे हरिद्वार, प्रयागराज, नाशिक (त्र्यंबकेश्वर) आणि उज्जैन होय. या चार ठिकाणी सूर्य, चंद्र आणि गुरू ग्रहांची विशिष्ट युती होते त्यावेळेस या ठिकाणी कुंभमेळा संपन्न होतो.

अमृतकलश दानवांपासून सुरक्षित ठेवण्यासाठी देवगुरु बृहस्पती आणि सूर्यपुत्र शनीदेव व चंद्राची मदत झाली. स्कंदपुराणामध्ये केवळ कलश ठेवला म्हणून नव्हे तर कलशातून अमृत सांडले म्हणून या ठिकाणी कुंभमेळा भरतो असा उल्लेख आहे. पहिल्यांदा या सोहळ्याचे कधी आयोजन झाले याचा ठोस पुरावा नाही. परंतु ८५० वषर्झंपूर्वी आदि शंकराचार्य यांनी याची सुरुवात केल्याचे सांगितले जाते. शाही स्नानाची सुरुवातही १४ ते १६ व्या शतकात झाली असण्याचा अंदाज आहे. चिनी प्रवासी ह्युएन त्सांग याने त्याच्या लिखाणामध्ये सम्राट हर्षवर्धनाच्या काळात अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे नमुद केले आहे. मुघल काळात १६६५ मध्ये लिहिलेल्या खुलासातु-त-तारिख गॅजेटमध्येही याचा उल्लेख आहे.

कुंभमेळ्याचे आयोजन दर बारा वर्षांनी केले जाते. प्रयागराज, हरिद्वार, नाशिक व उज्जैन या चार शहरांमध्ये याचे आयोजन केले जाते. याचे महाकुंभ, पुर्णकुंभ व अर्धकुंभ असे तीन प्रकार आहेत. यातील केवळ महाकुंभ मेळ्याचे आयोजन प्रयागराज येथे होते. प्रयागराज येथील गंगा, यमुना व सरस्वती नदींच्या त्रिवेणी संगमावर कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते. १२ कुंभमेळ्यांचे चक्र पूर्ण झाल्यामुळे १४४ वर्षांनी होणाऱ्या महाकुंभ मेळ्याला विशेष महत्त्व प्राप्त आहे. शाही स्नान करणाऱ्या व्यक्तीची त्याने केलेल्या पापातून मुक्तता होते असे मानले जाते. याशिवाय पितृशांती व मोक्षप्राप्तीसाठी हे स्नान महत्त्वाचे मानले जाते.

# मायबोली : अभिजात मराठी

**राठोडे दिव्या धनराज**
बी.ए.तृतीय वर्ष

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे हे भारतीय संस्कृतीसाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या निर्णयामुळे मराठी भाषेला अधिक महत्त्व मिळेल आणि तिची जगात प्रतिष्ठा वाढेल. तसेच मराठी भाषेच्या समृद्ध इतिहासाला आणि साहित्याला योग्य स्थान मिळेल यात शंका नाही.

**मराठी अभिजात भाषा आणि भारतीय संस्कृती :**

**अभिजात भाषेचा अर्थ :** अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी एका भाषेला प्राचीन इतिहास, समृद्ध साहित्य परंपरा आणि भाषाशास्त्राने निश्‍चित केलेल्या इतर निकषांची पूर्तता आवश्यक असते.

**मराठी भाषेची प्राचिनता :**

मराठी भाषा महाराष्ट्रीय प्राकृत भाषेचे आधुनिक रूप मानली जाते. जी सुमारे २४०० वर्षांची आहे.

**साहित्याची समृद्ध परंपरा :**

मराठी साहित्यात संत साहित्य, विविध काव्य प्रकार, तसेच ऐतिहासिक आणि सामाजिक विषयांवरील लेखन यांसारख्या अनेक प्रकारांचे साहित्य आहे.

**भारतातील स्थान :**

मराठी भाषा भारतातील एक प्रमुख भाषा असून तिने भारतीय संस्कृतीत एक महत्त्वपूर्ण स्थान मिळवले आहे.

**मराठी भाषेचे सांस्कृतिक महत्त्व**

मराठी भाषा केवळ एक संवाद साधण्याचे साधन नाही तर ती महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. मराठी भाषेत अनेक महान कवी, लेखक आणि विचारवंत झाले आहेत ज्यांनी आपल्या लेखनाद्वारे समाजातील विविध मुद्यांवर प्रकाश टाकला आहे.

मराठी भाषेतील साहित्याने भारतीय साहित्याला एक अद्वितीय स्थान प्राप्त करून दिले आहे. संत तुकाराम, संत ज्ञानेश्‍वर यांनी मराठी भाषेत आपल्या विचारांची मांडली केली आहे. यामुळे मराठी भाषेचा सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध झाला आहे.

**भाषेच्या संवर्धनाची आवश्यकता :**

अभिजात दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषेच्या संवर्धनाची आवश्यकता अधिक महत्त्वाची बनली आहे. भाषेच्या विकासासाठी विविध उपक्रम राबवले जावे लागतील. जसे की,

**भाषाशास्त्रीय संशोधन–**

भाषा शास्त्रज्ञांनी मराठी भाषेच्या विविध बोलींचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

**साहित्यिक उपक्रम–**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी विविध साहित्यिक उपक्रम, भाषा संवर्धन विषयक कार्यक्रम, संशोधनात्मक कार्यशाळा आणि चर्चासत्रे आयोजित करणे आवश्यक आहे.

**तंत्रज्ञानाचा वापर–**

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर त्याचे संवर्धन होण्यासाठी व विकास करण्यासाठी डिजीटल माध्यमांचा वापर करून मराठी भाषेचा प्रसार करणे आवश्यक आहे.

# हिन्दी विभाग



# भारतीय संस्कृति के महादर्शन

**पाटील अर्णव शेषराव**
बी.ए.द्वितीय वर्ष

हमारी मातृभूमि, हमारा देश भारत हमे प्राणों सें भी ज्यादा प्यारा है। हम यहाँ पैदा हुए, पले और बढे हैं। हमारा नाम, हमारी भाषा, हमारे संस्कार हमारे गुण-दोष, हमारा सम्पूर्ण व्यक्तित्व भारतीय आबोहवामें ही सजा-सँवरा हैं। हमारी प्रत्येक श्वास में भारत के प्राण स्पन्दित होते है। हमारी हर धडकन में हमारी मातृभूमि का वात्सल्य धडकता है। नृत्य, संगीत, कला और साहित्य में हमने सृजनात्मक ऊँचाइयों को छुआ है। विज्ञान और तकनिकी उपलब्धियों, अंको और शुन्य का ज्ञान हमने ही विश्व को दिया। मेहरोली का डेढ हजार वर्ष प्राचीन लौह स्तम्भ धातू विज्ञान की अद्‌भुत उपलब्धी है। हमने आयुर्वेद के रूप में अपनी एक विशेष चिकित्सा पद्धती को आविष्कृत कर उसे समृद्ध किया, योग के अद्‌भूत शारीरिक, मानसिक एवं अध्यात्मिक प्रभावों से विश्व को चमत्कृत किया। हमारी मानवीय परंपराएँ श्रेष्ठतम रही हैं। करूणा, दया, सत्य, अहिंसा, अस्तेय, अपरिग्रह और ब्रह्मचर्य जैसे आदर्शों की अवधारणाओं और त्याग व बलिदान की परंपराओं को हम माँ के दूध के साथ आत्मसात कर बडे हुए हैं। हमने विश्व को करूणा, प्रेम, भाईचारा और 'वसुधैव कुटुम्बकम' का पाठ पढाया है। अपनी संस्कृति के आदर्श, मूल्य और परंपराओं की गरिमा बनाये रखने के लिए, इनकी रक्षा करने के लिए अपने जीवन की आहुति देने वालें महापुरुषों और शहिदों की अनवरत लम्बी परंपरा अपने देश में रही है। इन्हीं आदर्शो, मुल्यों और उज्ज्वल परंपराओं के कारण हमारी व हमारे देश भारत की विश्व में एक अलग और यशस्वी पहचान है। यही हमारी संस्कृति है। प्रत्येक भारतीय अपने देश की इस गरिमामयी संस्कृति का योग्य उत्तराधिकारी है। इस देश की संस्कृति और इसकी यशस्वी परंपराओं को बनाये रखने और संभालकर उसे आने वाली पिढी को सौंपने का गुरुतर उत्तरदायित्व अब हम भारतीयों के कंधो पर हैं।

भारत की संस्कृति विश्व की सबसे प्राचीन, समृद्ध और व्यापक संस्कृतियों में से एक है। जो हजारों वर्षों से मानवता को एक दिशा देती आ रही है। भारतीय संस्कृति केवल परंपरा और रिती-रिवाजों का संग्रह मात्र नहीं है, बल्कि यह एक दर्शन है जो मानव जीवन को उच्च आद-र्शो और मूल्यों की ओर प्रेरित करता है। इसकी जडें वेदों, उपनिषदों, महाकाव्यों और संतो की शिक्षाओं में गहरी बसी हुई है।

**विविधता में एकता**

भारतीय संस्कृति की सबसे बडी विशेषता इसकी विविधता में एकता है। यहाँ सैंकडों भाषाएँ बोली जाती है, अनेक धर्मों के लोग एक साथ रहते हैं और अलग-अलग परंपराएँ एवं रीति-रिवाज मिलकर एक रंगीन संस्कृति का निर्माण करते है। हिंदू, बौद्ध, जैन, सिख, इस्लाम और ईसाई धर्मों का संगम भारत को धार्मिक सहिष्णुता और समन्वय का अद्वितीय उदाहरण बनाता है।

**कला, साहित्य और संगीत**

भारतीय संस्कृति में कला और साहित्य का महत्त्वपूर्ण स्थान है। नृत्य शैलियों में भरत नाट्यम्, कथ्थक, कुचिपुडी, ओडिसी और मोहिनी अट्टम न केवल मनोरंजन का साधन हैं, बल्कि भारतीय परंपराओं और धार्मिक कथाओं को व्यक्त करने का माध्यम भी हैं। संगीत में शास्त्रीय गायन, वाद्य यंत्रों की परंपरा और लोक संगीत भारतीय संस्कृति की गहरी जडों को दर्शाते हैं। महाकाव्य जैसे रामायण और महाभारत, संस्कृत ग्रंथ, सुफी साहित्य, भक्त कवियों की रचनाएँ और आधुनिक हिंदी, ऊर्दू, बंगाली, तमिल सहित अन्य भाषाओं का साहित्य इस संस्कृतिक समृद्धि को दर्शाता हैं।

**योग और आयुर्वेद :**

भारतीय संस्कृति ने दुनिया को योग और आयुर्वेद का अनमोल उपहार दिया हैं। योग न केवल शरीर को स्वस्थ रखने का माध्यम है, बल्कि यह मन, आत्मा और ब्रम्हांड के साथ जुडने की एक विधी भी हैं। पतंजलि के योगसुत्र और हठयोग की परंपरा आज संपूर्ण विश्व में अपनाई जा रही हैं। आयुर्वेद, जो चरक और सुश्रुत जैसे महान ऋषियों द्वारा विकसित किया गया, प्राकृतिक चिकित्सा का सबसे पुराना और प्रभावशाली विज्ञान है, जो आज भी मानव स्वास्थ्य के लिए प्रासंगिक है।

भारतीय संस्कृति केवल एक ऐतिहासिक धरोहर नहीं, बल्कि जीवन जिने की एक कला है। यह विज्ञान, कला, अध्यात्मिकता और सामाजिक मुल्यों का ऐसा संगम है, जो हर व्यक्ति को शांति, प्रेम, करूणा और सहिष्णुता की राह पर चलने के लिए प्रेरित करता हैं। भारत विश्वगुरू था, है और रहेगा। भारतीय संस्कृति महान है।



# महाकुंभ और भारतीय संस्कृति

**पाटील संजिवनी आबासाहेब**
बी.ए.तृतीय वर्ष

महाकुंभ मेला भारतीय संस्कृति का एक महत्त्वपूर्ण हिस्सा हैं, जो आस्था, अनुष्ठान और अध्यात्मिक अनुष्ठान ज्ञान को प्रदर्शित करता हैं। यह एक धार्मिक और सांस्कृतिक उत्सव हैं, जो भारत के विभिन्न हिस्सों से लाखों लोगों को इकठ्ठा करता है। महाकुंभ मेला ना केवल एक धार्मिक आयोजन है, बल्कि यह भारतीय संस्कृति के संप्रभुता, संपूर्णता और सार्वभौमिकता का प्रतिक है।

महाकुंभ मेला एक धार्मिक और सांस्कृतिक उत्सव है, जो भारत के विभिन्न हिस्सों से लाखों लोगों को इकठ्ठा करता है, महाकुंभ मेला सामाजिक एकता और भाईचारें का प्रतिक हैं।

यह मेला लोगों को आध्यात्मिक रूप से प्रेरीत करता है और उन्हें आत्म-बोध के लिए भी प्रेरीत करता है। महाकुंभ  मेला विभिन्न संस्कृतियों के लोगों को एक साथ लाता हैं और सांस्कृतिक आदान-प्रदान करता है। महाकुंभ मेला भारतीय संस्कृति  में आस्था की एक महत्त्व-पूर्ण अभिव्यक्ती है। महाकुंभ मेला सामाजिक एकता और भाईचारों को बढावा देता है।

महाकुंभ मेला भारत में पर्यटन को भी बढावा देता है। यह भारत की संस्कृति और एकता को दर्शाता है। यह एक ऐसा मेला है जो लाखो लोगों को एक साथ लाता है।

**चार पवित्र स्थान**

महाकुंभ भारत के चार पवित्र स्थलों पर जैसे की, प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन और नासिक में आयोजित किया जाता है। यह मेला हर बाराह वर्ष में एक बार आयोजित किया जाता है। महाकुंभ मेला गंगा, यमुना, शिप्रा और गोदावरी इन चार पवित्र नदियों के तट पर आयोजित किया जाता है।

**आस्था और अनुशासन**

मेलें में पवित्र स्नान, धार्मिक अनुष्ठान और सांस्कृतिक कार्यक्रमों का आयोन किया जाता है। यह मेला भारत की संस्कृति और धार्मिक परंपराओं को दुनिया के सामने प्रदर्शित करता है। यह भारत के धार्मिक पर्यटन को बढावा देता है और देश की अर्थव्यवस्था में योगदान देता है। यह मेला भारत के सामाजिक और सांस्कृतिक जीवन को प्रभावित करता है तथा लोगों को भाईचारें की भावना से जोडता हैं। यह अनेक सांस्कृतिक गतिविधीयों को दर्शाता हैं।

इस मेले से जुडी एक धार्मिक मान्यता है की महाकुंभ में स्नान करने से व्यक्ती को मोक्ष की प्राप्ती होती हैं और सभी पापों से छुटकारा प्राप्त होता है। खासकर प्रयागराज के त्रिवेणी संगम के घाट पर स्नान करने का विशेष महत्त्व हैं। वही इस बार महाकुंभ २०२५ में कुल ६ अमृत स्नान के योग प्राप्त हुए।

महाकुंभ एक आध्यात्मिक त्यौहार है और आध्यात्म और ज्ञान से जुडा हुआ है। महाकुंभ मेला ऐ-

तिहासिक जडों से जुडा है और आर्थिक वृद्धी, सांस्कृतिक महत्त्व की खोज करता है। महाकुंभ एक धार्मिक, सांस्कृतिक और आध्यात्मिक विरासत का सार प्रस्तुत करता है।

महाकुंभ केवल न भारत के लिए बल्कि दुनियाभर में लोगों के लिए भी एक महत्त्वपूर्ण सांस्कृतिक और आध्यात्मिक घटना है। यह आयोजन भारतीय संस्कृति की गहराई और व्यापकता को दर्शाता है। और इसे दुनिया भर में बढावा देने में मदत करता है। यह आयोजन भारत की धार्मिक, सांस्कृतिक और ऐतिहासिक धरोहर का अमूल्य हिस्सा हैं।



# एक अहिल्या ना होती

**गोरे सुरज सिद्धेश्वर**
बी.ए.तृतीय वर्ष

कश्मीर से कन्याकुमारी तक
ना शिकायत ना शक
दान धर्म की तो पुकार ना होती
अगर एक अहिल्या ना होती।

काशी मथुरा ना होती
कतल होती सबकी
अगर एक अहिल्या ना होती।

तो महिला सुरक्षित ना होती
शरम से मर जाती
अगर एक अहिल्या ना होती

मंदिरो में भगवान ना होते
राज तो हैवान करते
फिरंगी नंगा नाच करते
अगर एक अहिल्या ना होती

धनगरों में बुलंदी ना होती
इज्जत तो हमेशा रोती
फिर कैसे जनजागृती होती
अगर एक अहिल्या ना होती।

और कही की न होती
यह मेंढपाळ धनगर जाती
पैरों से कुचली जाती
अगर एक अहिल्या ना होती।



# एक अहिल्या थी

**खान शिफा**
बी.ए.द्वितीय वर्ष

मालवा की रानी हुई करूना की कहानी हुई
एक एक कर शव कितने उठाती है।
देख के प्रजा की पीर चक्षुओं का नीर
लाज लोक धर्म हेतु स्वयं उठ आती है।

युग का विश्वास बनी जनता की आस बनी
जनता को भुल निज शोक सहलाती है।
देवी राजमाता से अहिल्या बनी लोकमाता
शासिका साहसी पुण्यश्लोक कहलाती है।

खुद का ना सोचकर
दुसरों की रक्षा करना उनकी खासियत थी
खुद की जान पर खेलकर
अपनी प्रजा की जान बचाई थी।

कई मंदीर, कई त्योहारों का परिचय अपनी प्रजा को दिया
स्त्री शिक्षा का आरंभ भी इन्होंने ही तो किया।
ना कोई गरिब ना कोई अमीर यही इनकी सोच थी।
ईश्वर का वरदान लेकर धरती पर वह आयी थी।
हाँ... वही तो अहिल्याबाई थी।
हाँ... वही तो अहिल्याबाई थी।



# अहिल्याबाई होलकर - भारतीय संस्कृति की अमर संरक्षक

**टेंकाळे राधा चंद्रसेन**
बी.ए.द्वितीय वर्ष

अहिल्याबाई होलकर भारतीय इतिहास में एक ऐसी शासिका थी, जिन्होनें अपने अद्वितीय प्रशासन, धार्मिक कार्यो और समाज कल्याण की योजनाओं से एक आदर्श राज्य की स्थापना की। वे केवल एक वीरांगना नहीं थी, बल्कि भारतीय सांस्कृतिक, कला और धर्म के पुनरुद्धार में भी उनका महत्त्वपूर्ण योगदान रहा है। उनके द्वारा किए गए कार्य आज भी देशभर में देखे जा सकते है और वे भारतीय समाज के लिए प्रेरणा बनी हुई है।

**धार्मिक एवम् सांस्कृतिक धरोहरों का संरक्षण**

अहिल्याबाई होलकर ने हिंदू धर्म के कई प्रमुख तीर्थ स्थलों के जिर्णोद्धार और पुनर्निर्माण का कार्य किया। उनके योगदान ने भारत की धार्मिक और सांस्कृतिक धरोहरों को नई पहचान दी। मुगल आक्रमणों और समय के साथ कई प्राचीन मंदिर खंडहर बन गए थे। अहिल्याबाईने इन मंदिरों के पुनर्निर्माण का कार्य किया। कुछ प्रमुख मंदिरों में शामिल है-

**काशी विश्वनाथ मंदिर (वाराणसी) :**

इसे औरंगजेब द्वारा नष्ट किया गया था, जिसका जिर्णोद्धार अहिल्याबाईने करवाया।

**सोमनाथ मंदिर (गुजरात) :**

जो कई आक्रमणों मे ध्वस्त हुआ था, उसे फिर से बनवाया।

**महाकालेश्वर मंदिर (उज्जैन) :**

जो भारत के १२ ज्योतिर्लिंगों में से एक है, इसका भी पुनर्निर्माण कराया।

गया (बिहार), रामेश्वर (तामिळनाडू), द्वारका (गुजरात) और बद्रिनाथ (उत्तराखंड) के मंदिरों में भी उन्होंने पुनर्निर्माण कार्य करवाएँ।



**धर्मशालाए और यात्रियों के लिए सुविधाएँ:**

अहिल्याबाई ने भारतभर में तीर्थयात्रियों की सुविधा के लिए कई धर्मशालाएँ बनवाए, ताकि वे आराम से यात्रा कर सकें। काशी (वाराणसी), प्रयागराज, हरिद्वार, गया और अन्य तीर्थ स्थलों पर उन्होनें धर्मशालाएँ स्थापित की।

**घाटों और पवित्र स्थलों का निर्माण :**

उन्होनें गंगा, नर्मदा नदी पर महेश्वर घाट और ओंकारेश्वर घाट, वाराणसी का अहिल्याबाई घाट, प्रयागराज, हरिद्वार और गया में घाटों का तथा अन्य पवित्र नदियों के किनारें कई घाटों का निर्माण कराया।

**स्थापत्य कला और वास्तुकला को बढावा :**

अहिल्याबाई होलकर का शासनकाल भारतीय स्थापत्य और कला के लिए एक स्वर्ण युग था। उन्होनें महेश्वर (मध्य प्रदेश) को अपनी राजधानी बनाया और वहा भव्य किले, मंदिर और अन्य संरचनाओं का निर्माण किया। उनके द्वारा बनवाएँ गए मंदिरों में विशिष्ट मराठा स्थापत्यशैली दिखाई देती है। जिसमें सुंदर शिखर, विस्तृत मंडप और नक्षीदार दीवारें शामिल है।

उनके शासन काल में संगीत और नृत्य को बढावा दिया गया। उन्होनें कलाकारों, कवियों को प्रोत्साहित किया और उन्हें अपने राज्य में बसने के लिए प्रेरित किया। धार्मिक संगीत और भजन गान की परंपरा को बढावा मिला।

**समाज सुधार और शिक्षा को बढावा :**

अहिल्याबाई होलकर केवल धार्मिक और सांस्कृतिक संरक्षण तक सीमित नहीं थी, बल्कि उन्होंने समाज सुधार और शिक्षा के क्षेत्र में भी महत्त्वपूर्ण योगदान दिया है। उन्होंने कई गुरूकुलों और पाठशालाओं की स्थापना की। जहाँ बालकों को धार्मिक और व्यावहारिक शिक्षा दी जाती थी। महिलाओं की शिक्षा के लिए भी प्रयास किए, जो उस समय समाज में दुर्लभ था।

गरीबों और जरूरतमंदों के लिए अन्नछत्र (भोजनालय) स्थापित किए। विभिन्न स्थानों पर कुओं का निर्माण कराया जिससे ग्रामीण लोगों को पानी मिल सके। उन्होंने विधवा महिलाओं के पुनर्वास और सुरक्षा के लिए प्रयास किए।

**न्यायप्रिय प्रशासन और लोकहितकारी शासन :**

अहिल्याबाई होलकर का शासन न्यायप्रिय और जनता के हित में था। वे स्वयं जनता की समस्याएँ सुनती थी और न्याय करती थी। वे नियमित रूप से जनता की शिकायतें सुनती थी और तत्काल न्याय दिलवाती थी। उनके शासनकाल में अपराध दर बेहद कम था और लोक सुख-शांती से रहते थे।

उन्होनें किसानों को आर्थिक सहायता दी और सिंचाई व्यवस्था का विस्तार किया। व्यापारियों को सुविधाएँ देकर बाजारों का विकास किया। महेश्वर और अन्य नगरों को व्यापारिक केंद्रो के रूप में विकसित किया।

अहिल्याबाई होलकर भारतीय इतिहास में एक अद्वितीय उदाहरण है। उन्होंने अपने शासनकाल में धर्म, संस्कृति, कला, शिक्षा और समाज सुधार के क्षेत्र में जो कार्य किए है वे आज भी हमारे लिए प्रेरणादायी है।

# महाकुंभ मेला और भारतीय संस्कृति

**विमल पाल**
एम.ए.द्वितीय वर्ष

भारत एक प्राचीन, सांस्कृतिक और अध्यात्मिक परंपराओं से समृद्ध देश है। यहाँ की संस्कृति हजारों वर्षो पुरानी है और विविधता से भरी हुईं है। इस भारतीय संस्कृति का सबसे महान, जीवंत और भव्य प्रतीक है 'कुंभमेला'।

महाकुंभ मेला विश्व का सबसे बडा धार्मिक एवम् सांस्कृतिक आयोजन माना जाता है। यह हर बारह वर्ष में प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन और नासिक इन चार पवित्र तीर्थस्थलों में से किसी एक स्थान पर आयोजित किया जाता है। इस अवसर पर देश-विदेश से करोडों श्रद्धालू एकत्र होकर पवित्र नदियों मे स्नान करते हैं। उनका विश्वास होता है कि इस स्नान से उन्हें मोक्ष की प्राप्ती हो सकती है।

महाकुंभ मेला केवल धार्मिक आयोजन नहीं है, यह भारतीय संस्कृति की आत्मा का उत्सव है। यहाँ भारत की विविधता एक साथ दिखाई देती है। अलग-अलग प्रदेशों की भाषाएँ, वेशभूषा, जीवनशैली और परंपराएँ एक ही स्थान पर देखने को मिलती है। नागा साधु, योगी, सन्यासी, आचार्य और सामान्य भक्त सभी इस मेले में सम्मिलित होते है। यह भारत की धार्मिक सहिष्णुता और अध्यात्मिक गहराई को दर्शाता है।

आज के आधुनिक युग में भी इस मेले का आयोजन अत्यंत सुव्यवस्थित ढंग से होता है। सरकार और समाज मिलकर इसमें आधुनिक तकनिक, सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता और सेवाओं का प्रयोग करते है। इससे यह स्पष्ट होता है की भारतीय संस्कृती समय के साथ चलनेवाली है लेकिन अपनी जडों से जुडी हुई है।

महाकुंभ मेला न केवल एक अध्यात्मिक अनुभव है, बल्कि यह आत्मशुद्धि, एकता और सांस्कृतिक गर्व का प्रतिक है। जब लाखों श्रद्धालू एक साथ एक ही भावना में बहते हैं, तो यह केवल धार्मिक नही, बल्कि भावनात्मक और मानवीय एकता का दृश्य बन जाता है।

महाकुंभ मेला भारतीय संस्कृति का गौरवशाली उत्सव है। यह हमें हमारी परंपराओं की याद दिलाता है। और अमें उन्हे आगे बढाने की प्रेरणा देता हैं। भारतीय संस्कृति की विशालता, सहिष्णुता और अध्यात्मिकता का अद्‌भुत संगम है।

# महाकुंभ : भारत की आत्मा

**दिशा दत्ता जगताप**
एम.ए.प्रथम वर्ष



जहाँ बहती है गंगा निर्झर,
जहाँ गुँजे हर हर गंगे स्वर।
जहाँ डुबकी से मिट जाए पाप,
वही बसता है भारत का आप।
महाकुंभ नहीं बस मेला है।
ये सनातन धर्म का रेला है।
संतो की वाणी, राग-आलाप,
वेदों का गुढ, तपस्वियों का जाप।
धूप, ध्वनि, दीपों की रेखा,
संस्कृति की जीवंत अभिव्याख्या।
हर मूर्ति में है इतिहास जगा,
हर झलक में पुराण बसा।
यह एकता ही पहचान है,
हर भारतवासी की शान है।
ना भेद, ना जाति, ना कोई द्वार,
सभी को मिलता गंगाजल सार।
कुंभ में जो भाव जगाता है,
वही संस्कृति कहलाता है।
विरासत है ये ऋषियों की,
छाया है ये देवताओं की।
तो आइए, इस संगम में मिले,
संस्कृति की धारा संग चलें।
भारत की आत्मा को जाने,
महाकुंभ में खुद को पहचाने।

# सुनो द्रौपदी

सुनो द्रौपदी शस्त्र उठा लो
अब गोविंद ना आएंगे
छोडो मेहंदी खडग संभालो
खुद ही अपना चीर बचालो
द्युत बिछाए बैठे शकुनि
मस्तक सब बिक जाएंगे
सुनो द्रौपदी शस्त्र उठा लो
अब गोविंद ना आएंगे
कब तक आस लगाओगी तुम
बिके हुए अखबारों से
कैसी रक्षा मांग रही हो दुशासन दरबारों में
स्वयं जो लज्जा हीन पडे है
वे क्या लाज बचाएंगे
सुनो द्रौपदी शस्त्र उठा लो
अब गोविंद ना आएंगे
कल तक केवल अंधा राजा,
अब गुंगा बहरा भी है
ओठ सिल दिए है जनता के
कानों पर पहरा भी है
तुम ही कहो ये अश्रु तुम्हारे
किसको क्या समझाएंगे
सुनो द्रौपदी शस्त्र उठा लो
अब गोविंद ना आएंगे

**पाटील मयुरी दयानंद**
एम.ए. प्रथम वर्ष



# लोकमाता

धन्यवाद मालवा का समझो
या कह दो यह तो होना था
अहिल्या पत्थर बनी थी पहले
अब हर पत्थर अहिल्या होना था।

पति पुत्र का साथ था थोडा
पर मल्हार सुसर ने हाथ ना छोडा
और महेश्वर जब राजधानी बसाई
लगा गंगा स्वयं नर्मदा पर आयी।

पेशवा के लश्कर को जिसने
एक चिठ्ठी से डरा दिया
उजड गए थे धर्म के मंदिर
फिर से उनको सजा दिया।

जिसने अपनी सारी दौलत
सदा जनता पर वारी है
ऐसी मेरी प्यारी अहिल्या
हर जन के मन को प्यारी है।

**आल्टे अंकुर अजय**
१२ वी (अ)

# वंदे मातरम् गीत और भारत की एकता

**ओमकार रामहरी बादाडे**
बी.ए.प्रथम वर्ष

वंदे मातरम यह केवल दो शब्द नहीं, बल्कि भारतीय राष्ट्र की आत्मा, उसकी अटूट भक्ति और स्वतंत्रता के प्रति उसके अदम्य संकल्प का घोष है। बंकिमचंद्र चट्टोपाध्याय द्वारा रचित यह गीत, जिसे भारत का राष्ट्रीय गीत होने का गौरव प्राप्त है, सदियों से भारतीय संस्कृति का अभिन्न अंग रहा है और इसने स्वतंत्रता संग्राम में एक अविस्मरणीय भूमिका निभाई है।

**वंदे मातरम का उद्भव और ऐतिहासिक पृष्ठभूमी :**

वंदे मातरम की रचना बंकिमचंद्र चट्टोपाध्यायने १८७६ में की थी और इसे १८८२ में उनके प्रसिद्ध उपन्यास 'आनंदमठ'में शामिल किया गया। इस उपन्यास में यह गीत एक संन्यासी द्वारा गाया गया है, जो ब्रिटिश शासन के विरुद्ध हुए संन्यासी विद्रोह की पृष्ठभूमि पर आधारित है। उस समय ब्रिटिश हुक्मरानों ने सरकारी समारोहों में 'गॉड सेव्ह द क्वीन' गीत गाना अनिवार्य कर दिया था, जिससे बंकिमचंद्र बहुत आहत हुए। इसी पीडा से उपजे राष्ट्रप्रेम ने उन्हें 'वंदे मातरम्' की रचना के लिए प्रेरित किया। जिसमें उन्होनें भारत भूमि को माँ के रूप में चित्रित किया।

यह गीत मूल रूप से संस्कृत और बांगला के मिश्रण से बना है। इसका अर्थ है, 'मैं अपनी मातृभूमि की वंदना करता हूँ।' यह केवल भौगोलिक भूमि की वंदना नही, बल्कि भारत माता को देवी के रूप में पुजने की गहरी सांस्कृतिक भावना को दर्शाता है।

**भारतीय संस्कृति में योगदान :**

**मातृभूमी की देवी के रूप में परिकल्पना :**

यह गीत भारत भूमि को केवल एक भू भाग नहीं, बल्कि एक सजीव देवी के रूप में प्रस्तुत करता हैं। 'सुजला सुफला मलयज शीतलाम, शस्य श्यामलां मातरम्' जैसे पंक्तिया भारत की प्राकृतिक सुंदरता, उसकी उर्वतर और शीतलता को एक दिव्य माँ के गुणों के रूप में चित्रित करती हैं। यह भारतीय संस्कृति में शक्ति और प्रकृति के पूजा की परंपरा से गहराई से जुडा हैं।

**राष्ट्रवाद की भावना का संचार :**

अंग्रेजो के शासनकाल में, जब देश गुलाम था, 'वंदे मातरम्' ने सोई हुई राष्ट्रवादी चेतना को जगाने का काम किया। इसने भारतीयों को अपनी भूमि, अपनी संस्कृति और अपनी पहचान पर गर्व करना सिखाया। यह गीत स्वतंत्रता सेनानियों के लिए एक प्रेरणा स्त्रोत बन गया और उन्हें मातृभूमि के लिए सर्वस्व न्योछावर करने की शक्ति दी।

**एकजुटता का प्रतिक :**

'वंदे मातरम्' ने विभिन्न क्षेत्रों, भाषाओं और समुदायों के लोगों को एकजुट किया। यह बंग-भंग आंदोलन

और असहयोग आंदोलन जैसे बडे जन-आंदोलनों में एक शक्तिशाली नारा बन गया। इसे गाते ही लोगों के दिलों में अपने देश के प्रति गर्व और सम्मान की भावना जागृत होती थी।

**आध्यात्मिक और देशभक्ती का मिश्रण :**

भारतीय संस्कृति में आध्यात्मिक और देशभक्ति का गहरा संबंध रहा हैं। 'वंदे मातरम्' इसी संबंध को दर्शाता है। यह केवल एक राजनीतीक नारा नहीं था, बल्कि एक धार्मिक मंत्र के समान था, जो लोगों को अपनी भूमि के प्रति आध्यात्मिक भक्ति से ओत-प्रोत करता था।

**कला और साहित्य पर प्रभाव :**

इस गीत का भारतीय कला, साहित्य और संगित पर गहरा प्रभाव पडा। इसने कई अन्य कवियों और लेखकों को मातृभूमि पर लिखने के लिए प्रेरित किया। इसका संगित जिसे पहली बार १८९६ में भारतीय राष्ट्रीय काँग्रेस के कलकत्ता अधिवेशन में रविंद्रनाथ टैगोर ने स्वरबद्ध किया था, आज भी लोगों को भावुक कर देता है।

**स्वतंत्रता संग्राम में भूमिका :**

**क्रांतिकारियों का प्रेरणास्त्रोत :**

भगतिसिंह, सुखदेव, राजगुरु जैसे अनगिनत क्रांतिकारियों के होठों पर यह गीत अक्सर रहता था। यह उनके लिए प्रेरणा का अंतिम स्त्रोत था, जिसने उन्हे फाँसी के फंदे पर भी हँसते हँसते चढने की शक्ति दी।

**राष्ट्रीय पहचान का निर्धारण :**

स्वतंत्रता से पूर्व ही, दिसंबर १९०५ में काँग्रेस कार्यकारिणी की बैठक में इस गीत को राष्ट्रगीत का दर्जा प्रदान किया गया था। १५ अगस्त १९४७ की रात को, संविधान सभा की पहली बैठक का प्रारंभ 'वंदे मातरम्' के साथ ही हुआ। २४ जनवरी १९५० को संविधान सभा ने इसे 'जन गण मन' के समकक्ष राष्ट्रीय गीत के रूप में मान्यता दी।

'वंदे मारतम्' केवल एक गीत नहीं, बल्कि भारतीय इतिहास, संस्कृति और चेतना का एक जीवंत अध्याय है।



# महाकुंभ और भारतीय संस्कृति

**ओमकार रामहरी बादाडे**
बी.ए.प्रथम वर्ष

महाकुंभ मेला केवल एक धार्मिक समागम नहीं, बल्कि भारतीय सभ्यता के हृदय का एक विराट स्पंदन है। आस्था, आध्यात्मिकता और अदम्य माननीय भावना का ऐसा उत्सव जो सदियों में बहती आ रही सांस्कृतिक गंगा में हर बारह वर्ष पर एक नई लहर पैदा करता है। इसे पृथ्वी पर सबसे बडा शांतिपूर्ण मानव मेला माना जाता है, जहाँ करोडो लोग एक ही उद्देश्य, अपनी आत्मा की प्यास बुझाने के लिए, पवित्र नदियों के तट पर एकत्र होते हैं। यह भारत की समृद्ध विरासत, दर्शनिक गहराई और सामुहिक चेतना का एक जिवन प्रमाण है, जिसे शब्दों मे पुरी तरह समेटना कठिण है।

**पौराणिक जडे और आध्यात्मिक उद्भव :**

महाकुंभ का उद्गम समुद्र मंथन की उस पौराणिक कथा में निहित है, जब देवताओं और असुरों के बीच अमरता के अमृत के लिए संघर्ष हुआ था। इस संघर्ष के दौरान अमृत कलश से कुछ बुंदे पृथ्वी के चार पवित्र स्थलों पर गिरी- प्रयागराज (इलाहाबाद) में गंगा, यमुना और अदृश्य सरस्वती के पावन संगम पर, हरिद्वार में गंगा के पवित्र तट पर, नासिक में गोदावरी के किनारों पर और उज्जैन में क्षिप्रा नदी के तट पर। इन्ही स्थानों पर बारी बारी से कुंभ मेले का आयोजन होता है, जिसमें पूर्ण कुंभ हर १२ साल में और अर्ध कुंभ हर छह साल में होता है। यह एक गहन आध्यात्मिक मान्यता है कि इन नदियों मे स्नान करने से व्यक्ति पापों से मुक्त होता है और मोक्ष की ओर अग्रसर होता है। यह स्नान केवल शरीर का नहीं बल्कि आत्मा का शुद्धिकरण है, जो आत्मा को परमात्मा से जोडने का एक माध्यम है।

'महाकुंभ : भारत की आत्मा, विश्व का प्रकाश'

**भारतीय संस्कृति का महाकाव्य :**

महाकुंभ मेला भारतीय संस्कृति का एक चलता-फिरता महाकाव्य है, जो इसके विभिन्न आयामों को परत-दर-परत खोलता है।

आध्यात्मिक समन्वय का अद्वितीय संगम : यह मेला विभिन्न मतों, पंथों और दार्शनिक धाराओं को एक मंच पर लाता है। नागा साधुओं का शाही स्नान जो अपनी रहस्यमय उपस्थिती और अलौकिक शक्ति के लिए जाने जाते हैं। यह इस मेले का सबसे प्रतिक्षित और शानदार दृश्य होता है। विभिन्न अखाडों का शौर्य प्रदर्शन, दिगंबर साधुओं का वैराग्य और असंख्य संतो के प्रवचन यहाँ अध्यात्मिक भारत की विविधता और एकता का दर्शन कराते हैं। यह दर्शाता है की कैसे भारत में विभिन्न धार्मिक मार्ग एक ही सर्वोच्च सत्य की ओर ले जाते हैं।

अखंडीत परंपरा और जीवंत विरासत : महाकुंभ सहस्त्रों वर्षों से चली आ रही परंपराओं का एक सुत्र है। वैदिक मंत्रो का उच्चारण, प्राचिन अनुष्ठान और पीढियों से चले आ रहे धार्मिक अभ्यास यहाँ आज भी उसी निष्ठा और श्रद्धा से

किए जाते हैं। यह युवा पीढी को अपनी जडों से जोडता है और उन्हें अपनी समृद्ध आध्यात्मिक विरासत को समझने का अवसर प्रदान करता हैं।

**कला, ज्ञान और दर्शन का महामंच :**

मेले के दौरान केवल धार्मिक क्रियाकलाप ही नहीं होते, बल्कि यह कला, ज्ञान और दार्शनिक संवाद का भी एक जीवंत केंद्र बन जाता है। लोकनृत्य, संगीत, धार्मिक नाटक और भक्तिमय प्रस्तुतियाँ यहाँ की हवा में घुल जाती हैं। विद्वान, योगी और आध्यात्मिक गुरू गहन दार्शनिक चर्चाओं में लीन रहते हैं, जिसमें ज्ञान का प्रवाह अनवरत चलता रहता है। यह मानव चेतना के उच्चतम आदर्शों की खोज का एक खुला विश्वविद्यालय हैं।

**संगठनात्मक कौशल्य का अनुठा प्रदर्शन :**

इतने विशाल जनसमुह को व्यवस्थित करना, उनकी बुनियादी जरूरतों को पूरा करना और सुरक्षा सुनिश्चित करना अपने आप में एक असाधारण कार्य हैं। स्वच्छता, स्वास्थ्य सेवाएँ, पेयजल और आवास की व्यवस्था जिस कुशलता और सामुदायिक सहभागिता की पराकाष्ठा है। यह एक अस्थायी शहर के निर्माण जैसा है, जो मेले की अवधि तक जीवंत रहता है।

महाकुंभ मेला मात्र एक उत्सव नहीं, बल्कि भारतीय संस्कृति की लचीलता, उसकी गहनता और कालातीत अपील का एक वैश्विक उदाहरण हैं।



# वन्दे मातरम् और भारतीय संस्कृति

**अर्जुन अशोक वाघमारे**
एम.ए.द्वितीय वर्ष

वंदे मातरम् गीत और भारतीय संस्कृति दोनों के बीच संबंध बहुत गहरा और सांस्कृतिक दृष्टि से महत्त्वपूर्ण हैं। यह संबंध भारत की मातृभूमि की पूजा, राष्ट्रीय चेतना, धार्मिक समानता और सांस्कृतिक एकता जैसे मूल तत्त्वों से जुडा हुआ हैं।

वंदे मातरम् गीत भारतीय स्वतंत्रता संग्राम का एक प्रेरणास्त्रोत और भारतीय संस्कृति का एक जीवंत प्रतिक हैं। इस गीत की रचना बंकिमचंद्र चट्टोपाध्यायने अपने उपन्यास 'आनंदमठ (१८८२)' में की थी। यह गीत भारत माता के प्रति समर्पण, श्रद्धा और गौरव का भाव प्रकट करता हैं। भारतीय संस्कृति में 'माँ' को सर्वोच्च स्थान प्राप्त हैं, चाहे वो जन्मदात्री माँ हो, प्रकृति हो या फिर मातृभूमि। इसी परंपरा को वंदे मातरम् गीत आगे बढाता हैं। जिसमें भारत को देवी दुर्गा, देवी लक्ष्मी, देवी सरस्वती का रूप मानकर उनकी वंदना की गई हैं।

वंदे मातरम् गीत भारतीय संस्कृति की उस भावना को प्रकट करता हैं, जिसमें देशभक्ति को धर्म के समान पवित्र माना गया है। जिसमें विभिन्न भाषाएँ, धर्म, परंपराएँ होते हुए भी एक राष्ट्रभाव की अनुभूमि होती हैं। इसी भावना का प्रतिनिधित्व यह गीत करता हैं। यह गीत किसी एक धर्म का नही बल्कि संपूर्ण भारतवर्ष का हैं। इसमें नारीशक्ति, प्रकृति और राष्ट्रभक्ति का ऐसा सुंदर संगम हैं, जो भारतीय संस्कृति की आत्मा को दर्शाता हैं।

स्वतंत्रता आंदोलन के दौरान जब भारत अंग्रेजो की गुलामी झेल रहा था तब वंदे मातरम् क्रांतिकारियों के लिए एक मंत्र बना था। यह गीत न केवल राजनीतिक जागरूकता फैलानेवाला था बल्कि सांस्कृतिक चेतना को भी जागृत करता था।

**मातृभूमी की उपासना :**

भारतीय संस्कृति में माँ को सर्वोच्च स्थान प्राप्त है, 'मातृदेवा भव'। वंदे मातरम् गीत में भारत भूमिका को माता के रूप में प्रस्तुत किया गया हैं। जो दर्शाता है कि, भारतीय संस्कृति धरती और देश को भी माँ मानकर उसकी आराधना करती हैं।

**राष्ट्रभक्ती और सांस्कृतिक चेतना :**

यह गीत भारतीयों में देशभक्ति की भावना जगाने का कार्य करता हैं। राष्ट्री की सेवा धर्म का रूप है इस भावना का प्रदर्शन करता हैं। इस गीत का हर शब्द भारतीयों में त्याग, समर्पण और एकता की भावना को भरता हैं।

**धार्मिक सहिष्णुता और समानता :**

हालाँकि गीत में देवी स्वरूप में भारत का चित्रण

किया हैं, फिर भी यह किसी एक धर्म का प्रतिक नहीं, बल्कि भारतीय संस्कृति की तरह ही हर धर्म, हर जाति, हर वर्ग के लोगों को एक राष्ट्र के सूत्र में बाँधता है, जो साझी सांस्कृतिक विरासत को दर्शाता है।

**सांस्कृतिक एकता का प्रतीक :**

भारत विविधताओं का देश हैं। परंतु वंदे मातरम् गीत विविधता में एकता को स्वर देता हैं। यह गीत भाषाओं, परंपराओं और धर्मो में विविध होते हुए भी भारतीय संस्कृति कि एकात्मता को उजागर करता हैं।

'वंदे मातरम्' केवल एक गीत नही बल्कि एक विकार है, जो हमें अपनी संस्कृति, मातृभूमि से जोडता हैं। यह गीत आज भी राष्ट्रीय एकता और सांस्कृतिक गर्व का प्रतीक बना हुआ हैं। यदि भारतीय संस्कृति को हृदय से समझना हैं तो 'वंदे मातरम्' गीत को सम्मानपूर्वक स्वीकार करना होगा। यह गीत हमारी संस्कृति की आत्मा हैं, जो सदैव अमर रहेगी।



# अहिल्यादेवी होलकर और सांस्कृतिक कार्य

**अंकिता रामहरी बादाडे**
बी.ए.तृतीय वर्ष

जहाँ राजाओं ने साम्राज्य बनाएँ, वहाँ अहिल्यादेवी ने श्रद्धा और सेवा का साम्राज्य खडा किया। अहिल्याबाईने तलवार से नहीं, परोपकार और न्याय से इतिहास रचा।

अहिल्याबाई होलकर मराठा साम्राज्य की एक महान और आदर्श शासिका थी, जिन्होंने १८ वी शताब्दी में मालवा क्षेत्र पर शासन किया। उनका जन्म ३१ मई १७२५ को महाराष्ट्र के अहमदनगर जिले के चौंडी गाँव में हुआ था। वे अपने न्यायप्रिय, धर्मनिष्ठ, दयालू और सांस्कृतिक योगदान के लिए प्रसिद्ध है। अहिल्याबाई ने न केवल शासन में उत्कृष्टता दिखाई, बल्कि भारतीय संस्कृति, कला, धर्म के उत्थान में भी महत्त्वपूर्ण भूमिका निभाई हैं।

**अहिल्याबाई होलकर के सांस्कृतिक कार्य :**

**मंदिर निर्माण और पुनर्निर्माण :**

अहिल्याबाईने देशभर में अनेक मंदिरों का निर्माण और जिर्णोद्धार करवाया। उन्होंने काशी विश्वनाथ मंदिर (वाराणसी), सोमनाथ मंदिर (गुजरात), त्र्यंबकेश्वर (नासिक), महाकालेश्वर (उज्जैन), रामेश्वरम (तामिळनाडू) आदि प्रसिद्ध धार्मिक स्थलों पर कार्य करवाया। उनके द्वारा बनवाएँ गए मंदिर आज भी उनकी धार्मिक भावना और स्थापत्य के उदाहरण हैं।

**तीर्थ स्थानों का विकास :**

उन्होंने भारत के प्रमुख तीर्थस्थानों पर धर्मशालाएँ, कुएँ, बावडियाँ, घाट और यात्रियों के लिए विश्रामगृह बनवाए। इससे न केवल तीर्थ यात्रियों को सुविधा मिली, बल्कि उन स्थानों का धार्मिक और सांस्कृतिक महत्त्व भी बढा।

**धार्मिक सहिष्णुता और सामाजिक समरसता :**

अहिल्याबाई सभी धर्मों का सम्मान करती थी। उन्होनें विभिन्न धर्मों और जातियों के लोगों के लिए कार्य किए। उन्होंने स्त्रियों की स्थिती सुधारने और विधवाओं को सम्मानपूर्वक जीवन जीने के अवसर प्रदान किए।

शिक्षा और संस्कृति का संरक्षण :

अहिल्याबाईने संस्कृत विद्वानों, पंडितों और कवियों को संरक्षण दिया। कई पाठशालाओं और विद्या केंद्रो की स्थापना कि, जिससे शिक्षा का प्रचार-प्रसार हुआ।

**स्थापत्य कला और लोकसंस्कृति का संवर्धन :**

अहिल्याबाईने स्थापत्य कला को प्रोत्साहन दिया। उनके द्वारा बनवाएँ गए भवन और मंदिर वास्तुकला के उत्कृष्ट उदाहरण हैं। उन्होंने लोक परंपराओं, रीति-रिवाजों और संगीत को संरक्षण प्रदान किया।

अहिल्याबाई होलकर न केवल एक आदर्श शासिक थी, बल्कि एक महान सांस्कृतिक संरक्षिका भी थी। उनके कार्य आज भी देशभर में देखे जा सकते हैं, और वे भारतीय

संस्कृति की गौरवशाली परंपरा की प्रतीक हैं। उनका जीवन यह दर्शाता है कि एक नारी भी सत्ता, संस्कृति और सेवा के क्षेत्र में अमिट छाप छोड सकती हैं। अहिल्याबाई की जीवन गाथा नारी नेतृत्व की जीवंत पाठशाला हैं। अहिल्याबाई भारतीय नारी शक्ति की श्रेष्ठतम प्रतिमूर्ती हैं। उनके राज्य में प्रजा माता थी और रानी उसकी सेविका। अहिल्याबाई ने न केवल मंदिर बनवाएँ बल्कि संस्कृति को फिर से जीवित किया।

अहिल्याबाई राजकाज नहीं करती थी, धर्मराज्य चलाती थी। अहिल्याबाई जैसी रानियाँ भारत के गौरव का स्तंभ हैं। जहाँ भी देवस्थान उजडे थे वहाँ अहिल्याबाई की छाया पहुँची। धर्म करूणा और कर्तव्य हा संगम थी अहिल्याबाई और उनकी सबसे बडी शक्ती थी – प्रजा के प्रति नि:स्वार्थ प्रेम। अहिल्याबाई अपने समय से बहुत आगे की सोच रखने वाली शासिका थी।

इतिहास के पन्नों में अहिल्याबाई केवल एक नाम नहीं, एक युग हैं।



# स्वामी दयानंद सरस्वती और भारतीय संस्कृति

**आरती अशोक वाघमारे**
बी.ए.तृतीय वर्ष

स्वामी दयानंद सरस्वती ने भारतीय संस्कृति पर अपने गहरे विचार प्रदर्शित किए हैं। स्वामी दयानंद सरस्वतीजी का जन्म १८२४ में हुआ था। सरस्वतीजी भारतीय समाज के एक महान सुधारक और आर्य समाज के संस्थापक थे। उनका मानना था की भारतीय संस्कृति का मूल आधार 'वेदों में निहित शुद्ध ज्ञान और नैतिकता हैं।'

**स्वामी दयानंद सरस्वतीजी के भारतीय संस्कृति पर विचार :**

**वेदों की ओर लौटे :**

'वेदों की ओर लौटो' यह नारा उन्होंने दिया। उनका मानना था की, भारतीय संस्कृति की वास्तविक जडें वेदों में है। जो पूर्ण वैज्ञानिक, नैतिक और सार्वभौमिक सत्य पर आधारित हैं।

**अंधविश्वास और रूढियों का विरोध :**

सरस्वतीजीने मूर्तिपूजा, तीर्थयात्रा, जात-पात, तंत्र-मंत्र, बलि आदि जैसी रूढियों और अंधविश्वासों का जोरदार विरोध किया। वे मानते थे कि यह प्रथाएँ भारतीय संस्कृति को भ्रष्ट कर रही है।

**नारी शिक्षा और समानता :**

दयानंद सरस्वतीजी ने नारी शिक्षा, विवाह में समानता, विधवा पुनर्विवाह आदि का समर्थन किया। वे कहते थे की, जहाँ नारी का सम्मान होता है, वही संस्कृति फलती फुलती हैं।

**शिक्षा और ज्ञान का प्रचार :**

सरस्वतीजी का मानना था की भारतीय संस्कृति को पुनर्जीवित करने के लिए वैज्ञानिक शिक्षा और वेदों का ज्ञान आवश्यक हैं। उन्होनें गुरुकुल प्रणाली और आधुनिक शिक्षा के समन्वय की वकालत की।

**भारतीय संस्कृति - सत्य, धर्म, नैतिकता :**

दयानंदजी ने भारतीय संस्कृति को धर्म, सत्य, करूणा और नैतिकता का प्रतीक माना। उन्होंने यह भी कहा कि, सच्ची संस्कृति वही है जो समाज को न्याय, समानता और आत्म शुद्धी की ओर ले जाएँ।

**राष्ट्रीय चेतना और स्वाभिमान :**

दयानंदजी ने भारतीयों को अपने स्वदेशी ज्ञान, भाषा और सांस्कृतिक परंपराओं पर गर्व करने की प्रेरणा दी। उनका मानना था की सांस्कृतिक पुनर्जागरण ही राष्ट्रीय स्वतंत्रता का आधार होगा।

वेद ही सच्चा ज्ञान है और वही हमारी संस्कृति की आत्मा है। सत्य को ही अपनाओ, चाहे वह कहीं से भी मिलें। उनके अनुसार भारतीय संस्कृति कोई स्थिर परंपरा नही, बल्कि एक जीवंत और विकासशील जीवन मूल्य

प्रणाली है, जो सत्य, धर्म, शिक्षा और सामाजिक समानता पर आधारित होनी चाहिए। उन्होंने स्पष्ट रूप से कहा कि भारत की वर्तमान संस्कृति मूल संस्कृति से भटक चुकी हैं। उन्होंने निम्न बातों की आलोचना की-

**मूर्तिपूजा :** वेदों में मूर्तिपूजा का कोई स्थान नही हैं। ईश्वर निराकार हैं।

**पंडितों का अज्ञान :** धर्मगुरु स्वार्थवश वेदों का गलत अर्थ प्रचारित कर रहे हैं।

**जाति व्यवस्था :** जन्म के आधार पर जाति निर्धारण के को उन्होने नकारा; गुण, कर्म और स्वभाव के आधार पर वर्ण व्यवस्था का समर्थन किया।

**स्त्री अत्याचार :** सती प्रथा, बाल विवाह, विधवा का अपमान यह सब उन्होनें वेदविरुद्ध कहा।



# सामाजिक शास्त्रे विभाग



# वंदे मातरम् गीत व भारतीय संस्कृती

**शेख आयेशा अखलाख**
बी.ए.प्रथम वर्ष

वंदे मातरम् गीत फक्त राष्ट्रगीताचे गायन नसून स्वातंत्र्य मिळविण्यासाठी करण्यात आलेल्या संघर्षाचे प्रतीक आहे. भारतात 'वंदे मातरम्' भोवती नाहक वाटांची वादळे घोंघावत राहिली आहेत. लेखक व प्रशासकीय अधिकारी मनोजकुमार श्रीवास्तव यांनी 'वंदे मातरम' पुस्तकातून हा संबंधीत गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचीच ही माहिती. काही स्वयंघोषित यांना द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताचे जनक ठरविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

वंदे मातरम ब्रिटीशविरोधी नव्हते काय? या मुद्यावरही मतभेद जाणवतात. आपले नव बुद्धीवंत हे गीत ब्रिटीशविरोधी नसून मुस्लिमविरोधी असल्याचे मानतात. मात्र त्या विद्युल्लतेच्या तेजानं त्यावेळी काही क्षण बंगाल उजळला असेलच; पण त्याचे तेज क्षणात लोप पावत नाही.

वन्दे मातरम् - वन्दे मातरम्
सुजलाम् सुफलाम् मलयजशीतलाम्
सस्य शामलाम् मातरम् ।।
शुभ्रज्योत्सनाम् पुलकित यामिनीम्
फुल्लकुसुमित द्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुरभाषिणीम्
सुखदाम् वरदाम् मातरम्।।१।।
कोटि कोटि कन्ठ कल्कल निनाद कराले
द्विसप्त कोटि भुजैर्धृ खरकरवाले
के बोले मा तुमी अबले
बहुबल धारिणीम् नमामि तारिणीम्
रिपुदलवारिणीम् मातरम।।२।।

एखादी कविता एक अलौकिक तेज घेऊन जन्माला येते आणि आपल्या प्रतिभेने पुन्हा पुन्हा ती सारी धरती उजळवून टाकू लागते असे 'वंदे मातरम्' हे गीत राष्ट्रभक्तीचे स्फुरण जागविणारे आहे. आजही त्यावर वादंग होतात, चर्चा घडतात. देशातही विशिष्ट धर्मियांकडून बंदी हुकूम काढले जातात. पण या सगळ्या 'वंदे मातरम्' प्रत्येक वेळा पुन:पुन्हा आगीतून वंदे मातरम् अधिक तेज:पुंज होऊन १५० वर्षे पूर्ण होत आहेत. पण अजूनही या शब्दांच्या जन्मकथेचा धांडोळा यानिमित्त घेत आहोत.

काव्य हा एक अद्‌भुत वाङमय प्रकार आहे. मोजक्या शब्दाचा नादबद्ध समुहात विविध भावभावनांचा अविष्कार करू शकण्याचं सामर्थ्य यात आहे. कधी छंदबद्ध तर कधी मुक्तछंद कधी मोरोपंतासारख्या पंडित कवीच्या शब्दाबरोबरच पांडित्यपूर्ण मांडणी असेल तर कधी शाहिरांच्या काव्य करण्याचं बळ असेल.

प्रत्येक भाषेमध्ये त्या भाषेचे वेगळे असे सौंदर्याचे लेणे घेऊन कविता जन्माला येतात. वाचकांच्या, श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजवतात. आधी शब्द मग संगीत, नाद-

लयीबरोबर खेळ खेळत एक सुंदर शब्द स्वरचित्र उभं राहतं.

साहित्यातले नऊ रस वेगवेगळ्या स्वरूपात कवितेमधून भेटीला येतात. त्या त्या रसाच्या वैशिष्ट्याप्रमाणे कवितेतले शब्द वातावरण निर्माण करतात आणि वाचकांना वेगळ्या सृष्टीत घेऊन जातात. त्यामुळेच 'जे न देखे रवि ते देखे कवी' अशी म्हण प्रचलित झाली असावी.

भारतात भाषा, पोशाख, आहार, संस्कृती या सर्वांमध्ये भरपूर वैविध्य आहे. संस्कृतसारख्या प्राचीन भाषेचं अधिष्ठान भारतातल्या अनेक भाषांना लाभले आहे. त्याच्या प्रभावातून दक्षिण भारतातल्या काही भाषांचा इतिहास आणखीन वेगळा, मराठी प्राकृत भाषेतला चामुंडराजे करवियले हा पहिला शिलालेख. प्राचीन भारतीय वाङ्मयातील बहुतांश वाङमय हे काव्यात्मकच आहे. रामायण, महाभारपासून भवभती कालिदास आणि नंतरच्या काळातील संतांनीही आपला उपदेश काव्यातूनच केला आहे. या प्राचीन वाङमयाच्या अभ्यासातून आधुनिक काळात भारतीय कवींची काव्यश्रुती जोपासली जाऊ लागली. अगदी कळत्या वयात संस्कृत काव्याचे संस्कार झालेला एक बंगाली तरूण मोठी वाङ्यनिर्मितीची सुरुवात काव्यापासूनच करतो.



# महाकुंभ मेळा व भारतीय संस्कृती

**नरहरे तिरूमला दिनकर**
बी.ए.तृतीय वर्ष

**महाकुंभ : इतिहासातील एक पवित्र संगम**

महाकुंभ हा एक अत्यंत महत्त्वाचा धार्मिक आणि सांस्कृतिक महोत्सव आहे. ज्याचे ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व आपल्या प्राचीन संस्कृतीमध्ये खोलवर रूजलेले आहे. भारतीय उपखंडातील सर्वात मोठा आणि पुरातन धार्मिक मेळा म्हणून महाकुंभाची ओळख आहे. प्रत्येक चार वर्षांनी आयोजित होणारा महाकुंभ विशेषत: हरिद्वार, प्रयागराज (अलाहाबाद), नाशिक आणि उज्जैन या ठिकाणी होणारा, हे केवळ भारतासाठीच नव्हे तर संपूर्ण जगासाठी एक आदर्श धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक ठरतो. महाकुंभाच्या इतिहासात एकाच वेळी लाखो लोकांचे एकत्र येणे आणि त्यांचे एकत्रितपणे पवित्र भाव अनुभवने हा महत्त्वाचा इतिहास आहे.

**महाकुंभाची सुरूवात : पुराण आणि धार्मिक संदर्भ**

महाकुंभाची पार्श्वभूमी अत्यंत प्राचीन आहे. याचे आरंभ वेद आणि पुराणांमध्ये सापडतात. भारतीय धार्मिक साहित्यात महाकुंभाच्या संदर्भात अनेक कथा आणि अख्यायिका दिल्या आहेत. विशेषत: 'भागवतम्', 'विष्णू पुराण' आणि 'मार्कंडेय पुराण' यामध्ये या मेळाव्याचे उल्लेख आहेत.

महाकुंभाची कथा 'अमृत मंथन' या प्रसंगातून सुरू होते. देव आणि दानव यांच्यातील युद्धात देवांनी 'अमृत' मिळवण्यासाठी मंथन केल्यावर त्या अमृत कलशाच्या रक्षणासाठी भगवान विष्णुंनी मोरध्वज व राक्षसांच्या शिरावर घोड्यांच्या गळ्यात ठेवले होते. यामुळे त्या 'कुंभ' म्हणजेच अमृताच्या कलशाची आणि त्याच्या वर्तमानाची एक पवित्रता जोडली गेली आहे. त्याच त्या कुंभातून चार ठिकाणी अमृताचे काही थेंब पडले, आणि त्या ठिकाणी एक महाकुंभाचा मेळा होऊ लागला.

**महाकुंभाच्या स्थळांचे धार्मिक महत्त्व :**

महाकुंभाच्या चार प्रमुख स्थळांमध्ये हरिद्वार, प्रयागराज (अलाहाबाद), नाशिक आणि उज्जैन या ठिकाणांचा समावेश आहे. प्रत्येक ठिकाणाची आपली एक धार्मिक महत्त्वाची पार्श्वभूमी आहे. आणि प्रत्येक नदीसुद्धा पवित्र मानली जाते.

महाकुंभ हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र आणि ऐतिहासिक धार्मिक मेळा आहे. जो प्रत्येक चार वर्षांनी चार प्रमुख स्थानांवर आयोजित केला जातो. या स्थळांची धार्मिक महत्त्वाची पार्श्वभूमी प्राचीन हिंदू पुराण, वेद आणि धार्मिक कथांमध्ये स्पष्टपणे सांगितली आहे. या ठिकाणी लाखो लोक एकत्र येऊन स्नान करतात. पूजा अर्चना करतात आणि आध्यात्मिक शुद्धता प्राप्त करतात. चला तर मग प्रत्येक महाकुंभ स्थानाच्या धार्मिक महत्त्वावर सखोल दृष्टीक्षेप टाकू या!

**१. हरिद्वार :**

गंगा नदीच्या काठावरील पवित्रता आणि मोक्षाचे स्थळ हरिद्वार म्हणजे 'भगवानाची दारं'. हरिद्वार हे गंगा नदीच्या काठी वसलेले एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. पुराणानुसार हे ठिकाण अत्यंत पवित्र आणि महत्त्वाचे आहे. येथे गंगा नदीला 'भागीरथी' म्हणून संबोधले जाते. कारण पौराणिक कथेनुसार राजा भागीरथाने गंगाला पृथ्वीवर आणले होते.

**गंगा नदीचा पवित्र अर्थ :**

गंगा नदी हिंदू धर्मात एक अत्यंत पवित्र आणि जीवनदायिनी नदी मानली जाते. ती जीवनदायिनी म्हणून पूजनीय आहे. कारण ती पवित्रता, शुद्धता प्रदान करते आणि सर्व पापांचे शमन करते. हरिद्वारमध्ये गंगा नदीचे पाणी अत्यंत पवित्र मानले जाते. येथे स्नान केल्याने सर्व पापांचा नाश होतो असे मानले जाते. प्रत्येक कुंभ मेळ्यात येथे मोठ्या प्रामणावर श्रद्धाळू आणि साधू-संत एकत्र येतात.

**हरिद्वाराचे पौराणिक महत्त्व :**

'भागवतम्' आणि 'विष्णू पुराण' यामध्ये हरिद्वारच्या पवित्रतेचा उल्लेख आहे. या पुराणामध्ये असे वर्णन आहे की गंगा  नदी या ठिकाणी अमृताच्या थेंबाप्रमाणे पवित्र झाली आणि तेथील पाणी संपूर्ण पृथ्वीवर त्याच्या शुद्धतेची छाप सोडते. तसेच येथे भगवान शिवाचे पवित्र मंदीर आहे.

**महाकुंभ आणि हरिद्वार :**

महाकुंभ हा हरिद्वारमध्ये एक अत्यंत विशेष धार्मिक सोहळा असतो. हरिद्वारमध्ये महाकुंभ आयोजित करताना साधू, संन्सासी, यात्रेकरू व भक्त यांच्यात एक विशिष्ट आध्यात्मिक उंची साधली जाते.

**२. प्रयागराज :**

संगम, तीन नद्यांचे मिलन आणि मोक्षाचे स्थळ! प्रयागराज जे पूर्वी इलाहाबाद म्हणून ओळखले जात होते. हिंदू धर्मात एक अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र आहे. येथे गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचे मिलन होते. या संगमाचे पावित्र्य आणि धार्मिक महत्त्व अत्यंत मोठे आहे.

**त्रिवेणी संगम :**

प्रयागराजचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे 'त्रिवेणी संगम' - जिथे गंगा, यमुना आणि सरस्वती नद्या एकत्र येतात. गंगा आणि यमुना यांचे प्रत्यक्ष दर्शन होते तर सरस्वती नदी पृथ्वीवर दिसत नाही परंतु पुराणानुसार ती भूमिगत वाहते आणि ती एक अदृश्य नदी आहे. त्रिवेणी संगम येथे स्नान केल्याने एक असामान्य शुद्धता प्राप्त होते व या स्नानाला मोक्ष प्राप्त करण्याचे महत्त्व दिले जाते.

**प्रयागराजचे पौराणिक महत्त्व :**

प्रयागराज हे स्थान पौराणिक कथा आणि पुराणांमध्ये अत्यंत महत्त्वाचे आहे. भगवान बह्म यांनी येथे यज्ञ केला होता. जेथे यमुनेच्या पाण्याने संचार केले.

**महाकुंभ आणि प्रयागराज :**

प्रयागराजमध्ये आयोजित होणारा महाकुंभ हा एक ऐतिहासिक आणि धार्मिक प्रसंग असतो. येथे एकत्र होणारी लाखोंची गर्दी गंगा, आणि यमुनेच्या पाण्यात स्नान करणे, धार्मिक अनुष्ठाने यांचे पारायण हे भक्तांच्या अध्यात्मिक उन्नतीसाठी महत्त्वाचे मानले जाते. प्रयागराज येथे आयोजित महाकुंभ हे भारतातील सर्वात मोठे धार्मिक कार्यक्रम म्हणून ओळखले जाते. जिथे सर्व धर्म, पंथ आणि जातीचे लोक एकत्र येतात.

**३. नाशिक :**

नाशिक हे महाराष्ट्र राज्यातील एक महत्त्वाचे धार्मिक केंद्र आहे. येथे गोदावरी नदी वाहते जी भारतातील दुसऱ्या क्रमांकाची पवित्र नदी मानली जाते. गोदावरी नदीचे पाणी पवित्र मानले जाते आणि नाशिक हे तीर्थक्षेत्र म्हणून अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

**गोदावरी नदीचा पवित्र अर्थ :**

गोदावरी नदीला 'दक्षिणेची गंगा' म्हणून संबोधले जाते. पुराणांमध्ये गोदावरी नदीला एक पवित्र नदी मानले आहे. जी मानवी जीवनाच्या शुद्धतेचे प्रतिक आहे. नाशिकमध्ये गोदावरी नदीत स्नान केल्याने पापांचा नाश

होतो आणि मोक्ष प्राप्त होतो असे मानले जाते.

**नाशिकचे पौराणिक महत्त्व :**

नाशिकच्या पवित्रतेचा उल्लेख विविध पुराणांमध्ये करण्यात आलेला आहे. 'विष्णु पुराण' आणि 'भागवतम'मध्ये गोदावरीच्या पवित्रतेचा उल्लेख आहे. याशिवाय नाशिक परिसरात 'रामेश्वर' व 'कृष्णा' यांचे अनेक मंदिरे आहेत. जिथे भक्त पूजा करून गंगेश्वर आणि गोविंद देवता यांच्या आशीर्वादाने आपली जीवनशैली सुधारू इच्छितात.

**महाकुंभ आणि नाशिक :**

नाशिकमध्ये महाकुंभाचे आयोजन हळूहळू वाढले आहे. गोदावरी नदीच्या पवित्र पाण्यात स्नान करण्यासाठी लाखो लोक या ठिकाणी एकत्र येतात. येथे आयोजित शाही स्नान अन्य धार्मिक कार्ये महाकुंभाच्या महत्त्वपूर्ण घटकांचा प्रमुख भाग असतात.

**४. उज्जैन :**

उज्जैन हे मध्य प्रदेशातील एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. या ठिकाणी शिप्र नदी वाहते. हे स्थान भगवान शिवाशी संबंधित आहे आणि हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र स्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

**शिप्र नदीचा पवित्र अर्थ :**

शिप्र नदीला एक पवित्र नदी मानली जाते. या नदीमध्ये स्नान केल्याने सर्व पापांचा नाश होतो अशी श्रद्धा आहे. उज्जैन येथे शिवजींची पूजा आणि महाकुंभ याचे महत्त्व विशेष आहे.

**उज्जैनचे पौराणिक महत्त्व :**

उज्जैन हे स्थान महाशिवरात्र आणि अन्य धार्मिक उत्सवांवर भरलेले आहे. पुराणामध्ये असे सांगितले जाते की, भगवान शिवजींनी येथे तप केले आणि येरझंड तपाशी संबंधित असलेल्या महत्त्वाच्या कार्याची पारायण केली.

**महाकुंभ आणि उज्जैन :**

उज्जैनमध्ये महाकुंभाच्या वेळी लाखो भक्त आणि साधू एकत्र येतात आणि शिप्र नदीमध्ये पवित्र स्नान करतात. या ठिकाणी खास शाही स्नान सोहळे आयोजित केले जातात आणि उर्जित शिवपूजन करणे हे महाकुंभाच्या धार्मिक महत्त्वाचा भाग बनते.

महाकुंभाच्या या चार प्रमुख स्थळांमध्ये भक्तांच्या आध्यात्मिक शुद्धतेचा, पापांची निवृत्तीचा आणि मोक्ष प्राप्तीचा एक अभूतपूर्व आदर्श प्रस्तूत केला जातो. महाकुंभ हा एक महत्त्वपूर्ण आणि अनोखा धार्मिक मेळा आहे.

**महाकुंभाचे सांस्कृतिक आणि अध्यात्मिक महत्त्व :**

महाकुंभ हे फक्त धार्मिक कार्यक्रम नाही तर ते भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. या सोहळ्यामुळे लोकांना एकत्र येण्याची संधी मिळते. वेगवेगळ्या समाज आणि संस्कृतीचे आदान-प्रदान होते आणि सर्वांसाठी आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग उघडला जातो. याशिवाय महाकुंभ सामाजिक ऐक्य आणि सहकार्याचे एक उत्तम उदाहरण आहे.

महाकुंभ हा एक अत्यंत पवित्र धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आहे ज्याचे महत्त्व इतिहासाच्या वळणांतून आले आहे. त्याचे धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व अनमोल आहे. या मेळ्याचा अनुभव घेणाऱ्याला पवित्रता, शांती आणि उन्नती मिळवण्यासाठी एक अद्भूत संधी प्राप्त होते. त्याचप्रमाणे महाकुंभाने भारताच्या एकतेला आणि विविधतेला जागतिक पातळीवर प्रदर्शित केले आहे.



# वंदे मातरम् गीत व भारतीय संस्कृती

**काटे अशितोष उत्तम**
बी.ए.द्वितीय वर्ष

भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्' हे फक्त गाणे नसून त्यापेक्षा अधिक आहे. हे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. देशाच्या लवचिकता आणि एकतेचा दाखला आहे. विवाद आणि टिका असूनही भारतीय संस्कृतीत या गिताचे चिरस्थायी लोकप्रियता आणि महत्त्व निर्विवाद आहे. हे मुळ बंगाली आणि संस्कृतमध्ये रचलेले होते. २४ जानेवारी १९५० रोजी भारताच्या संविधानाने स्वीकारले. हे गीत राष्ट्रगीत समान दर्जाचे, संस्कृतीचा मान जपणारे आहे. भारतातील जनतेला व नव्या पिढीला संस्कृतीची जाण करून देण्यासाठी महत्त्वाचे आहे. रविंद्रनाथ टागोर यांनी भारतीय राष्ट्रीय विवादाच्या अनुभव वंदे मातरम् या गीतात गायले असून वंदे मातरमला राष्ट्रगीताचे स्थान व जनगणमन हे राष्ट्रगीत म्हणून निवडले. तरी 'वंदे मातरम्' हे देशभक्ती आणि एकतेचे एक आदरणीय गीत.



भारताला समृद्ध सांस्कृतिक वारसा, विविध भाषा आणि खोलवर रूजलेल्या परंपरा आहेत. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगान यासारख्या प्रचंड विविधतेचे प्रतीक यांना भारतीयांच्या हृदयात एक अद्वितीय स्थान आहे. राष्ट्रीय अभिमान आणि एकतेचे तसेच एक प्रतीक म्हणजे भारताचे राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम्'! १८७६ मध्ये बंकिमचंद्र चट्टोपाध्याय (चॅटर्जी) यांनी लिहिलेले 'वंदे मातरम्' हे भारताच्या स्वातंत्र्य युद्धात महत्त्वाचे होते आणि आजही लाखो भारतीय जनतेला ते प्रेरणा देत आहे.

'वंदे मातरम्' हे गीत नाही ते देशभक्ती आणि भारतीयांच्या मातृभूमीशी असलेल्या मजबूत भावनिक बंधनाशी एक मजबूत व शक्तीशाली अभिव्यक्ती आहे. हा भारताच्या राष्ट्रीय गीताचा इतिहास, चळवळीचा सहभाग व अनेकांच्या मरणातून प्राप्त झालेला व देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचा वारसा आहे.

'वंदे मातरम्' ज्याचा अर्थ 'मी तुला नमन करतो आई' असा होतो. हे गाण्याचे बोल मातृत्वाला श्रद्धांजली वाहतात. भारताला स्वर्गीय मातृत्व म्हणून चित्रित करतात आणि तिच्या सौंदर्याचे, सामर्थ्याचे आणि वैभवाचे गौरव करतात. वंदे मातरम्चे शब्द देशभक्ती आणि देशाप्रती आदराच्या तीव्र भावना निर्माण करतात. धार्मिक आणि सामाजिक मूल्यांसाठी मौल्यवान असलेल्या भारतातील संस्कृत या गाण्याची इच्छा त्याची लोकप्रियता वाढवत, सर्व भाषिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी व्यक्तींसाठी ते एकात्मता गीत बनले.

विसाव्या स्थानिक स्वदेशी चळवळी दरम्यान 'वंदे मातरम्' हे ब्रिटीश आर्थिक धोरणाच्या प्रतिकाराचे प्रतीक बनले. हे स्तोत्र मुक्त संग्राम सैनिक आणि नियमित राहिवाले यांनी गायले होते. बाळ गंगाधर टिळक, लाला लजपत राय आणि अरविंद घोष यांनी 'वंदे मातरम्' या गाण्याचा वापर एकात्मतेचा नारा आणि राष्ट्र म्हणून भारताच्या रक्षण करणाऱ्या लष्करी भावनेशी जोडले. या गीताला व्यापक स्वीकृतीही आहे. काही मुस्लिम गटांनी या गीतामध्ये भारताला देवी म्हणून सादर केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. हा एक परिवारातील वाद होता, वादविवादांशिवाय परिवार नाही.

वंदे मातरम्,

सुजलाम सुफलाम मलयजशीतलाम्
सस्सश्यामलाम् मातरम्।
शुभ्रज्योत्सना पुलकितयामिनीम्
फुल्लकुसुमित दरुमदलशोभिनीम्
सुहासिनीम् सुमधुर भाषिणीम्
सुखदाम् वरदाम् मातरम्।।१।।
वन्दे मातरम्।

# महाकुंभ मेळा व भारतीय संस्कृती

**पोलावार नंदिनी शिरीष**
बी.ए.प्रथम वर्ष



भारत देशाला साधू, संत आणि आध्यात्माची भूमी लाभली आहे. येथे अनेक धार्मिक मेळावे आणि उत्सव साजरे केले जातात. त्यापैकी सर्वात मोठा आणि भव्य म्हणजे कुंभमेळा. कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक मेळा मानला जातो. हा मेळा दर बारा वर्षांनी चार प्रमुख ठिकाणी भरतो. प्रयागराज (अलाहाबाद), हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक.

**कुंभमेळ्याचे महत्त्व :**

कुंभमेळा हा केवळ धार्मिक नाही तर सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्टीने महत्त्वाचा सोहळा आहे. असे मानले जाते की, या काळात गंगास्नान केल्याने पापक्षालन होते आणि मोक्षप्राप्ती होते. लाखो भाविक, साधू, नागा साधू, संन्यासी आणि पर्यटक या मेळाव्यात हर्षो ल्हासाने सहभागी होतात.

**कुंभ मेळ्याची पार्श्वभूमी :**

पौराणिक कथेनुसार समुद्र मंथनातून अमृतकुंभ बाहेर आला त्यावेळी देव आणि दानव यांच्यात अमृत वाटणीसाठी संघर्ष झाला. तेव्हा देवतांनी चार ठिकाणी अमृताचे काही थेंब टाकले. ती चार ठिकाणे पृथ्वीवरील पवित्र स्थळे बनली आणि म्हणून या चारही ठिकाणी कुंभमेळ्याचे आयोजन केले जाते.

**कुंभमेळ्याची वैशिष्ट्ये :**

या मेळ्यात शाही स्नानाला विशेष महत्त्व असते. नागा साधूंचे मिरवणुकीत सहभाग, विविध धार्मिक विधी प्रथेचे भजन, कीर्तन आणि भव्य स्नान सोहळा हे कुंभमेळ्याचे मुख्य आकर्षण असते. लाखो भाविकांचे एकत्र आगमन आणि भव्य आयोजन यामुळे हा मेळा जगभर प्रसिद्ध आहे.

कुंभमेळा हा भारतीय संस्कृतीतील अनमोल वारसा आहे. श्रद्धा, भक्ती, आध्यात्म आणि ऐक्य यांचे प्रतीक असलेला हा सोहळा संपूर्ण जगभरातील लोकांना आकर्षित करतो. त्यामुळेच हा एक अनोखा आणि भव्य धार्मिक महोत्सव मानला जातो.

# महाकुंभ एक पवित्र पर्व

**कांबळे साधना भारत**
बी.ए.प्रथम वर्ष

महाकुंभ मेळा व भारतीय संस्कृतीचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सांस्कृतिक आयोजन आहे. हा मेळा विशेषत: उत्तर प्रदेशातील प्रयागराज (पूर्वीचे इलाहाबाद) येथे साजरा केला जातो. ज्यामध्ये लाखो भक्त गंगा, यमुना आणि सरस्वती या पवित्र नद्यांच्या संगमावर स्नान करण्यासाठी एकत्र येतात. महाकुंभ मेळ्याचे धार्मिक महत्त्व आणि त्याचे ऐतिहासिक महत्त्व भारतीय संस्कृतीत खोलवर रूजलेले आहे.

महाकुंभ मेळा प्रत्येक १२ वर्षांनी होतो. अत्यंत पवित्र नद्यांच्या संगमामध्ये स्नान केल्याने पापांचा नाश होतो आणि मोक्ष प्राप्ती होते. कुंभमेळ्याच्या वेळेवर विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित केले जातात. हा एक मोठा सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उत्सव बनतो. महाकुंभाचे आयोजन भारताच्या विविध राज्यातील भक्तांसाठी एक अद्वितीय अनुभव असतो. अनेक साधू, संत, तज्ञ आणि भक्त या मेळ्यात सहभागी होतात आणि त्यामुळे एकत्रित भारतीय धर्म, संस्कृती आणि परंपरा यांचे दर्शन याठिकाणी पहावयास मिळते. महाकुंभ मेळा भारतीय संस्कृतीमधील एक अत्यंत ऐतिहासिक आणि सांस्कृतिक उत्सव आहे ज्यामुळे भारतीय समाजाचे एकात्मिक रूप आणि धार्मिक विविधता यातून ठळकपणे दिसून येते.

**महाकुंभ मेळ्याचे महत्त्व :**

महाकुंभ मेळा हा भारतीय संस्कृतीतील अत्यंत महत्त्वपूर्ण धार्मिक आणि सांस्कृतिक आयोजन मानले जाते. त्याचे महत्त्व अनेक अंगांनी समजून घेता येईल.

**धार्मिक महत्त्व :**

महाकुंभ मेळ्याचे सर्वात मोठे धार्मिक महत्त्व म्हणजे गंगा, यमुना आणि सरस्वती या पवित्र नद्यांच्या त्रिवेणी संगमावर स्नान करण्याचा योग! हिंदू धर्मानुसार या दिवशी या त्रिवेणी संगमावर स्नान केल्याने सर्व पापांचे नाश होते आणि मोक्ष प्राप्ती होते. यामुळे भक्तांना आत्मिक शांती आणि पापांचे प्रायश्चित मिळवता येते.

**आध्यात्मिक महत्त्व :**

महाकुंभ मेळा एक आध्यात्मिक केंद्र मानला जातो. यामध्ये साधु, संत, तज्ञ आणि भक्त एकत्र येऊन ध्यान, मंत्रजाप, प्रार्थना आणि धार्मिक प्रवचनांद्वारे आध्यात्मिक उन्नती साधतात.

**सांस्कृतिक महत्त्व :**

महाकुंभ मेळा भारताच्या विविध संस्कृती आणि परंपरांचा संगम दर्शवतो. येथे विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. ज्यामुळे भारतीय विविधतेला मान्यता मिळते. विविध क्षेत्रातील कला आणि संस्कृतीचे आदानप्रदान होऊन ते भारतीय समाजाची एकात्मता दर्शवते.

**आर्थिक महत्त्व :**

महाकुंभ मेळा आर्थिकदृष्ट्या देशतील महत्त्वपूर्ण ठरतो. हा मेळा अनेक व्यापारी, उद्योग, पर्यटक आणि

पर्यटन क्षेत्रासाठी एक मोठी संधी निर्माण करतो. लाखो लोक या मेळ्यात सहभागी होतात त्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. यामध्ये लहान-मोठ्या स्थानिक दुकानदार, हॉटेल, वाहतूक आदी व्यवसायांना खूप मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होते.

**ऐतिहासिक महत्त्व :**

महाकुंभ मेळा प्राचीन काळापासून चालत आलेला एक पारंपरिक उत्सव आहे. त्याचा ऐतिहासिक वारसा आणि भारतीय परंपरांशी जोडलेली नाळ भारताच्या धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक इतिहासाला अधोरेखित करते. यामुळे महाकुंभमेळा केवळ एक धार्मिक उत्सव नसून तो भारतीय संस्कृतीच्या विविध पैलूंना उजाळा देणारा अतिशय महत्त्वपूर्ण सण ठरतो.

**महाकुंभ मेळ्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम :**

पर्यावरणावरील परिणाम या संदर्भात महाकुंभ मेळा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. कारण या भव्य धार्मिक उत्सवामुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होतात. काही मुख्य पर्यावरणीय परिणाम पुढीलप्रमाणे आहेत-

**जलप्रदुषण :**

महाकुंभ मेळ्यादरम्यान लाखो भक्त गंगा, यमुना आणि अन्य नद्यांमध्ये स्नान करतात. त्यामुळे नदीच्या पाण्यात सॅनिटेशन, साबण आणि अन्य रासायनिक पदार्थ मिसळले जातात. ज्यामुळे जलप्रदुषण होऊ शकते. यामुळे नद्यांचे जैविक संतुलन बिघडून जलजीवनावर विपरीत परिणाम होतो.

**हवामानातील बदल :**

महाकुंभ मेळ्यात अनेक लाखोंच्या संख्येने सहभागी होणाऱ्या लोकांच्या उपस्थितीमुळे वायू प्रदषण वाढू शकते. वाहनांची वाढती संख्या, इंधनाचे प्रदुषण आणि मोठ्या प्रमाणात कचरा यामुळे पर्यावरणावर दुष्परिणाम होतात.

**वनस्पती आणि जैवविविधता :**

मेळ्याच्या आयोजनामुळे नद्यांच्या परिसरातील जमीन तणावग्रस्त होऊ शकते. यामुळे वनस्पतींना आणि जैवविविधतेला धोका निर्माण होऊ शकतो. सणाच्या काळात अधिक लोकांच्या उपस्थितीमुळे निसर्गावर दबाव येतो.

**ध्वनी प्रदुषण :**

महाकुंभ मेळ्यात विविधा धार्मिक कार्यक्रम, भव्य ध्वनी सिस्टीम्स आणि विविध उत्सवात्मक आवाजांमुळे ध्वनी प्रदुषणात वाढ होते. हे जैविक विविधतेवर तसेच लोकांच्या मानसिक आरोग्यावरही त्याचा परिणाम होऊ शकतो.

**कचरा व्यवस्थापन :**

महाकुंभ मेळ्यात अनेक लाखो लोक एकत्र येतात. ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होतो. कचरा व्यवस्थापनाच्या अडचणी निर्माण होतात आणि नद्या व आजूबाजूच्या परिसरात प्लास्टीक, कागद आणि अन्य कचरा टाकला जातो. या कचऱ्यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होतो.

**निवारणासाठी उपाय :**

- जलप्रदुषण टाळण्यासाठी नदी तिरांवर स्वच्छता अभियान राबवणे आणि स्वच्छता राखण्यासाठी जनजागृती करणे.
- कचरा व्यवस्थापनासाठी अधिक जागरूकता निर्माण करणे व कचरा विल्हेवाटीसाठी उत्तम पर्याय शोधणे.
- ध्वनी प्रदुषण कमी करण्यासाठी ध्वनी नियंत्रण साधनांचा वापर करणे.
- पर्यावरणासह जीवनशैलीला जपण्यासाठी भक्तांना प्रेरित करणे.

# भारतीय संस्कृतीचे महादर्शन

**बने सुहानी**
बी.ए.तृतीय वर्ष

**महाकुंभ मेळा व भारतीय संस्कृती**

'वसुधैव कुंटुंबकम्' हाच भारतीय संस्कृतीचा संदेश आहे. कुंभ आपल्या भारत देशाची विविधता आणि समृद्ध संस्कृती समजावून घेण्याची उत्तम संधी आहे. २०२५ च्या महाकुंभाच्या निमित्ताने या ठिकाणी भाविक आणि पर्यटकांना अनेक प्रदेशांच्या विविध कला पहावयास मिळतील. या कुंभाचा शुभारंभ मकरसंक्रांतीपासून होत आहे. या निमित्ताने भारताच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन इथे घडणार आहे.

सनातन धर्मात अयोध्या आणि प्रयागराज यांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. या महिन्यात एक दुर्लभ संयोग होतोय. एकीकडे अयोध्येमध्ये श्रीराम मंदीर प्राणप्रतिष्ठेचे यशस्वी नियोजन व महाकुंभाची जय्यत तयारी हे दोन्हीही उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याच नेतृत्वात केले गेले.

तब्बल १४५ वर्षांनी महाकुंभाचा असा शुभयोग यावर्षी आला आहे. प्रमुख स्नानावेळी पुण्य संतांसाठी व भक्तांच्या स्वागतासाठी पुष्पवर्षाव केला जाणार आहे. १३ जानेवारी रोजी पौष पौर्णिमेचे प्रथम स्नान होईल. २९ जानेवारीला मौनी अमावस्येनिमित्त स्नान असेल. असा अंदाज आहे की या दिवशी सहा ते आठ कोटी भाविक येथे



सहभागी होतील. ३ फेब्रुवारीस वसंत पंचमी आहे. त्यानंतर १२ आणि २६ फेब्रुवारी अशी एकूण पाच पवित्र स्नाने असतील.

५०० वर्षानंतर योगी आदित्यनाथ सरकारने इलाहाबादला आपले वैचारिक व पौराणिक 'प्रयागराज' हे नाव परत मिळवून दिले. याच पार्श्वभूमीवर २०१९ चा कुंभ प्रयागराजमध्ये आयोजित केला गेला. पंतप्रधान नरेंद्री मोदी यांनी तेथे कुंभ कलशाचे पूजन केले. २०१९ च्या कुंभपर्वाच्या शुभारंभाआधीच पाच शतकातील एक विक्रम स्थापित झाला होता. तत्पूर्वी या कालावधीतील कुंभ इलाहाबाद येथे झाले. २०१९ मध्ये मात्र प्रथमच महाकुंभाचे आयोजन प्रयागराज येथे झाले. त्या वर्षीचे योगी आदित्यनाथ यांचे भव्य नियोजन अनेक बाबतीत अभूतपूर्व ठरले. हे कार्य निव्वळ शासनसत्तेच्या माध्यमातूनच होते असे नाही. तर त्यासाठी त्यांनी कुंभ तयारीचे निर्देशन केले. तेथील संपूर्ण व्यवस्थांचे सर्व स्तरातून कौतुक होत होते. २०१९ च्या या कुंभमेळ्यात अनेक विश्वस्तरीय कीर्तीमान स्थापित झाले. अशीच उत्तम व्यवस्था योगी आदित्यनाथ यांनी केली होती.

सरकारी यंत्रणांनीसुद्धा याच भावनेतून कार्य केले. पन्नास वर्षात प्रथमच तीर्थयात्रींना स्नानासाठी इतके शुद्ध जल लाभले. प्रथमच तीर्थयात्रींनी पौराणिक अक्षयवट आणि सरस्वती कृपाचे दर्शन घेतले. अशा आस्थेच्या स्पर्शाने सर्वच वातावरण बदलले. याप्रसंगी प्रयागराज येथे सांस्कृतिक केंद्रासाठी कलाग्रामची व्यवस्था केली गेली. युनेस्कोने या कुंभमेळ्यास 'मानवतेचा अमुर्त सांस्कृतिक वारसा' अशी संज्ञा दिली. त्यावेळी प्रवासी संमेलन प्रतिनिधीव्यतिरिक्त ७१ देशांचे राजदूत मेळ्यात आले होते. जलशुद्धीसाठी गंगोत्री ते प्रयागराजपर्यंत नालींमधील अशुद्ध पाणी गंगेत प्रवाहीत होणे थांबविले गेले.

प्रयागराज कुंभाचे भव्य आयोजन मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या यशस्वी नियोजनाची उपलब्धता आहे. येथे सर्वाधिक संख्येने स्नानार्थी आले. २०१९ मध्ये 'स्वच्छ कुंभ – सुरक्षित कुंभ' ही संकल्पना यशस्वी ठरली. हजारो विद्यार्थ्यांनी आठ तासांपर्यंत चित्रे काढली. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये याची नोंद झाली. १० हजार सफाई कर्मचाऱ्यांनी एकत्र साफसफाईचा विश्वविक्रम नोंदवला. २०१९ च्या कुंभामध्ये चोवीस कोटींहून अधिक भाविकांनी स्नान केले. एवढ्या मोठ्या संख्येच्या देखरेखीसाठी 'इंटिग्रेटेड कमांड अॅण्ड कंट्रोल सिस्टिम' स्थापित केले होते. आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा प्रयोगसुद्धा झाला.

याच प्रयागराज कुंभादरम्यान मा. पंतप्रधानांनी सफाई कर्मचाऱ्यांचे पाद्यपूजन केले. २०१९ चा कुंभ यंत्रणा व सुविधा यांच्या विकसित रूपासाठी आणि सुव्यवस्थेसाठी ओळखला गेला. कुंभाचे ऐतिहासिक महत्त्व जगप्रसिद्ध आहे. अशा प्रकारचे आयोजन अन्यत्र कोठेही होत नाही. प्रत्येक सरकार आपल्या स्तरावर यशस्वी आयोजनाचे प्रयत्न करत असतेच. परंतु योगी आदित्यनाथ एवढेच करून थांबले नाहीत तर भावनात्मक पद्धतीने त्यांनी स्वत:ला कुंभाशी जोडून घेतले आहे. तेच २०१९ च्या आयोजनातून दिसून आले.

२०१९ च्या यशस्वी कुंभ आयोजनानंतर योगी आदित्यनाथ यांच्या मार्गदर्शनाखाली होऊ घातलेल्या २०२५ मधील महाकुंभ मेळ्याचे सर्वांनाच औत्सुक्य लागून आहे. यावेळी होणाऱ्या महाकुंभातील सहभागी भाविकांच्या संख्येने जगाच्या इतिहासातील सर्वच नोंदींची आकडेवारी मोडीत निघण्याची शक्यता वर्तविली जात आहे. अत्याधुनिक यंत्रणा व योगी आदित्यनाथ यांचे नियोजन याची सांगड असलेला हा महाकुंभ मेळा संपूर्ण विश्वातील भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे यात शंका नाही.



# तत्त्वज्ञानी महाराणी : अहिल्यादेवी होळकर

**कुलकर्णी आदिती**
बी.ए.तृतीय वर्ष

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारत देशातील माळव्याच्या तत्त्वज्ञानी महाराणी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी नर्मदा तिरी, इंदूरच्या दक्षिणेस असलेल्या महेश्वर या ठिकाणी आपली राजधानी हलवली. मल्हाररावांनी त्यांना प्रशासकीय व सैन्याच्या कामात पारंगत केलेले होते. या आधाराने अहिल्याबाईंनी इ.स. १७६६ ते १७९५ म्हणजे त्यांच्या मृत्यूपर्यंत माळव्यावर राज्य केले होते.

या थोर महिलेचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्राच्या अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चौंडी (मल्हारपीठ) खेड्यात झाला. त्यांचे वडील माणकोची शिंदे हे त्या गावचे पाटील होते. स्त्री शिक्षण फारसे प्रचलित नसतानाही त्यांच्या वडीलांनी त्यांना लिहिण्यावाचण्यास शिकवले होते. मल्हारराव होळकर पुण्यास जाताना चौंडीस थांबले होते. अख्यायिकेनुसार ८ वर्षाच्या अहिल्यादेवींना मल्हाररावांनी एका देवळात बघितले. मुलगी आवडल्यामुळे त्यांनी तिला स्वत:चा मुलगा खंडेराव यांची वधू म्हणून आणले.

मल्हारराव होळकरांच्या त्या सून होत्या. अहिल्यादेवीचे पती खंडेराव होळकर हे इ.स. १७५४ मध्ये कुम्हेरच्या लढाईत धारातीर्थ पडले. त्यांच्या मृत्यूनंतर सासरे मल्हाररावांनी अहिल्याबाईंना सती जाऊ दिले नाही. १२ वर्षानंतर मल्हारराव होळकर हेही मृत्यू पावले. त्यानंतर अहिल्याबाई मराठा साम्राज्याच्या माळवा प्रांताचा कारभार पाहू लागल्या. त्या युद्धामध्ये अहिल्यादेवी स्वत: सैन्याचे नेतृत्व करीत होत्या. पुढे त्यांनी तुकोजीराव होळकर यांची सेनापती म्हणून नेमणूक केली.

इंग्रजी लेखक लॉरेन्स यांनी अहिल्यादेवी होळकर यांना भारताच्या 'कॅथरीन द ग्रेट एलिझाबेथ मार्गारेट' असे म्हटले आहे. थोडक्यात अहिल्याबाई यांची तुलना रशियाची राणी कॅथरीन द ग्रेट, इंग्लंडची राणी एलिझाबेथ तसेच डेन्मार्कची राणी मार्गारेट यांच्याशी एकत्रित केली आहे. त्याने म्हटले आहे की, ज्या वेळी जगातील सर्वात महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल त्यावेळेस पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सर्वप्रथम लिहिले जाईल.

अहिल्याबाई होळकर या उचित न्यायदानासाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी भारतभर अनेक हिंदू मंदिरे व नदीघाट बांधले. एवढेच नाही तर त्यांनी लोकांना रोजगार निर्माण व्हावा म्हणून औद्योगिक धोरण आखले. प्रसिद्ध हिंदू मंदिराचा त्यांनी जीर्णोद्धार केला. महेश्वर व इंदूर या गावांना सुदंर बनवले. त्या अनेक देवळांच्या आश्रयदात्या होत्या. त्यांनी अनेक तीर्थक्षेत्री धर्मशाळांचे बांधकाम केले. त्यात द्वारका, काशी, उज्जैन, नाशिक व परळी वैजनाथ यांचा प्रामुख्याने समावेश आहे. वेरावळा येथील सोमनाथाचे गझनीच्या महंमदाने ध्वस्त केलेले देऊळ बघून अहिल्यादेवींनी शेजारीच एक देऊळ बांधले. सोमनाथाला जाणारे भाविक या देवळाला भेट देऊन पुढे मार्गस्थ होतात. अहिल्याबाई होळकर यांना प्रजेच्या कल्याणकारी कामांची प्रचंड आवड होती. भारतातील अनेक धार्मिक स्थळांना व मंदिरांना शत्रूतर्फे करण्यात आलेल्या नासधुसीमुळे व उद्धस्ततेने त्यांचे मन खूप दु:खी झाले होते. सर्व धार्मिक स्थळे व मंदिरांचे नवनिर्माण करण्याची मोहिमच त्यांनी राबवली.

# स्वामी दयानंद सरस्वती व भारतीय संस्कृती

**राठोडे दिव्या धनराज**
बी.ए.तृतीय वर्ष

स्वामी दयानंद सरस्वती यांनी एकेश्वरवाद, वेद आणि सत्य यावर भर दिला. त्यांनी मूर्तीपूजेला विरोध केला आणि वेदांना ज्ञान आणि सत्याचे सर्वोच्च माध्यम मानले. तसेच त्यांनी आर्य समाजाची स्थापना केली.

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या प्रमुख धार्मिक विचारांची माहिती खालीलप्रमाणे :-

**एकेश्वरवाद :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी ईश्वर एक असून तो निराकार आहे यावर विश्वास ठेवला. त्यांनी हिंदू धर्मातील बहुदेववाद आणि अवतारवादाला विरोध केला.

**वेदांचे महत्त्व :**

वेद हे ज्ञानाचे आणि सत्याचे सर्वोच्च माध्यम आहे असे स्वामी दयानंद सरस्वती यांचे मानने होते. त्यांनी वेदांचे वाचन, ज्ञान प्राप्त करण्याचा आणि त्यावर आधारित जीवन जगण्याचा आग्रह केला.

**मुर्तीपूजा आणि अंधश्रद्धा :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी मुर्तिपूजेला विरोध केला आणि तिला अंधश्रद्धा आणि रूढीवादी विचारसरणीचा भाग मानले.



**सत्य आणि असत्य :**

त्यांनी नेहमी सत्य स्वीकारण्याची आणि असत्याचा त्याग करण्याची शिकवण दिली.

**आर्य समाजाची स्थापना :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८७५ रोजी मुंबई येथे आर्य समाजाची स्थापना केली. ज्याचा उद्देश वैदिक धर्माचा प्रचार करणे आणि समाजाला सुधारणे हा होता.

**सत्यार्थ प्रकाश :**

त्यांनी 'सत्यार्थ प्रकाश' नावाचे पुस्तक लिहिले. यामध्ये त्यांनी वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान मांडले.

**सामाजिक सुधारणा :**

स्वामी दयानंद सरस्वती यांनी अंधश्रद्धा आणि रूढीवादी कल्पनांना विरोध केला आणि सामाजिक सुधारणांवर भर दिला.

**विवाह संबंधी विचार :**

त्यांनी बालविवाह आणि आंतरजातीय विवाहाचा विरोध केला आणि स्त्रियांच्या हक्कांसाठी आवाज उठवला.

# वंदे मातरम् आणि भारतीय संस्कृती

**इगवे त्रिमुख**
बी.ए.द्वितीय वर्ष

वंदे मातरम गीत हे १८७० मध्ये बंकीमचंद्र चटर्जी यांनी उच्च संस्कृतमय बंगाली भाषेत लिहिलेली एक कविता आहे. त्यांनी ही कविता त्यांच्या १८८२ च्या 'आनंदमठ' या बंगाल कादंबरीत समाविष्ट केली होती. ही कविता सर्वप्रथम रविंद्रनाथ टागोर यांनी १८९६ मध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात गायली होती. ऑगस्ट १९४७ मध्ये ब्रिटीश राजवट संपण्यापूर्वी काँग्रेस कार्यकारिणीने ऑक्टोबर १९३७ मध्ये या गाण्याचे पहिले दोन श्लोक भारताचे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारण्यात आले होते.

हे मातृभूमीचे स्त्रोत आनंदमठ या कादंबरीमध्ये बंगाली लिपीत लिहिले होते. वंदे मातरम् या शीर्षकाचा अर्थ मातृभूमीच्या मातेची मी स्तुती करतो असा आहे. गाण्याच्या नंतरच्या श्लोकांमधील 'माता देवी'चे वर्णन लोकांनी मातृभूमी असे केले आहे – बगमाता आणि भारत माता परंतु मजकुरात याचा स्पष्ट उल्लेख नाही.

१८९६ च्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनात रविंद्रनाथ टागोर यांनी प्रथम राजकीय संदर्भात गायलेल्या या गीताने भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली. १९०५ पासून भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये हे लोकप्रिय मार्चिंग गाणे बनले. आध्यात्मिक भारतीय राष्ट्रवादी आणि तत्वज्ञानी श्री अरबिंदो यांनी या गीताचा उल्लेख बंगालचे राष्ट्रगीत म्हणून केला.

या गाण्यावर आणि कादंबरीवर वसाहतवादी सरकारने बंदी घातली होती. परंतु कामगार आणि सामान्य जनता यांनी ही बंदी झुगारून दिली होती. अनेकांना सार्वजनिक ठिकाणी हे गीत गाण्यासाठी वारंवार तुरुंगात टाकण्यात आले होते. १९४७ मध्ये देशाला वसाहतवादी राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने या गीतावरची बंदी हटवली.

२४ जानेवारी १९५० रोजी भारतीय संविधान सभेने वंदे मातरम् हे राष्ट्रीय गीत म्हणून स्वीकारले. याप्रसंगी भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद म्हणाले की, 'जण गण मन' या भारताच्या बरोबरीने या गाण्याचा देखील सन्मान केला पाहिजे तथापि भारतीय राज्यघटनेत राष्ट्रीय गीताचा उल्लेख नाही.

या गाण्याचे पहिले दोन श्लोक हे आई आणि मातृभूमीचा अमूर्त संदर्भ आहेत हे कोणत्याही हिंदू देवताचा उल्लेख करत नाहीत. परंतु नंतरच्या श्लोकांमध्ये दुर्गासारख्या देवींचा उल्लेख आहे. या गाण्याच्या सादरीकरणासाठी परिस्थितीनुसार ६५ सेकंद अवधीचा तपशील आहे. परंतु 'जण गण मन' या राष्ट्रगीतासाठी ५२ सेकंद हा कालावधी निश्चित आहे.

# महाकुंभ : एक अविस्मरणीय अनुभूती

**बने सुहानी सूर्यकांत**
बी.ए.तृतीय वर्ष

दर तीन वर्षानंतर एकदा अशा पद्धतीने बारा वर्षात प्रयागराज, उज्जैन, नाशिक, हरिद्वार या चार वेगवेगळ्या तीर्थक्षेत्री पूर्ण कुंभमेळे भरत असतात. दर सहा वर्षांनी हरिद्वार व प्रयाग येथे अर्धकुंभमेळा भरतो. बारा पूर्ण कुंभमेळ्यानंतर तब्बल १४४ वर्षानंतर प्रयागराज येथे महाकुंभमेळा भरतो.

**ऐतिहासिक नोंद :**

मुगलकालीन कागदपत्रांमध्ये कुंभमेळ्याच्या उत्सवाचे संदर्भ आढळतात. खुलासातून-त-तारिक या सोळाव्या शतकातील ग्रंथात असा उल्लेख असल्याचे इतिहासाचे अभ्यासक नोंदवतात. पण याविषयी सर्वच अभ्यासक एकमताने काही नोंदवतात असे नाही त्यांच्यामध्येही मतमतांतरे आहेत.

**भाविकांची उपस्थिती :**

भारतभरातून कोट्यवधी हिंदू भाविक कुंभमेळ्यात हजेरी लावतात व पवित्र नदी गंगा, यमुना व सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करतात. इ.स. २००१ साली पार पडलेल्या महाकुंभमेळ्यात अधिकृत अंदाजानुसार ३ ते ७ कोटी भाविकांनी सहभाग घेतला होता.

**ज्योतिषीय संदर्भ :**

सूर्याभोवती भ्रमण करणारे नऊ ग्रह एका रेषेत येतात त्यावेळी सूर्याचे किरण ज्या स्थानावर पडतात तिथे कुंभमेळ्याचे औचित्य साधले जाते असे मानले जाते.

**शाही स्नान :**

शाही स्नान हे कुंभमेळ्यातील विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू आहे. शाही स्नान म्हणजे एखाद्या विशिष्ट मुहूर्तावर तीर्थक्षेत्रस्थानी जाऊन तेथील नदीमध्ये स्नान करणे, सूर्याला अर्घ्य देणे, नदीची पूजा करणे असे याचे स्वरूप असते. कुंभमेळ्यातील शाही स्नानात विविध आखाडे आणि त्यातील साधू यांना अग्रक्रम दिला जातो. त्यांची विशेष शोभायात्रा काढली जाते. त्यांचे स्नान झाल्यावर नंतर अन्य भाविक नदीत स्नान करतात अशी प्रथा प्रचलित आहे.

**जागतिक सांस्कृतिक वारसा :**

कुंभमेळा हा असा धार्मिक उत्सव-सोहळा की ज्याचे कोणतेही औपचारिक नियंत्रण दिले जात नाही. असे असूनही भाविक या सोहळ्याला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहतात. हे वैशिष्ट्य लक्षात घेऊन युनिस्कोने कुंभमेळ्याला 'जागतिक सांस्कृतिक वारसा' म्हणून घोषित केले आहे.

**साधू समुहाचा सहभाग :**

कुंभमेळ्यात विविध आखाड्यांच्या साधुमंडळीचा सहभाग हे याचे विशिष्ट आणि अविभाज्य भाग मानला जातो. या विषयावर अख्यायिका मानली जाते की भागीरथाने प्रयत्न करूनही गंगा नदी पृथ्वीवर अवतरण करायला तयार होत

नव्हती. त्यावेळी तिला असे सांगितले गेले की, कुंभमेळ्या प्रसंगी तुझ्या पाण्यात साधू स्नान करतील. ते ऐकताच गंगा नदीने पृथ्वीवर येण्याचे मान्य केले. त्यामुळे कुंभमेळ्यात विविध आखाडे आणि साधू यांचे विशेष महत्त्व आहे. या उत्सवात साधू आणि त्यांचे आखाडे यामध्ये होम-हवन, वैदिक मंत्रांचे पठण, प्रवचने, लोकांना उपदेश करणे असे अनेक विविध उपक्रम पहायला मिळतात.

आखाडा संकल्पनेत शैव, वैष्णव, उदासीन, नागा, नाथपंथी, परी, किन्नर असे आखाडे असतात.

मुस्लिम शासकाच्या आक्रमपणापासून हिंदू धर्माचे तसेच हिंदू तीर्थक्षेत्र स्थळांचे रक्षण करण्यासाठी असे आखाडे निर्माण झाले असे मानले जाते. सैनिकांच्या समुहाप्रमाणे या आखाड्यांचे नियम आचरण असते.

**पर्यटन :**

कुंभमेळा आणि त्याचे धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व हे जगभरात मान्यता पावले आहे. त्यामुळे कुंभमेळा पहायला केवळ भाविकच येतात असे नाही तर जगभरातून देश आणि विदेशातील पर्यटकही या सोहळ्याचा आनंद घेण्यासाठी येतात. कुंभमेळा हे आर्थिक उलाढालीचे महत्त्वाचे केंद्र मानले जाते.



# महाकुंभ : विश्वास, एकता आणि परंपरा

**राठोडे दिव्या धनराज**
बी.ए.तृतीय वर्ष

२६ फेब्रुवारी २०२५ - महाकुंभ मेळा हिंदू पौराणिक कथांमध्ये खोलवर अंतर्भूत आहे आणि जगातील सर्वात महत्त्वाच्या श्रद्धा संमेलनापैकी एक आहे. हा पवित्र कार्यक्रम भारतातील चार स्थानांमध्ये फिरतो.

आधुनिकतेच्या गर्दीने भरलेल्या या जगात स्वत:हून मोठे काहीतरी मिळण्यासाठी लाखो लोकांना एकत्र आणण्याची ताकद फार कमी कार्यक्रमांमध्ये असते. १३ जानेवारी २०२५ ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत होणारा महाकुंभमेळा हा एक पवित्र तीर्थ सोहळा आहे. जो १२ वर्षांच्या कालावधीत चार वेळा साजरा केला जातो. जगातील सर्वात मोठा शांततापूर्ण मेळावा असलेल्या कुंभमेळ्यात लाखो भाविक येतात. जे स्वत:ला पापांपासून शुद्ध करण्यासाठी आणि आध्यात्मिक मुक्ती मिळविण्यासाठी पवित्र संगमामध्ये स्नान करतात. महाकुंभमेळा हिंदू पौराणिक कथांमध्ये खोलवर रूजलेले आहेत आणि जगातील सर्वात महत्त्वाच्या श्रद्धेच्या मेळाव्यांपैकी एक आहे. हा पवित्र कार्यक्रम भारतातील चार ठिकाणी फिरतो- हरिद्वार, उज्जैन, नाशिक आणि प्रयागराज.

शिप्रा, गोदावरी आणि प्रयागराजमध्ये गंगा, यमुना पौराणिक सरस्वतीचा संगम एका पवित्र नदीकाठी असलेला आहे. ४५ कोटी भाविकांची अपेक्षित गर्दी एका महिन्यातच ओलांडली गेली. आणि शेवटच्या दिवशी ती ६६ कोटींहून अधिक झाली.

**२०२५ च्या कुंभमेळ्यातील आकर्षणे :**

**संगम :**

गंगा, यमुना आणि सरस्वती यांचे पवित्र संगम जे एक गहन अध्यात्मिक अनुभव देते.

**प्राचीन मंदीरे :**

हनुमान मंदिर, अलोपी देवी मंदिर आणि मनकामेश्वर मंदिर जे शहराच्या धार्मिक वारसाचे प्रदर्शन करतात.

**ऐतिहासिक खुणा :**

अशोक स्तंभ, अलाहाबाद विद्यापीठ आणि स्वराज भवन जे भारताच्या समृद्ध इतिहासाचे आणि वसाहतकालीन स्थापत्यकलेचे प्रतिबिंब आहेत.

**सांस्कृतिक चैतन्य :**

गजबजलेले रस्ते, बाजारपेठा, स्थानिक कला आणि पाककृती जे शहराच्या जीवनाची झलक दाखवतात.

**कलाग्राम :**

महाकुंभ जिल्ह्यातील सेक्टर-७ मध्ये सांस्कृतिक मंत्रालयाने स्थापन केलेले कलाग्राम हे भारताच्या समृद्ध वारशाचे दर्शन घडवणारे एक चैतन्यशील सांस्कृतिक गाव आहे. हस्तकला, पाककृती आणि संस्कृती या विषयांभोवती साकारलेले, ते सादरीकरणे, प्रदर्शने आणि परस्परसंवादी क्षेत्राद्वारे एक तल्लीन करणारा अनुभव देते.

**आखाडा शिबिरे :**

अध्यात्मिक केंद्रे जिथे साधू आणि साधक ध्यान,

चर्चा आणि तात्विक देवाणघेवाण करण्यात मग्न झालेले असतात.

**ड्रोन शो :**

उत्तर प्रदेश पर्यटन विभागाने एका भव्य ड्रोन शोचे आयोजन केले होते. यामध्ये शेकडो ड्रोन आकाशात चमकदार आकार तयार करत होते. समुद्र मंथन आणि देवांचे अमृत कलशातून पाणी पिण्याचे दिव्य चित्रण पाहून भाविक मंत्रमुग्ध झाले.

**तल्लीन करणारे डिजिटल अनुभव :**

कुंभ २०१९ पासून प्रेरित होऊन, कुंभमेळ्यातील प्रमुख ठिकाणी यात्रेकरूंना हा अनुभव देण्यासाठी दहा स्टॉल्स खास उभारण्यात आले होते. जिथे पेशवाई, शुभ स्नानाचे दिवस, गंगा आरती इत्यादी प्रमुख कार्यक्रमांचे व्हिडिओ दाखवले जातील.

**गंगा पंडालमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम :**

७ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी दरम्यान देशभरातील प्रसिद्ध कलाकारांनी संगीत, नृत्य आणि कला यांच्या भव्य सादरीकरणाने भाविकांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे ७ फेब्रुवारी रोजी ओडिसी नृत्यांगना डोना गांगुली, ८ फेब्रुवारी रोजी प्रसिद्ध गायिका कविता कृष्णमुर्ती आणि डॉ. एल. सुब्रमण्यम, ९ रोजी प्रसिद्ध सोनल मानसिंग आणि १० रोजी गायक हरिहरन यांचे सादरीकरण. या व्यतिरिक्त विविध भारतीय शास्त्रीय नृत्य आणि संगीत परंपरेतील प्रमुख कलाकारांनी संध्याकाळ संगीतमय आणि भव्य बनवली.

**आंतरराष्ट्रीय पक्षी महोत्सव :**

१६ ते १८ फेब्रुवारी २०२५ दरम्यान आयोजित दोनशेहून अधिक स्थलांतरीत आणि स्थानिक पक्षांचे प्रदर्शन भरविण्यात आले ज्यामध्ये लुप्तप्राय प्रजातींचा समावेश आहे.

**महाकुंभ मेळ्याचा इतिहास :**

महाकुंभ हा भारतात साजरा होणारा सोहळा असला तरी तो जगभरात ओळखला जातो आणि तो जगातील सर्वात महत्त्वाचा लोकप्रिय मेळा आहे. हिंदू धर्मात महाकुंभ मेळ्याला मोठे महत्त्व आहे. यावेळी कुंभमेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे होणार आहे. ४५ दिवस चालणारा हा महाकुंभ हिंदूंसाठी खूप महत्त्वाचा मेळा आहे. या कालावधीत एकूण सहा शाही स्नान होणार आहेत. त्यात सहभागी होण्यासाठी लांबून लोक येतात. महाकुंभ मेळा १२ वर्षांतून एकदा आयोजित केला जातो. या वेळी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या पवित्र संगमावर कोट्यवधी भाविक स्नानासाठी येतात. या पवित्र संगमावर स्नान केल्याने भक्तांची सर्व पापे नष्ट होऊन मोक्ष प्राप्त होतो अशी श्रद्धा आहे.

संस्कृतमध्ये कुंभ शब्दाचा अर्थ घडा/घट असा होतो आणि बऱ्याचदा 'कलश' म्हणून देखील या शब्दाचा वापर होतो. भारतीय ज्योतिष शास्त्रात 'कुंभ' नावाची राशी देखील आहे. मेळ्याचा अर्थ एकत्रित येणे अथवा यात्रा असा होतो. कुंभचा शब्दश: अर्थ घडा/घट असा होत असला तरी मूलभूत अर्थ वेगळाच आहे. इतकेच नव्हे तर घट, कुंभ, कलश हिंदू संस्कृतीतील पवित्र कार्यातील एक अविभाज्य घटक आहेत. हाच घट कुंभाचे प्रतीक मानला जातो. साध्या भाषेत वर्णन करायचे तर, कुंभमेळा म्हणजे एक महोत्सव जो अमृताने भरलेल्या जलस्रोताच्या जवळ आयोजित केला आहे.

अमृत, पाणी आणि कुंभमेळ्याचा काय संबंध आहे, हे जाणून घेण्यासाठी आपल्या हिंदू पौराणिक ग्रंथांमधील एका आध्यायाबद्दल जाणून घ्यायला हवे. ज्यामुळे कुंभमेळा साजरा केला जातो.

**गुरु ग्रहाचे आणि महाकुंभाचे महत्त्व, पृथ्वीच्या रक्षणात गुरुची भूमिका :**

महाकुंभमेळा जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक कार्यक्रम, दर १२ वर्षांनी प्रयागराज (अलाहाबाद),

हरिद्वार, उज्जैन आणि नाशिक येथे साजरा केला जातो. हा १२ वर्षांचा चक्र गुरू ग्रहाच्या सुर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्याच्या कालावधीशी संबंधित आहे. प्राचीन भारतीय ऋषींनी बृहस्पतीचा प्रभाव आणि त्यांचे आध्यात्मिक महत्त्व समजून घेतले आणि त्याला महाकुंभ सारख्या धार्मिक विधींचा आधार बनवला. बृहस्पतीला 'गुरू' म्हटले गेले आहे. ज्याचा अर्थ मार्गदर्शक आणि ज्ञानाचा स्त्रोत असा आहे.

**गुरूचे १२ वर्षांचे चक्र आणि खगोलशास्त्रीय महत्त्व :**

गुरुला सूर्याभोवती फिरायला अंदाजे १२ पृथ्वी वर्षे लागतात आणि हे वर्षांचे चक्र हिंदू कॅलेंडर आणि ज्योतिषशास्त्रीय परंपरांचा एक महत्त्वाचा भाग आहे. महाकुंभाचे आयोजन गुरू सूर्य आणि चंद्राच्या विशेष ज्योतिषिय स्थितीच्या आधारावर केले जाते, ज्यामुळे हा कालावधी अत्यंत शुभ मानला जातो.



# स्वामी दयानंद सरस्वती एक ऊर्जास्त्रोत

**शिंदे रेखा नागनाथ**
बी.ए.प्रथम वर्ष




स्वामी दयानंद सरस्वती यांचे मूळ नाव मूलशंकर अंबाशंकर तिवारी असे होते. संन्यास घेतल्यावर त्यांनी दयानंद सरस्वती असे नाव धारण केले. आर्य समाज हा स्वामी दयानंद सरस्वती यांनी १० एप्रिल १८५७ मध्ये स्थापन केलेला एक धार्मिक पंथ आहे.

दयानंद सरस्वती यांचा जन्म गुजरातमधील टंकारा येथे १८२४ मध्ये झाला तर त्यांचा मृत्यू राजस्थानमधील अजमेर येथे ३० ऑक्टोबर १८८३ रोजी झाला. ते एक हिंदू तपस्वी आणि समाजसुधारक होते. आर्य समाजाचे ते संस्थापक होते. आर्य समाज ही एक हिंदू सुधारणा चळवळ होती.

एका राजघराण्यातील शासकावर जोरदार सार्वजनिक टिका झाल्यानंतर दयानंद यांचे निधन झाले. कारण महाराजांच्या समर्थकांपैकी एकाने त्यांना विष दिले असावे असे मानले जाते. परंतु न्यायालयात हा आरोप सिद्ध झाला नाही. नोबल सोसायटी, ही एकेश्वरवादी भारतीय हिंदू सुधारणा चळवळ आहे जी वेदांच्या अतुलनीय अधिकारावरील विश्वासावर आधारीत मूल्ये आणि प्रथांना प्रोत्साहन देते. स्वामी दयानंद सरस्वती यांनी स्थापन केलेला आर्य समाज ही हिंदू धर्मात धर्मांतराची सुरुवात करणारी पहिली हिंदू घटना होती.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी मुंबईमध्ये आर्य समाज नावाची हिंदू सुधारणा संघटना स्थापना केली जी हिंदू धर्मापासून अगदी वेगळी आहे तरीही वेदांवर आधारीत आहेत. अँग्लो वेदिका शाळा (डीएव्ही) हा आर्य समाजाचे संस्थापक स्वामी दयानंद सरस्वती यांचे स्वप्न होते. लाहोर आणि दिल्लीनंतर हिसारसह हरियाणातील अनेक ठिकाणी डीएव्ही शाळा स्थापन करण्यात आल्या.

स्वामी दयानंद सरस्वती हे एका युगपुरुषाचे नाव आहे. एकोणीसाव्या शतकातील ते केवळ एक महान व्यक्तीच नव्हे तर एक महान धर्मसुधारक होते. ज्या काळात हिंदू धर्म तत्त्वज्ञान आणि धर्मशास्त्राच्या विविध शाखांमध्ये विभागला गेला होता त्या काळात स्वामी दयानंद सरस्वती थेट वेदांकडे परत गेले. कारण वेदांच्या वचनांमध्ये सांगितलेल्या ज्ञानाचा आणि सत्याचा सर्वात अधिकृत भांडार मानले जात असे. वैदिक ज्ञानाला पुन्हा ऊर्जा देण्यासाठी आणि ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या चार वेदांविषयी आपली जाणीव पुन्हा जागृत करण्यासाठी स्वामी दयानंद यांनी अनेक धार्मिक पुस्तके लिहिली आणि प्रकाशित केली.

मूर्तीपूजा, जातीव्यवस्था, कर्मकांड, नियतीवाद, बालहत्या, वरांची विक्री इत्यादींच्या विरोधात स्वामी दयानंद होते. ते महिलांच्या मुक्ततेसाठी आणि दलित वर्गाच्या उन्नतीसाठी देखील उभे होते. वेद आणि हिंदूंचे श्रेष्ठत्व लक्षात घेऊन त्यांनी इस्लाम आणि ख्रिश्चन धर्माचा विरोध केला आणि इतर पंथांना हिंदू व्यवस्थेत परत आणण्यासाठी शुद्धी चळवळीचा पुरस्कार केला. स्वामी दयानंद सरस्वती यांचा प्रामाणिकपणे असा विश्वास होता की, वैदिक शिक्षणाच्या प्रसाराद्वारे भारतीय समाजाच्या पुनरूज्जीवनाची इच्छा पूर्ण केली जाऊ शकते.

The scale of Kumba Mela is unparalleled. Attendance varies, but the 2025 Maha kumbh Mela in Prayagraj stands out for it it's sheer scale. About 400 million people are expected to attend throughout the 45 days period, authorities say. Attendees spread out across the bank of the river, spanning some 12 km officials use a variety of sources to collect the number of pilgrims but they admit there is a possibility of some duplication. CCTV cameras are used to monitor crowd density in real time, while manual head counts at entry and exit points also validate numbers. Drone surveillance provides aerial views of densely populated areas, especially during peak events like holy bathing days.

Organising Kumbh Mela is a monumental task. Authorities establish temporary cities with infrastructure to accommodate the millions of people who attend. Facilities provided include makeshift hospitals, sanitation systems and transportation network. The 2025 festival is expected to cover 4,000 hectares (40 sq km).

The MahaKumbh Mela is one of the largest and most significant religious gathering in the world. The Maha Kumbh Mela specifically refers to the most auspicious occurrence of this event, typically held in prayagraj. The Maha Kumbh Mela represents India's rich cultural tapestry. The festival brings together traditions, of classical music, dance, philosophical discussions, and spiritual teachings. It is a celebration of India's diversity, including its many religious practices, philosophies, and ancient customs. The event is also marked by revered spiritual leaders, highlighting the importance of Indian philosophy, ethics, and lifestyle.

The Mahakumbh Mela, with its massive scale and religious fervor, has been recognised by the UNESCO as a significant cultural and spiritual event. It showcases the harmonious coxistance of traditional and modern elements in India society where ancient beliefs meet contemporary practice.

Mahakumbh Mela encopsulate the spiritual, social and cultural essence of India, embodying the deep religious traditions and diverse culture expressions that form the core of Indian identity.

# Mahakumbh Mela

**Bable Rutuja Appasaheb**
M.A. Second Year

The Kumbh Mela isn't just a festival; it's a conference of spiritual and cultural ethos that defines the very essence of India, held at the sacred banks of rivers in Haridwar, Ujjain, Nashik and Prayagraj. This grand event is marked by millions of devotees taking dip in the holy water, seeking spiritual liberation and blessing, but what makes Kumbh Mela truly fascinating is profound influence and various aspects of Indian cultural life.

In this block, we embark on a captivating journey to unravel the layer of impact that Kumbh Mela has etched on the cultural canvas of India. From its mythological origins to its modern day manifestations, the festival is a vibrant tableau of traditions, arts economics and social dynamics. It reveals myriad ways in which Kumbh Mela is shapped by the cultural ethos of India.

**Historical Background and Significance:**

The Kumbh Mela's roots are deeply embedded in the reach tapestry of Indian mythology and history, making it much more than religious congregations. According to ancient scriptures, the origin of Kumbh Mela is found in the mythological 'Samudra Manthan' (the churning of the cosmic ocean). This celestial event was a quest to obtain the nectar of immortality (Amrit), involving both God and Demons in a cosmic tug of war. It is believed that during this churning a few drops of this nectar fell at locations where Kumbh Mela is now celebrated- Haridwar, Ujjain, Nashik and Prayagraj.

The cultural significance of Kumbh Mela is immese as it symbolizes the various aspects of Indian life. It is a time when the spiritual and the temporal coalesce, with the alignment of celestial bodies dictating the auspicious date of the festival. This cosmic significance reflects the deep rooted Indian philosophy that sees a connection between celestial movement and human life.

Kumbh Mela serves as a living archieve of India's diverse cultural and spritual traditions.

**Economic Impact:**

The Kumbh Mela isn't just spritual

phenomenon. It is mega event that brings a colossal economic boost to the country at large. This Festival, often termed as the worlds largest peaceful gathering draws millions of visitors and has a ripple effect on the local and national economy, creating a surge in various sectors.

The cities hosting the Kumbh Mela witness a transformation as local businesses thrive. Small vendors, shopkeepers, artisans and service provider etc. sees a significant upswing in their income with the surge in economic activities. Their is notable increase in employment and temporary jobs and workers. The government also plays crucial role in preparing for Kumbh Mela.

**Cultural And Social Dimensions:**

The Kumbh mela with it is grand scale and spiritual significance, it just not about religious gathering but a cultural spectacle that showcases the rich tapestry of Indian society. It's a festival where various cultural and social dimensions intersect reflecting the diverse yet unified nature of India.

**Influence of Arts and Literature and Media:**

The Kumbh Mela, with it's spiritual grandeur and cultural diversity has been rich source of inspiration for artists, writers and filmmakers for centuries. The Kumbh Mela is inspiration of artists who painters capture the vivid colours of the festivals from the saffron-clad sadhus to the multitudes of devotees, against the backdrop of the sacred rivers in their vibrant canvases.

**Challenges and Controversies**

While the Kumbha Mela is a celebration of spiritual and cultural unity, it is not without its challenges and controversies. One of the most pressing challenges associated with Kumbh Mela is its environmental impact, particularly pollution of sacred rivers. The management of such a massive crowd is a monumental task.

The Kumbh Mela in all its grandeur and sanctity stand as a testament to the enduring cultural spiritual and social fabric of India. This monumental festival transcends mere religious observance to become a phenomenon that harmoniously blend tradition with modernity spirituality with social responsibility and local identity with global recognition.

It is evidence that the Kumbh Mela is not merely an event it is a celebration of life, faith and unity of Indian culture.

# Mahakumbh : The Spiritual Mela

**Syyad Mahak shamshaduddin**
M.A. First Year

The Mahakumbh is a significant cultural and spiritual event in India, attracting millions of devotees and tourists alike. This essay will explore the significance of the Maha Kumbh mela in Indian Culture, its history and its impact on the country's spiritual and cultural heritage.

**History of the Mahakumbh Mela**

The Maha Kumbh Mela has a rich history dating back thousands of years. According to Hindu mythology, the Mela is held to commemorate the divine nectar of immortality (amrit), which was spilled from a Kumbha during a battle between gods and demons.

**Significance of the Mahakumbh Mela:**

The Maha Kumbh Mela is considered one of the largest and most scared Pilgrimages in India. It is a celebration of spirituality, faith and cultural heritage. The mela is held every 12 years in four different location: Allahabad, Haridwar, Nashik, and Ujjain.

**Cultural and Spiritual Significance :**

The Maha Kumbh mela is a celebration of Indian culture and spirituality. It is an opportunity for devotees to take a dip in the sacred Ganges River, which is believed to wash away sins and bring spritual enlightenment.

**Economic Impact:**

The Maha Kumbh Mela also has a significant economic impact on the country. It generates revenue for the government and local businesses and provides opportunity for people to come together in thousands.

**Social Impact**

The Maha Kumbh Mela also has a significant social impact on Indian Society It promotes social unity and cultural exchanges and provides an opportunity for people to come together and celebrate their faith and culture.

**Cutural Exchange:**

The Maha Kunbh Mela is a celebration of Indian culture and spirituality. It provides an opportunity for cultural exchanges between different communities. The mela attracts people from all over the world and it is platform for showcasing Indian art, music and dance.

**References**

- Hindu Mythology and scriptures

- Historical records of the Mahakumbh mela.

**Key Points**

-The Maha Kumbh Mela is a signficant cultural and spiritual event in India.

-The mela is a celebration of spirituality, faith and cultural heritage.

-It has a significant impact on Indian society, promoting unity and cuturul exchange.

**Future Direction**

The Maha Kumbh mela is an important part of India's culture and heritage. It will continue to be celebrated for generations to come. Local authorities should take steps to promote and preserve the mela.

The Maha Kumbh Mela is significant cultural and spiritual event in India. Its rich history, cultural significance and impact on Indian society make it an important part of the country's heritage. The mela is a celebration of Indian culture and spirituality and it will continue to be important part of Indian society for generation to come.

# विविध विभागाचे अहवाल



# राष्ट्रीय छात्र सेना विभाग

राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांमध्ये एकता, शिस्त, संयम, शील, निर्णय क्षमता, समानता, राष्ट्राभिमान, ध्येयनिष्ठा, आज्ञाधारकपणा इत्यादी गुणांचा विकास व्हावा यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभाग कार्यरत असतो. तसेच सक्षम अशा छात्रांना सैन्यात भरती होण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येते. राष्ट्रीय छात्र सेना ही भारतातील सर्वात मोठी संरक्षणासाठी तत्पर असणारी विद्यार्थी संघटना आहे. शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये एनसीसी विभागाच्या वतीने महाविद्यालयातील एकूण ५४ विद्यार्थ्यांना मैदानी चाचणी घेऊन प्रवेश देण्यात आला. या विद्यार्थ्यांपैकी 'सी प्रमाणपत्र' परीक्षेसाठी एकूण ५, 'बी प्रमाणपत्र' परीक्षेसाठी एकूण १९ व 'ए प्रमाणपत्र' परीक्षेसाठी एकूण ३० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. सदरील शैक्षणिक वर्षात सिनीअर अंडर ऑफिसर म्हणून शंभूदेव कांबळे याची निवड करण्यात आली. यावर्षी नॅशनल कॅम्प 'एक भारत श्रेष्ठ भारत'साठी शंभूदेव कांबळे याची निवड झाली असून त्याने 'ओटीए कामठी, नागपूर' येथे उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. तसेच अहमदनगर येथे झालेल्या सीएटीसी कॅम्पमध्ये महाविद्यालयातील प्रणव कांबळे, वल्लभ काटकर, प्रशांत काकडे, अरविंद हजारे व ओंकार भुरे या कॅडेटस्नी सहभाग नोंदविला.

दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे आयोजित रक्तदान शिबिरात महाविद्यालयातील कॅडेटस्ने रक्तदान करून कर्तव्य बजावले. महाविद्यालयातील कॅडेटस्नी १५ ऑगस्ट व २६ जानेवारी या राष्ट्रीय दिनानिमित्त लातूर येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे पथसंचलनात सहभाग नोंदविला. तसेच १७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आणि विद्यापीठ दिनानिमित्त महाविद्यालयात परेडचे आयोजन करण्यात आले होते.

वरील सर्व उपक्रमांसाठी महाविद्यालयाचे विद्यार्थीप्रिय प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, डॉ. प्रदीप सूर्यवंशी, डॉ. सुभाष कदम, डॉ. अशोक वाघमारे यांचे सहकार्य लाभले.

राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये राष्ट्रीय कर्तव्य बजावत असताना आमचे समर्पित लेफ्टनंट विवेक झांपले यांचे अकाली निधन झाले, ही घटना एनसीसी विभागासाठी तसेच महाविद्यालयासाठी अत्यंत दुःखदायक आहे. त्यांच्या योगदानाचे आणि सेवाभावाची आठवण आम्हा सर्वांच्या मनात सदैव जीवंत राहील. एनसीसी विभाग त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

केअर टेकर ऑफिसर
**डॉ. शिवकुमार राऊतराव**

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

१) २१ जून २०२४ रोजी जागतिक योगा दिनानिमित्त महाविद्यालयात योगा व प्राणायक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत महाविद्यालयातील प्राध्यापक, स्वयंसेवक व प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. यावेळी योगासन व प्राणायम यांचे मानवी आरोग्यातील महत्त्व या विषयी प्रबोधन करण्यात आले.

२) १४ जुलै २०२४ रोजी जिल्ह्यात वृक्ष लागवड अधिक प्रमाणात व्हावी त्याचबरोबर लातूर हे हरित व्हावे यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने 'माझं लातूर हरित लातूर' या संकल्पनेने लातूर हरितोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये दयानंद कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत पथनाट्याच्या माध्यमातून वृक्ष लागवडीच्या बाबतीत जनजागृती करण्यात आली. यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर-घुगे व महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

३)२३ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य व युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने पाणी बचत योजना राबविण्यात आली. त्या निमित्ताने दयानंद विज्ञान महाविद्यालय, लातूर येथे सहसंचालक मा. बोंदर किरण कुमार, नांदेड यांच्या उपस्थितीमध्ये बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम व स्वयंसेवक उपस्थित होते.

४) ७ ऑगस्ट २०२४ रोजी दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व आपत्ती व्यवस्थापन विभाग मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन पथनाट्य कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित होते.

५) १३ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभाग, जिल्हाधिकारी लातूर यांच्या वतीने मिनी मॅरेथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे ४२ स्वयंसेवक व स्वयंसेविका सहभागी झाले होते. ही मॅरेथॉन स्पर्धा लातूर जिल्हा कार्यालय ते पाच नंबर चौक व परत जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर आयोजित करण्यात आली होती.

६) १५ ऑगस्ट २०२४ दयानंद शिक्षण संस्थेच्या सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग व क्रीडा विभाग यांच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव मा. रमेश बियाणी, सदस्य श्री. रामकिशन मालू, श्री. विशाल अग्रवाल, श्री. अशोक पाटील, श्री. सागर मंत्री व संस्थेतील सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक उपस्थित होते. ही रॅली झेंडावंदनानंतर महाविद्यालय परिसर ते शिवाजी चौक दरम्यान काढण्यात आली. या रॅलीत राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे १५२ विद्यार्थी सहभागी झाले होते.

७) १४ ऑगस्ट २०२४ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे तिरंगा प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर

कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक व इतर विद्यार्थी उपस्थित होते.

८) २० ऑगस्ट २०२४ रोजी राजीव गांधी जयंती व सद्भावना दिन म्हणून साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सद्भावना दिनाची शपथ देण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी, स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते.

९) २२ ऑगस्ट २०२४ रोजी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नागरिकांना 'एक पेड माँ के नाम' उपक्रमांतर्गत प्रत्येकाने एक झाड लावण्याचे आवाहन केले होते. त्या आवाहनातून राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी वृक्षारोपण करून 'एक पेड माँ के नाम'चा संदेश दिला व प्रत्येकाने घराच्या परिसरात व गल्लीत एक झाड लावण्याची शपथ घेतली व वृक्षारोपण करण्यात आले.

१०) २८ ऑगस्ट २०२४ रोजी दयानंद शिक्षण संस्था व संस्थेतील संलग्नित आठ महाविद्यालय यांनी एकत्रित येऊन मेघा ब्लड डोनेशन कॅम्प दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी येथे आयोजित केले होते. लातूर शहरातील भालचंद्र ब्लड बँकेच्या टीमने सदरील रक्त संकलन केले. या शिबिरात दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

११) १४ सप्टेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन जिल्हास्तरीय निवड चाचणी शिबिरात कु. निकिता बालाजी कापसे, कु. पिठले अनुषा विजयकुमार, जगदाळे अधिराज संदीप, आझाद युवराज ाजधव यांना जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे निवड चाचणीसाठी पाठवण्यात आले होते. यामध्ये चारही स्वयंसेवकांची निवड करण्यात आली.

१२) १९ सप्टेंबर २०२४ राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन जिल्हा स्तरीय निवड चाचणीमध्ये निवड झालेले स्वयंसेवक कु. निकिता बालाजी कापसे, कु. पिटले अनुसया विजयकुमार, जगदाळे अधिराज संदीपान, आझाद युवराज जाधव यांना विद्यापीठ स्तरीय निवड चाचणीसाठी विद्यापीठ नांदेड येथे दि. १९ सप्टेंबर २०२४ रोजी पाठविण्यात आले.

१३) १७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या दिवशी राष्ट्रीय छात्र सेनामधील विद्यार्थ्यांसोबत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

१४) राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन विद्यापीठ स्तरीय निवड चाचणीमध्ये निवड झालेल्या स्वयंसेवक, स्वयंसेविका यांचे प्रशिक्षण दि. २३ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर २०२४ दरम्यान स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झाले. यामध्ये कु. निकिता बालाजी कापसे, कु. पिटले अनुषा विजयकुमार, आझाद युवराज जाधव यांनी सहभाग नोंदविला व त्यांनी २६ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर २०२४ या कालावधीत होणाऱ्या शिबिरात सहभाग नोंदविला.

१५) २४ सप्टेंबर हा दिवस राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन म्हणून साजरा करण्यात आला. या दिवशी राष्ट्रीय सेवा योजना विभागाने वर्धापन दिनाचे औचित्य साधून महात्मा गांधींच्या प्रतिमेचे पूजन केले व त्यानंतर महाविद्यालयात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'स्वच्छता हीच सेवा' या उपक्रमांतर्गत ही स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

१६) २६ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, नेहरू युवा केंद्र व माय भारत स्वयंसेवक यांच्या संयुक्त विद्यमाने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर 'स्वच्छता हीच सेवा' या केंद्र सरकारच्या उपक्रमांतर्गत स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता ही भावना ठेवून महाविद्यालय ते शिवछत्रपती चौक दरम्यान स्वच्छता जनजागरण रॅली काढण्यात आली. प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते रॅलीला सुरुवात करण्यात आली. या रॅलीमध्ये ४५० विद्यार्थ्यांनी 'स्वच्छता हीच सेवा' या अभियानात सहभाग घेऊन परिसर स्वच्छ

ठेवा व स्वच्छतेची सवय अंगीकारा, उत्तम आरोग्याचे मूळ स्वच्छता अशा घोषणाही दिल्या.

१७) २७ सप्टेंबर २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुबई कार्यालयामार्फत जिल्ह्यातील रेड रिबीन क्लब संलग्नित महाविद्यालयातील अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक यांची एचआयव्ही एड्स बाबत जनजागृती, स्वयंसेवकांच्या एनजीओ येथे अभ्यास, टी. आय. प्रकल्प, कल्याणी महिला तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षण मंडळ, शिवसागर होंडा शोरूम समोर, भाग्य ज्योती हॉस्पिटल, विवेकानंद चौक, लातूर येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्यात सूरज गोरे, अर्णव पाटील, जानापूरे शुभम या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

१८) २८ सप्टेंबर २०२४ रोजी १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान 'स्वच्छता हीच सेवा' या उपक्रमांतर्गत दयानंद कला महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग व नेहरू युवा केंद्र व माय भारत स्वयंसेवक यांच्या वतीने सकाळी ११ वाजता महाविद्यालय परिसर व दयानंद शिक्षण संस्था परिसरामध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी नेहरू युवा केंद्राच्या जिल्हा युवा अधिकारी सोमय्या साक्षी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम व स्वयंसेवक उपस्थित होते.

१९) २ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा गांधी जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व लॉयन्स क्लब परिवार, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता जनजागृती रॅली महाविद्यालय-गांधी चौक - बस स्टॅण्ड या मार्गे सकाळी ८ वाजता काढण्यात आली. मध्यवर्ती बसस्थानक येथे स्वयंसेविकांनी स्वच्छता केली. या रॅलीत व अभियानात राष्ट्रीय सेवा योजनेचे १०७ स्वयंसेवक, स्वयंसेविका सहभागी झाले होते. या रॅलीचे उद्घाटन लातूरचे खासदार डॉ. काळगे यांनी केले. सोबत लॉयन्स क्लब, लातूरचे पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय दयानंद शिक्षण संस्थेच्या पेठ येथील नवीन जागेमध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

२०) १५ ऑक्टोबर २०२४ रोजी महात्मा बसवेश्वर महाविद्यालय व रोटरी राजस्थानी महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने सकाळी १० वाजता 'मरणोत्तर नेत्रदान' अवयवदान जनजागृती रॅली महात्मा बसवेश्वर महाविद्यालय येथून गांधी चौक, गंजगोलाई येथे काढण्यात आली. या रॅलीत २५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

२१) १५ ऑक्टोबर २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त व स्मरणार्थ वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सकाळी ११.३० वाजता महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. यानिमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धाही घेण्यात आली. या स्पर्धेत ७३८ विद्यार्थी सहभागी झाले होते. याशिवाय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी उद्‌बोधन कार्यशाळाही आयोजित करण्यात आली होती.

२२) १६ ऑक्टोबर २०२४ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे होणाऱ्या आपत्ती व्यवस्थापन शिबिरासाठी जिल्हा निवड चाचणी शिबीर जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झाले. यामध्ये स्वयंसेवक गोरे सूरज, निखिल पवार, आरती वाघमारे, पिटले अनुषा, कापसे निकिता यांनी सहभाग नोंदविला.

२३) २१ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक ध्यान दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने ध्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला, ध्यान व मानसिक आरोग्याचा अभ्यास केला.

२४) २६ जानेवारी २०२५ रोजी मुंबई येथे राज्य स्तरीय प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या पथसंचलनामध्ये स्वयंसेवक आझाद जाधव, अधिराज जगदाळे, अनुषा पिटले या तीन स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

२५) २३ ते २५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे उत्कर्ष सामाजिक, सांस्कृतिक स्पर्धे करिता विद्यापीठ स्तरीय निवड चाचणीसाठी १४ फेब्रुवारी २०२५ रोजी कु. अस्मिता ढवळे, सूरज गोरे, निखिल पवार, अनुषा पिटले, निकिता कापसे यांनी निवड चाचणीमध्ये सहभाग नोंदविला. हे निवड चाचणी शिबीर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झाले. या निवड चाचणीमध्ये कु. अस्मिता ढवळेची निवड करण्यात आली.

२६) २३ ते २५ फेब्रुवारी २०२५ दरम्यान सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे झालेल्या राजस्तरीय उत्कर्ष स्पर्धेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड विद्यापीठाच्या संघात राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका अस्मिता ढवळे हिने सहभाग नोंदविला.

२७) १९ फेब्रुवारी २०२५ रोजी जय शिवाजी जय भारत मेघा पदयात्रा जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर यांच्या वतीने काढण्यात आली होती. या उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक व स्वयंसेविका यांनी ढोल-ताशा, पथके, घोषणा फलक घेऊन सहभाग नोंदविला. या निमित्ताने महाविद्यालयात माय भारत पोर्टलवर नोंदणी कार्यक्रम, योग सत्रे, स्वच्छता मोहिम, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन इतिहासावर व्याख्यान, पदयात्रा इत्यादी मध्ये सहभाग नोंदविला व असे विविध उपक्रम घेण्यात आले.

२८) १० ते १२ मार्च २०२५ दरम्यान विद्यापीठ स्तरीय युवती कार्यशाळा जयक्रांती महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झाली. या युवती कार्यशाळेत पाच स्वयंसेविकांनी सहभाग नोंदवून प्रशिक्षण घेतले.

२९) युवक बिरादरी संस्थेतर्फे तरुणांचा विकास व्हावा म्हणून एलोरा मीट नेतृत्व विकास शिबीर दि. २३ ते २९ मार्च २०२५ दरम्यान वेरूळ अजिंठा परिसरात आयोजित करण्यात आले होते. यामध्ये पाच स्वयंसेवक व पाच स्वयंसेविकांनी सहभाग नोंदविला व प्रशिक्षण घेतले.

३०) १२ एप्रिल २०२५ रोजी उन्हाळाच्या कडाक्याने होरपळून निघणाऱ्या मुक्या पक्षांसाठी राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी दयानंद शिक्षण संस्था परिसरात पक्षांना पाणी उपलब्ध व्हावे म्हणून पाणपोई उभारण्यात आली. ही योजना विद्यार्थ्यांनी स्वत:च्या पॉकेट मनीमधून अंमलात आणली व महाविद्यालयाच्या परिसरात विविध झाडांवर मडके बांधून पक्षांसाठी पाणपोई तयार केली.

३१) १२ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील मुलींना आरोग्य जपणूक व मानसिक स्वास्थम या विषयावर मार्गदर्शन करून सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले. या वेळी कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. सुभाष कदम व डॉ. अंजली जोशी व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

३२) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त १३ एप्रिल २०२४ रोजी लातूर जिल्हा प्रशासन व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर यांच्या वतीने जयभीम पदयात्रा आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेत महाविद्यालयातील स्वयंसेवकांनी लेझीम पथक, ढोलताशे, वाद्यांसह सहभाग नोंदविला. ही पदयात्रा दयानंद शिक्षण संस्था परिसरातून प्रारंभ होऊन शिवाजी चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क पर्यंत काढण्यात आली. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून पदयात्रेचा समारोप करण्यात आला. या पदयात्रेत उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-वेरूळे, तहसीलदार सौदागर तांदळे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपशिक्षणाधिकारी प्रमोद पवार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम व बहुसंख्येने स्वयंसेवक सहभागी होते.

**-प्रा.डॉ. सुभाष कदम**
मुख्य कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना विभाग

# Department of Sports and Physical Education

The performance of the students in different sports was very commendable which adds pride and honour to the college and the parent institute. This is the outcome of whole hearted support from the parent institute by offering good infrastructural facilities and financial assistance to the winning students.

| Sr. | Sport | Date | Organiser | Place |
|---|---|---|---|---|
| 1 | Volley Ball (A Zone) | 10.08.2024 | DACL | Female 1st Male 2nd |
| 2 | Cricket (C Zone) | 26.08.2024 | DACL | Male 2nd |
| 3 | Cross Country (A Zone) | 20.08.2024 | MDM, Aurad Shahjani | Male (General Championship) |
| 4 | Badminton (A Zone) | 29.08.2024 | DSCL | Female 2nd |
| 5 | WLPL & BP (A Zone) | 06.09.2024 | Jaikranti College, Latur | Male 1st, Female 1st |
| 6 | Boxing (C Zone) | 20.09.2024 | Sushiladevi College, Latur | Male (General Championship) |

7) 3 Students have been selected to Army
   1. Kamble Gaurav
   2. Jadhav Pritam
   3. Suryawanshi Abhijit
8) Sport Director has been awarded with BEST COACH for Weight Lifting on 30th July, 2024 by VC SRTMU, Nanded
9) Total 70 students were participated in different sports events at Inter collegiate and All India tournament and Krida Mohostav and won Awards/Medals
10) Total 24 players have been participated in Inter University Tournament.

**-Director**
Sports & Physical Education

# सांस्कृतिक विभाग

दयानंद कला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग मागील अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. महाविद्यालयातील विद्यार्थी अनेक विषयांचे ज्ञान संपादन करत असताना सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून आपली कला विकसित करून महाविद्यालयाचे नावलौकिक करतात. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचे अनेक विद्यार्थी टीव्ही कलाकार म्हणून महाराष्ट्रभर सुप्रसिद्ध आहेत. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या युवक महोत्सवामध्ये महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाचा दबदबा आजही कायम टिकून आहे. केवळ विद्यापीठ पातळीवरच नव्हे तर राज्य व राष्ट्रीय पातळीवर देखील महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे आपली कला सादर करून सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

महाविद्यालयाच्या विद्यार्थी परिषदेवर सांस्कृतिक विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून अर्जुन मुरली पवार याची गुणवत्तेच्या आधारावर निवड करण्यात आली.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ' युवक महोत्सव सहयोग सेवाभावी संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, विष्णुपुरी नांदेड येथे १८ ते २१ ऑक्टोबर २०२४ दरम्यान संपन्न झाले. सदरील युवक महोत्सवात महाविद्यालयाचा संघ सहभागी होऊन ३० कला प्रकारात भाग घेतला.

ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात दयानंद कला महाविद्यालय, लातूर यांनी ११ सुवर्ण, ५ रौप्य व १ कांस्य अशा १७ पदकांसह जनरल चॅम्पियनशिप प्राप्त केली.

१) सुगम भारतीय- सुवर्ण पदक (स्वरांजली पांचाळ)
२) सुगम पाश्चात्य- सुवर्ण पदक (ऋचा कुलकर्णी)
३) पाश्चात्य समूह- सुवर्ण पदक (ऋचा कुलकर्णी)
४) कव्वाली - प्रथम
५) शास्त्रीय नृत्य - सुवर्ण पदक (ऋचा कुलकर्णी)
६) एकांकिका - प्रथम
७) दिग्दर्शन - सुवर्ण पदक (पवन माने)
८) नक्कल - सुवर्ण पदक (पवन माने)
९) स्त्री अभिनय - सुवर्ण पदक (तनुजा शिंदे)
१०) स्थळ छायाचित्र - सुवर्ण पदक (सौदागर सूर्यवंशी)
११) पोस्टर - सुवर्ण पदक (ज्ञानेश्वर साठे)
१२) चित्रकला - द्वितीय (ज्ञानेश्वर साठे)
१३) शास्त्रीय गायन - द्वितीय (यशराज शेवाळे)
१४) लावणी - द्वितीय (तनुजा शिंदे)
१५) फोक ऑर्केस्ट्रा - द्वितीय
१६) प्रहसन स्कीट - द्वितीय
१७) मुक अभिनय - तृतीय.

दयानंद कला महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या आंतर महाविद्यालयीन ज्ञानतीर्थ युवक महोत्सवात सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त केले. सांस्कृतिक विभागाने सलग तीन वर्षे सर्वसाधारण विजेते पद प्राप्त केले आहे. सर्वसाधारण विजेते पदाची हॅट्रिक प्राप्त करून एक नवा इतिहास घडवून महाविद्यलायाच्या विकासामध्ये भर टाकली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा इंद्रधनुष्य राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दि. ७ ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे आयोजित करण्यात आला. सदरील युवक महोत्सवात अर्जुन मुरली पवार (स्कीट / नक्कल), ऋचा रविंद्र कुलकर्णी (शास्त्रीय नृत्य), ज्ञानेश्वर हनमंत साठे (पोस्टर पेंटिंग / कलात्मक जुळवणी), सौदागर हणुमंत सूर्यवंशी (स्थळ छायाचित्रण), तनुजा छगन शिंदे (एकांकिका), योगेश साहेबराव पोटभरे (लोकनृत्य), रोहन भरत गायकवाड (स्कीट) या ८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा ३८ वा पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव दि. ४ ते ८ जानेवारी २०२५ दरम्यान गणपत विद्यापीठ महेस्थाना गुजरात येथे आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये अमित महेंद्र वाघमारे (लोकसंगीत/फोक ऑर्केस्ट्रा), आनंद ओम खलुले (लोकसंगीत / फोक ऑर्केस्ट्रा), अर्जुन मुरली पवार (स्कीट/नक्कल), श्रीनिवास बालकृष्ण बरीदे (स्कीट), आर्यन शिरीष गिरवलकर (स्कीट) या ६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चा आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सव दि. ३ ते ७ मार्च २०२५ अमिटी विद्यापीठ, नोएडा, दिल्ली येथे आयोजित करण्यात आला होता. सदरील राष्ट्रीय युवक महोत्सवात अर्जुन मुरली पवार या विद्यार्थ्यास नक्कल कला प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त झाले आहे.

सांस्कृतिक विभागाच्या यशस्वी वाटचालीमध्ये संस्थाध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. श्री. रमेशजी बियाणी, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. देवेंद्र कुलकर्णी, डॉ. संदीप जगदाळे, प्रा. शरद पाडे, प्रा. सोमनाथ पवार, प्रा. विजय मस्के, प्रा. आदित्य शिरोळे यांनी सांस्कृतिक विभागाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**-प्रा. डॉ. संतोष पाटील**
प्रभारी, सांस्कृतिक विभाग



# अर्थशास्त्र विभाग

महाविद्यालयामध्ये पदवी, पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेत असताना विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयातील केवळ अभ्यासक्रम सैद्धांतिक स्वरूपात शिकवून चालणार नाही तर प्रत्यक्षात विविध विषयांवर सखोल व प्रात्यक्षिक ज्ञान विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावे याकरिता अर्थशास्त्र विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येतात. जसे की, विभागीय ग्रंथालय, गट चर्चा, चर्चासत्र, फळ्यावर गणिते सोडविण्याचा उपक्रम, प्रकल्प, सर्वेक्षण इत्यादी की ज्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वाचन कौशल्यामध्ये वाढ, अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे, संभाषण कौशल्य यामध्ये वाढ, व्यवहारिक ज्ञानामध्ये वाढ, आत्मविश्वास वृद्धींगत होणे इत्यादी लक्ष केंद्रीत केले जाते. तसेच एक पाऊल पुढे टाकत प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विषयातील संशोधकांना संधी व समाजातील विविध घटकांकरिता आर्थिक जागृतीचे कार्य करण्याचे ध्येय विभागाने हाती घेतले आहे, हे विशेष.

या अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले-

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४७ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन:

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सर्वप्रथम ३०, ३१ जानेवारी व १ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४७ वे राष्ट्रीय वार्षिक अधिवेशन नियोजनबद्ध आयोजित करण्यात आले.

अधिवेशनाचे उद्घाटन दि. ३० जानेवारी रोजी झाले. यावेळी उद्घाटन म्हणून पद्मभूषण प्रोफेसर लॉर्ड मेघनाद देसाई, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, तथा मेंबर, हाऊस ऑफ लॉर्डस, ब्रिटीश पार्लमेंट लंडन वरून झूम मिटिंगद्वारे उद्घाटन केले. तर प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ. अमित देशमुख, आमदार, लातूर शहर विधानसभा हे उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा.प्रो.डॉ. अनिलकुमार वावरे, अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, स्वागताध्यक्ष म्हणून मा. लक्ष्मीरमण लाहोटी, अध्यक्ष, दयानंद शिक्षण संस्था, लातूर उपस्थित होते. या अधिवेशनामध्ये मराठी भाषेतून अर्थशास्त्राच्या विषयाचे संशोधन होऊन साहित्य वाढावे हा उद्देश ठेऊन अर्थशास्त्र विषयातील प्राध्यापक, संशोधक यांनी मिळून एकूण १९४ शोध निबंध सादर केले. त्यापैकी पहिल्या दिवशी झालेल्या पहिल्या चर्चासत्रामध्ये '२०१५ पासूनच्या अर्थशास्त्रातील नोबेल स्मृती पारितोषिक प्राप्त अर्थतज्ज्ञांचे आर्थिक विचार' या विषयावर शोधनिबंध सादर करण्यात आले. पहिले चर्चासत्र झाल्यानंतर माजी अध्यक्ष डॉ. रवींद्र सबनीस व्याख्यान मालेचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. उल्हास मालकर, कला महाविद्यालय, मिरज, जि. सांगली यांनी 'छत्रपती शिवाजी महाराजांचे आर्थिक धोरण' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान सभागृहासमोर मांडले.

तर अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी दि. ३१ जानेवारी, २०२५ रोजी मा.ना.श्रीमंत छत्रपती शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहून अधिवेशनाची उंची वाढवली. तसेच या दिवशी दुसऱ्या चर्चासत्रामध्ये 'भारताच्या वित्तीय क्षेत्राच्या बदलत्या आकृतीबंधाचा अभ्यास' या विषयावर विचारमंथ झाले.

याच दिवशी नी.वि. सोवनी स्मृती व्याख्यानमाला अंतर्गत १४ वे व्याख्यान 'अर्थशास्त्राचे अध्यापक व अध्यापन' या विषयावर प्रा. जयदेव डोळे, निवृत्त प्राध्यापक, वृत्तपत्रविद्या व जनसंपर्क विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांनी आपले विचार मांडले.

तिसरा दिवस म्हणजे १ फेब्रुवारी, २०२५ रोजी चौथे चर्चासत्र 'माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग' या विषयावर संपन्न झाले. या चर्चासत्राचे प्रमुख व्याख्याते डॉ. सुभाष दगडे व डॉ. किशोर सुतार होते.

याच दिवशी समारोप समारंभ पार पडला. समारोप समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. मनोहर चासकर, कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड हे उपस्थित होते. या प्रसंगी मा. रमेश बियाणी, सचिव, दयानंद शिक्षण संस्था, लातूर यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.प्रा.डॉ. अनिलकुमार वावरे तसेच प्राचार्य के. के. पाटील, पंडितगुरू पार्डीकर महाविद्यालय, शिरसाळा, डॉ. अविनाश निकम, कार्याध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे, कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. राहुल म्होपरे, संपादक, अर्थसंवाद, मराठी अर्थशास्त्र परिषद, हे प्रमुख उपस्थितांमध्ये होते.

समारोप समारंभानंतर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या राष्ट्रीय वार्षिक अधिवेशनाच्या सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले. तद्नंतर अधिवेशनाचे प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या संपूर्ण अधिवेशनाचे यशस्वी आयोजन दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड आणि सर्व प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांनी केले.

**'महिला आणि भारतीय अर्थव्यवस्था' विषयावर विशेष व्याख्यान :**

दि. ८ मार्चच्या जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी 'महिला आणि भारतीय अर्थव्यवस्था' या विषयावर विस्तारीत व्याख्यान ७ मार्च, २०२५ रोजी डॉ. सविता बहिरट, संशोधक सहाय्यक, ताराबाई शिंदे स्त्री अभ्यासकेंद्र, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांचे ऑनलाईन मार्गदर्शन आयोजित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, विभाग प्रमुख डॉ. बालाजी घुटे, सहायक प्राध्यापक डॉ. स्वप्नजा पाठक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

**भाजी विक्रेत्यांमध्ये कॅशलेस (रोकड विरहीत) व्यवहार विषयक जागृती :**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या अखेरीस अर्थशास्त्र विभागाच्या वतीने एक समाजोपयोगी उपक्रम दि. २९ मार्च, २०२५ रोजी 'खाडगाव रोड येथील भाजी विक्रेत्यांमध्ये कॅशलेस (रोकड विरहीत) व्यवहार या संबंधी जागृतीचे कार्य' विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक यांनी पूर्णत्वास नेले. यावेळी भाजी विक्रेत्यांमध्ये कॅशलेस (रोकड विरहीत) व्यवहार संबंध जागृतीबरोबर विषयाच्या संशोधन वृत्ती व चिकित्सेचा विकास व्हावा हा मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मुख्यत्वे करून महिला भाजी विक्रेत्यांमध्ये असलेले रोकड विरहीत व्यवहाराचे अज्ञान प्रकर्षाने जाणवले, हे विशेष.

**-डॉ. बालाजी घुटे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

# English Literary Association 2024-25

The English Literary Association for the academic year 24-25 was instituted with following office bearers:

1. Miss. Belkunde Sushma- President
2. Miss. Sen Ganga - Vice- President
3. Miss. Kanse Sayli - Secretary
4. Miss. Jadhav Pornima - Joint Secretary
5. Miss. Waghmare Aarti - Treasurer
6. Mr. Pawar Suyash - Member
7. Miss. Kasle Vaishnavi - Member
8. Miss. Kamble Gayatri - Member

ELA arranged a Freshers Party to welcome the students of B.A.-I and M.A.-I on 04/09/2024. Dr.S P Gaikwad was invited as a chief guest for the function. All the students enjoyed the games arranged on the day.

The Association was formally inaugurated on 18/02/2025 at the auspicious hands of Dr. Dhananjay Gaikwad, Director- Maitree Institute of Career, Latur. He delivered a wonderful lecture on “Career Opportunities in Various Fields through English.” Students interacted with him freely and got different avenues of career through English.

ELA also arranged a Farewell to see off MA II and BA III year students. Head Dept. of English Dr. Khandagale M H presided over the function. The departing students were overwhelmed to share their memories and experiences of the Department. All the faculty members of the department attended the function.

**-Dr. Doke N N**
Co-ordinator ELA



# सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळ

दर वर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सामाजिक शास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या आदेशानुसार व मार्गदर्शनानुसार साामजिक शास्त्रे अभ्यास मंडळाची कार्यकारणी तयार करण्यात आली. यासाठी समन्वयक प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे यांनी दि. २५ सप्टेंबर २०२४ रोजी मुलाखत प्रक्रियेद्वारे पुढील कार्यकारणी व पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.

| **नाव** | **पदनाम** |
|---|---|
| त्रिमुख इगवे | अध्यक्ष |
| दीपिका यादव | उपाध्यक्ष |
| वसंत कुलकर्णी | सचिव |
| अर्णव पाटील | कोषाध्यक्ष |
| मुदाळे कामाक्षा | सदस्य |
| अजिंक्य आदमाने | सदस्य |
| राहुल कांबळे | सदस्य |
| गणेश जाधव | सदस्य |

दि. १६ ते २० ऑक्टोबर २०२४ दरम्यान मंडळाच्या वतीने 'झिरो बजेट अकाऊंट टेम्पो'चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महाविद्यालयातील अठरा वर्षावरील सर्व विद्यार्थ्यांना झिरो बजेट अकाऊंट काढण्याची सेवा, त्यांचे आर्थिक नियोजन यावर कॅनरा बँकेचे व्यवस्थापक मिलिंद भगवत व अधिकारी अश्वजीत भंडारे यांनी मार्गदर्शन केले. यात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक रामेश्वर खंदारे यांनी अथक प्रयत्न केले. सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाचे त्रिमुख इगवे यांनी विद्यार्थ्यांना याबाबत जागृत करण्याचा प्रयत्न केला. या उपक्रमास विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

दि. २१ जानेवारी २०२५ रोजी सामाजिक शास्त्रे अभ्यास मंडळाच्या वतीने 'महाविद्यालयातील युवकांची बदलती मानसिकता' या विषयावर महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयन्स, लातूरच्या अध्यक्षा जयश्री पाटील यांनी प्रमुख वक्ते म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पल्लवी कुलकर्णी यांनी देखील मार्गदर्शन केले. या कार्यक्रमातील व त्यांच्या टीमच्या संकल्पनेतून ऑनलाईन स्तरावर कार्यक्रम पत्रिका क्यूआर चा वापर करून फिडबॅकचे उत्तम नियोजन व वेगळेपणा कार्यक्रमास देण्याचा प्रयत्न केला. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी अभिनंदन व कौतुक केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक डॉ. रामेश्वर खंदारे यांनी काम पाहिले यासाठी त्यांना प्रा. स्फुर्ती समुद्रे यांनी सहकार्य केले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**डॉ. रामेश्वर खंदारे**
समन्वयक
लोकप्रशासन विभाग

# संशोधन विभाग

राष्ट्रीय पातळीवर संशोधन केंद्र म्हणून मान्यता मिळालेले, संशोधक अभ्यासकांची परंपरा लाभलेले दयानंद कला महाविद्यालयाचे संशोधन केंद्र आहे. इंग्रजी, हिंदी, मराठी विषयातील अनुदानित पदव्युत्तर विभागासोबतच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची मान्यता या केंद्रास प्राप्त असून आज मितीस संशोधन केंद्रात इंग्रजी विषयात २४, हिंदी विषयात २९ तर मराठी विषयात २१ संशोधन मार्गदर्शक आहेत. आजपर्यंत तिनही विषयात कार्यरत संशोधक विद्यार्थ्यांची संख्या ११६ असून २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एकूण ९ संशोधक विद्यार्थ्यांनी पीएच्‌डी पूर्व मौखिकी दिली असून एकूण ५ विद्यार्थ्यांनी शोध प्रबंध विद्यापीठात सादर केले आहेत. प्रत्येक संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रबंधाची एक प्रत ग्रंथालयात पुढील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी ठेवली जाते. विद्यापीठाच्या सूचनेनुसार संशोधन केंद्रात प्रोग्रेस रिपोर्ट प्रेझेंटेशन, प्री-पीएच्‌डी सेमिनार आणि कोर्स वर्कचे आयोजन नियमितपणे केले जाते.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव मा. श्री. रमेश बियाणी यांच्या दूरदृष्टीमुळे प्राध्यापकांच्या संशोधन कार्यास आर्थिक पाठबळ मिळते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली आणि उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. मच्छिंद्र खंडागळे, डॉ. नितीन डोके, हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रदीप सूर्यवंशी आणि मराठी विभागातील डॉ. अंकुश चव्हाण व डॉ. सुभाष कदम यांच्या सहकार्याने संशोधन विभाग कार्य करीत आहे. नियमित बैठका घेऊन संशोधन विभाग अद्यावत करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. म्हणूनच परिसरातील संशोधक विद्यार्थी, संशोधक मार्गदर्शक, प्राध्यापक यांना महाविद्यालयातील संशोधन विभागाची मदत होते.

**-डॉ. शिवकुमार राऊत**
समन्वयक



# विद्यार्थी परिषद

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र शासन व विद्यापीठाकडून विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका झाल्या नाहीत. परंतु विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन गुणवत्तेनुसार सर्व वर्गाच्या विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. याचबरोबर विविध मंडळाचे प्रतिनिधी निवडले गेले.

विद्यार्थी परीषेदचा पहिला कार्यक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये नव्याने प्रवेशित बी.ए. प्रथम वर्ष नियमित, बी. ए. प्रथम वर्ष फॅशन, ॲनिमेशन व प्रशासकीय सेवा या विद्यार्थ्यांसाठी दि. ८ जुलै २०२४ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव गायकवाड यांचे अभिभाषण ठेवण्यात आले. विद्यार्थी परीषेदच्या वतीने दि. ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा कार्यक्रम म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलन. यावर्षीच्या वार्षिक स्नेहसंमेलनास 'कलातीर्थ २०२५' हे नाव देण्यात आले. विशेष म्हणजे या वर्षीच्या स्नेहसंमेलनास नाव देण्यासाठी आजी-माजी विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी यांच्याकडून लेखी नावे मागविण्यात आली होती. एकणू ४१ जणांकडून १३९ नावे सुचविण्यात आली होती. प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समितीने यावर्षीच्या स्नेहसंमेलनास 'कलातीर्थ-२०२५' या नावाची बहुमताने निवड केली. हे नाव महाविद्यालयातील इंग्रजी विभागातील प्रा.डॉ. शिवकुमार राऊतराव यांनी सुचवले होते. त्यांना महाविद्यालयाच्या वतीने रूपये २००० रोख बक्षीस देण्यात आले. संमेलनानिमित्त विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देण्यासाठी विविध मंडळाकडून दि. १५ मार्च ते १८ मार्च २०२५ या कालावधीत स्पर्धा घेण्यात आल्या.

वार्षिक स्नेहसंमेलन 'कलातीर्थ-२०२५' दि. २३ व २४ मार्च रोजी संपन्न झाले. स्नेहसंमेलनाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध विनोदी प्रहसन, लेखक, चला हवा येऊ द्याचे मा. श्री. अरविंद जगताप आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी तथा सुप्रसिद्ध गायक मा.श्री. अभिजीत जाधव यांच्या हस्ते दि. २३ मार्च २०२५ रोजी संपन्न झाले. प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध मंडळाकडून घेण्यात आलेल्या स्पर्धेचे पारितोषिक वितरीत केले.

दि. २४ मार्च २०२५ रोजी स्नेहसंमेलनाचा समारोप करण्याता आला. प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी मा. श्री. देविदास फुलारी व माजी विद्यार्थी तथा सुप्रसिद्ध दूरदर्शन कलावंत मा.श्रीमती आसावरी बोधनकर-जोशी हे उपस्थित होते. त्यांच्या हस्ते देखील विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी खास विनोदी शैलीतून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले. वर्षभराच्या कामगिरीचा आढावा घेऊन एका विद्यार्थ्याची व एका विद्यार्थिनीची निवड 'दयानंद श्री' व 'दयानंद श्रीमती'साठी करण्यात आली. यावर्षी दयानंद श्री म्हणून जगदाळे अधिराज संदिपान तर दयानंद श्रीमती म्हणून कु. स्वरांजली महादेव पांचाळची निवड करण्यात आली. तसेच यावर्षीचा उत्कृष्ट विद्यार्थी म्हणून पठाण इरफान उस्मान खान व उत्कृष्ट विद्यार्थिनी म्हणून सायली मारूती कणसे यांचा गौरव करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे विद्यार्थी प्रिय प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड सरांचे मन:पुर्वक आभार मानले. तसेच विद्यार्थी परिषदेस मदत करणारे सहकारी मित्र डॉ. संतोष पाटील, डॉ. सुभाष कदम, डॉ. अशोक वाघमारे, डॉ. शिवकुमार राऊतराव यांनी देखील खूप सहकार्य केले त्यांचे देखील आभार मानले.

**प्रा.डॉ. आर. एस. पारवे**
प्रभारी, विद्यार्थी परिषद

# अंतर्गत तक्रार निवारण समिति

दयानंद कला महाविद्यालयामध्ये २०१४ पासून अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली आहे. शासनाच्या सूचनेनुसार ही अंतर्गत तक्रार निवारण समिती महिलांच्या लैंगिक छळवणुकीच्या तक्रारीबाबत काम करते. या समितीमध्ये डॉ. अंजली जोशी अध्यक्ष असून प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड मुख्य मार्गदर्शक आहेत. डॉ. दुर्गा शर्मा, प्रा. सुवर्णा लवंद, प्रा. अंजली बनसोडे, अश्विनी सुरवसे या महाविद्यालयातील सदस्य असून श्रीमती चंद्रकला भार्गव आणि श्रीमती कुमुदिनी भार्गव या सामाजिक कार्यकर्त्या बाहेरून सदस्य आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती अंतर्गत पुढील उपक्रम राबवण्यात आले.

१. दि. ९ जुलै २०२४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये सर्वप्रथम महिलांच्या लैंगिक छळवणुकीच्या संदर्भात तक्रारींचा आढावा घेण्यात आला. लैंगिक शोषणाच्या संदर्भातील कोणत्याही तक्रारी समितीसमोर प्राप्त झालेल्या नाहीत याची नोंद घेण्यात आली.

२. दि. २३ ऑक्टोबर २०२४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समितीची दुसरी बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये समाजात घडणाऱ्या स्त्रियांवरील अत्याचाराच्या घटनांबाबत खेद व्यक्त करण्यात आला. भविष्यात अशा घटना घडण्यास प्रतिबंध बसावा यासाठी विद्यार्थिनींचे समुपदेशन अधिक व्यापक पातळीवर घेण्याचा ठराव या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार वेळोवेळी विद्यार्थिनींचे समुपदेशन करण्यात आले.

३. दि. ३ फेब्रुवारी २०२५ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समितीची तिसरी बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये विद्यार्थिनींना विविध कौशल्य शिकता यावेत आणि त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहून आत्मनिर्भर बनता यावे या दृष्टीकोनातून मुलींसाठी ब्रायडल मेकअप ट्रेनिंग कार्यशाळा घेण्यात ठरले.

४. दि. ७ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी २०२५ दरम्यान पंधरा दिवसांची ब्रायडल आणि प्रोफेशनल मेकअप ट्रेनिंग कार्यशाळा महाविद्यालयाच्या सर्व विद्यार्थिनींसाठी आयोजित करण्यात आली. या ट्रेनिंग कार्यशाळेसाठी ४२ विद्यार्थिनींनी नाव नोंदणी केली. प्रत्येकी १००० रूपये फीस या ट्रेनिंग कोर्ससाठी ठेवण्यात आली होती. अशा प्रकारचे ट्रेनिंग कोर्सेस कमीत कमी दहा हजार ते पन्नास हजार रूपये फीस घेवून शिकवले जातात. परंतु दयानंद शिक्षण संस्थेने अत्यंत अल्प दरात विद्यार्थिनींना हे कौशल्य शिकण्याची संधी उपलब्ध करून दिली. अंजली धर्माधिकारी यांची निवड ट्रेनर म्हणून करण्यात आली. जवळपास तीन आठवडे चाललेल्या या ब्रायडल मेकअप ट्रेनिंग कार्यशाळेत विद्यार्थिनींना नववधूचा मेकअप, हेअर स्टाईल, कॉस्मेटिक आणि आरोग्य, साडी ड्रेपिंग अशा सर्व बाबींचे कौशल्य शिकवण्यात आले. तसेच प्रॅक्टिसही देण्यात आली. समारोपाच्या दिवशी विद्यार्थिनींमध्ये ब्रायडल मेकअप स्पर्धा ठेवण्यात आली. यामध्ये प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थिनींना बक्षिसे देण्यात आली.

५. दि. १५ फेब्रुवारी २०२५ रोजी दयानंद कला महाविद्यालयातील अंतर्गत तक्रार निवारण समिती आणि ॲडवायझर्स ऑर्गनायजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने Financially aware and empowered India : women's financial program आयोजित करण्यात आले. यामध्ये financial planning, money

management, money investment, asset allocation, mutual fund अशा विविध मुद्यांवर श्री. मुरारी सावंत, चार्टर्ड अकौंटंट, परळी यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने प्राध्यापिका, कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. श्री. सामंत यांनी पीपीटीद्वारे वरील संदर्भात मार्गदर्शन केल्या. या कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सुवर्णा लवंद यांनी केले. दुर्गा शर्मा, प्रा. अंजली बनसोडे, अश्विनी सुरवसे यांनी सहाय्य केले.

६. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने दि. ८ मार्च २०२५ रोजी ब्रायडल मेकअप ट्रेनिंगचा समारोप करण्यात आला. समारोपाच्या प्रमुख पाहुण्या म्हणून ब्युटीशियन श्वेत परदेसी यांना निमंत्रित करण्यात आले. भारतातील पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रियांना अनेक गोष्टी करण्यासाठी अडथळे येतात. परंतु कोणत्याही गोष्टीवर मात करून स्त्रिया विविध कौशल्य प्राप्त करून स्वत:च्या पायावर उभ्या राहू शकतात, असे मार्गदर्शन श्वेता परदेशी यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड उपस्थित होते. अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या चांगल्या कार्यामुळे महाविद्यालयामध्ये लैंगिक छळवणुकीच्या घटनांची संख्या कमी झाल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. या कार्यक्रमात मुख्य ट्रेनर अंजली धर्माधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. या कोर्समध्ये सहभागी विद्यार्थिनींनी यावेळी आपली मनोगते व्यक्त करताना अशा कौशल्य प्रशिक्षणाची अत्यंत आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. महाविद्यालयाने आणि दयानंद शिक्षण संस्थेने ही संधी मुलींसाठी उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यार्थिनींनी धन्यवाद मानले. या कार्यक्रमाचे संयोजन समिती सदस्य डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले. प्रा. सुवर्णा लवंद, प्रा. अंजली बनसोडे, अश्विनी सुरवसे यांचे सहाय्य लाभले.

**–डॉ. अंजली जोशी**
अध्यक्ष
अंतर्गत तक्रार निवारण समिती



# ॲनिमेशन विभाग

प्रथम वर्षाच्या भरघोस प्रवेशासह ॲनिमेशन मधील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सुरुवात झाली. सर्वप्रथम द्वितीय आणि तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टीचे आयोजन केले व प्रथम वर्षातून एक मिस्टर आणि मिस फ्रेशर निवडण्यात आले.

गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून ॲनिमेशन विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, चित्रकला आणि डिजिटल पोस्टर मेकिंग स्पर्धा दि. २४ जुलै २०२४ रोजी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रथम व द्वितीय विद्यार्थ्यांना डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हरिप्रसाद सोमाणी यांनी त्यांचा रोमांचक जीवनप्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.

दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी ॲनिमेशनची माजी विद्यार्थिनी आणि रायझिंग सन पिक्चर्स, ऑस्ट्रेलियामध्ये काम करणारे श्री. प्रितम साहा यांचा 'फ्चुअर ट्रेन्डस् इन व्हीएफएक्स इंडस्ट्री' या विषयावर ऑनलाईन वेबीनार आयोजित करण्यात आला. ज्यामुळे आपल्या विषयामध्ये जागतिक स्तरावरील नोकरीच्या संधी विद्यार्थ्यांना जाणून घेता आल्या.

दि. २६ आणि २७ डिसेंबर २०२४ दरम्यान अभिजात फिल्म सोसायटीतर्फे आयोजित दोन दिवसीय शॉर्ट फिल्म फेस्टीवलचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ॲनिमेशन विभागातील ३५ विद्यार्थ्यांनी व्हॉलिंटीयर म्हणून काम पाहिले व उर्वरित विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी जगभरातून आलेल्या शॉर्ट फिल्मसचा आनंद घेतला. तसेच तेथे आलेल्या दिग्दर्शक, कलाकार व परिक्षकांशी संवाद साधला. अभिजात फिल्म सोसायटी यांनी सर्व व्हॉलिंटीयर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कामाची दखल घेतली.

याच फिल्म फेस्टीवलसाठी परीक्षक म्हणून आलेले पुण्याचे श्री. राजेश खेले यांनी २६ डिसेंबर २०२४ रोजी 'मॅजिक ऑफ एआय इन ॲनिमेशन इंडस्ट्री' या विषयावर प्रकाश टाकला. यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी यांनीही मार्गदर्शन केले.

दि. २४ जानेवारी २०२५ रोजी श्री. प्रथमेश जाधव, थिएटर आणि स्क्रीन आर्टिस्ट, अभिजात कोअर कमिटी मेंबर यांचे 'कन्सेप्ट डेव्हलपमेंट ॲण्ड कॅरेक्टर बिल्डिंग' या विषयावर दृकश्राव्य माध्यमाद्वारे सेमिनार घेण्यात आला. महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

५ फेब्रुवारी २०२५ रोजी दयानंद गुणवंत विद्यार्थी सोहळा आयोजित करण्यात आला. यामध्ये बी.ए. ॲनिमेशनमधील मेरिट प्रथम शुभम जाधव, मेरिट द्वितीय सागर गुंडाळे, मेरिट तृतीय समर्थ जाधव यांना व बी.व्होक. मधून मेरिट प्रथम ऋतुजा हाडोळे, मेरिट द्वितीय ओंकार चौंडे यांना अनुक्रमे १० हजार, ७ हजार आणि ५ हजार अशी स्कॉलरशीपची बक्षीस देऊन दयानंद शिक्षण संस्थेतर्फे गुणगौरव करण्यात आला.

२३ आणि २४ मार्च २०२५ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनात 'दयानंद कला भुषण २०२५' हा पुरस्कार देऊन इरफान पठाण या विद्यार्थ्यास गौरविण्यात आले.

वर्षअखेरीस तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप देऊन वर्षाची सांगता झाली.

**डॉ. दुर्गा शर्मा**
विभाग प्रमुख

# फॅशन डिझाईन विभाग

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची सुरुवात प्रथम वर्षाच्या विद्यार्थिनी यांना मिस फ्रेशर्सचे आयोजन करून स्वागत करून करण्यात आली. दि. २ ऑगस्ट रोजी फ्रेशर्स प्रोग्राम संपन्न झाला. कार्यक्रमासाठी एकूण १८० विद्यार्थी उपस्थित होते.

दयानंद कला महाविद्यालय फॅशन डिझाईन विभाग तसेच महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल अंतर्गत सुप्रसिद्ध उद्योजिका सायली राजाध्यक्ष, सोशल मिडिया इन्फ्लूंसर, ब्लॉगर यांची 'उद्योजकता विकास' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा २६ जुलै २०२४ रोजी संपन्न झाली. व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टींची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. भारतातील पारंपरिक साड्या प्रत्येक महिलांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य राजाध्यक्ष मॅडम करीत आहेत. या कार्यक्रमासाठी एकूण ९० विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांद्वारे प्रश्न विचारण्यात आले व त्यांच्या शंकांचे निरसन मॅडमद्वारे अतिशय प्रोत्साहित करणारे असे झाले.

दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी विद्यार्थ्यांद्वारे नॅशनल हॅण्डलूम डे साजरा करण्यात आला. यामध्ये द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भारतीय पारंपरिक साडी याबद्दल पीपीटी प्रेझेंटशनद्वारे साड्यांची माहिती देण्यात आली.

दि. ४ व ५ सप्टेंबर २०२४ रोजी शिल्पा हलदार, स्वीडन यांचे दोन दिवसीय डिजिटल डिझाईन या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना थ्री-डी डिझाईन व प्रिंट डेव्हलमेंटचे प्रात्यक्षिक मॅडमद्वारे शिकवण्यात आले. कार्यशाळेसाठी एकूण ८० विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १ ऑक्टोबर २०२४ रोजी विभागातील शैक्षणिक सहल सोलापूर येथील स्पीड शर्ट तसेच हॅंडलून पैठणी युनीट तसेच मार्केट सर्व्हे इत्यादी ठिकाणी घेऊन जाण्यात आली होती. सहलीसाठी एकूण ५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

दि. १ फेब्रुवारी २०२५ रोजी नारायणा कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन यांच्याद्वारे फॅशन स्केचिंग तसेच गारमेंट डिझाईन यावर राज्यस्तरीय स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये आपल्या विभागातील ३० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. यामध्ये फॅशन स्केचिंग स्पर्धेत प्रथम पारितोषिक रु. ५००० द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी क्रांती वाघमारे, द्वितीय पारितोषिक २००० रुपये युवराज जगताप व तृतीय पारितोषिक १००० रुपये श्रीलक्ष्मी वेल्लोपल्ली यांनी पटकावले, या विद्यार्थ्यांनी रोख रकमेसह प्रमाणपत्र व ट्रॉफी पटकावली. गारमेंट डिझाईन या स्पर्धेमध्ये स्वप्नाली करपे व श्रावणी चव्हाण यांनी प्रत्येकी रोख २००० रूपये, प्रमाणपत्र व ट्रॉफी प्राप्त केली.

महिला बीसीए महाविद्यालय, लातूर येथील फॅशन डिझाईन विभागातर्फे 'फॅशन स्पेक्ट्रा २०२५ फॅशन शो इंटर कॉलेज कॉम्पिटीशन' दि. ८ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झाली. या स्पर्धेत एकूण १६० विद्यार्थिनींनी आपले कॉश्युम डिझाईन सादर केले. यामध्ये सस्टेनेबल, डिस्ने प्रिन्सेस, एम्ब्रॉयडरी, एथनिक कॉश्युम या थीम ठेवण्यात आल्या होत्या. स्पर्धा अतिशय अटीतटीची होती. या स्पर्धेमध्ये आपल्या दयानंद कला महाविद्यालयाच्या फॅशन डिझाईन विभागातील श्रावणी चव्हाण हिला प्रथम पारितोषिक रू.

११,०००/- रोख व ट्रॉफी, द्वितीय पारितोषिक भाग्यश्री आदमाने हिला रु. १०००/- रोख व ट्रॉफी तसेच बेस्ट परफॉर्मन्स कोमल जाधव हिला ट्रॉफी, प्रिया जाधव हिला बेस्ट मॉडेलिंग क्राऊन आणि एक हजार रुपये इत्यादी पारितोषिके प्राप्त झाली. या स्पर्धेतील एकूण आठ पारितोषिकांपैकी तब्बल चार पारितोषिके आपल्या महाविद्यालयाला प्राप्त झाली आहेत. सर्व विजेत्या विद्यार्थिनींचे दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी व फॅशन डिझाईन विभागप्रमुख सुवर्णा लवंद नाईक व विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थिनींनी अभिनंदन केले.

दि. १७ व १८ मार्च २०२५ रोजी फॅशन डिझाईन विभागातील विद्यार्थ्यांसाठी 'फ्युजन २०२५ - एक्झिबिशन कम सेल'चे आयोजन दयानंद कला महाविद्यालयात करण्यात आले होते. विद्यार्थिनींनी तयार केलेले हँडमेड प्रोडक्ट या ठिकाणी विक्री व प्रदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते. या दोन दिवसांमध्ये २५,००० रुपयांपर्यंतची विक्रीही झाली. या प्रदर्शनाद्वारे विद्यार्थ्यांना मार्केट स्कील तसेच ग्राहकांची पसंती व गरज हे प्रात्यक्षिकाद्वारे शिकण्यास मिळाले.

९ एप्रिल २०२५ रोजी तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ देण्यात आला.

**-प्रा. सुवर्णा लवंद-नाईक**
विभाग प्रमुख



# मराठी वाङ्मय मंडळ

महाविद्यालयीन तरुणांमध्ये साहित्य, कला गुणांची आवड निर्माण व्हावी म्हणून दरवर्षी मराठी भाषा व वाङ्मय विभागांतर्गत मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात येते. त्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये या मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळाच्या अध्यक्ष एम.ए. तृतीय वर्षातील विद्यार्थी व्यंकट पांचाळ याची निवड करण्यात आली.

या मंडळांतर्गत वर्षभरात विविध वाङ्मयीन उपक्रम राबविण्यात आले. प्रारंभी एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी एम.ए. प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ ठेवण्यात आला. या समारंभात एम.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचे स्वागत करून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत एम.ए. (मराठी) प्रथम आलेला विद्यार्थी सुधीर सावंत व तृतीय आलेली विद्यार्थिनी वैष्णवी सोनार यांचा सत्कार करण्यात आला. मराठी वाङ्मय मंडळांतर्गत दि. १४ जानेवारी ते २८ जानेवारी दरम्यान मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला. या पंधरवडा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये आंतर जिल्हा निबंध स्पर्धा, कवी संमेलन, वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम, पुस्तक परीक्षण, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, कथा-कथन इत्यादी उपक्रम राबविण्यात आले.

२७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. हरिदास फेरे व डॉ. गणेश बेळंबे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. मराठी भाषेला भारत सरकारने अभिजात भाषेचा दर्जा घोषित केल्यानंतर आनंदोत्सव साजरा करण्यासाठी अभिजात भाषा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला.

महाविद्यालयातील स्नेहसंमेलन 'कलातीर्थ २०२५' निमित्त मराठी वाङ्मय मंडळ अंतर्गत विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये कवी संमेलन, कथा-कथन, सुंदर हस्ताक्षर इत्यादी स्पर्धा घेण्यात आल्या. विजयी स्पर्धकांना स्नेह संमेलनामध्ये बक्षीसही देण्यात आले.

या मंडळांतर्गत व मराठी विभागामार्फत साहित्य अकादमी विविध उपक्रम व योजना ही कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला साहित्य अकादमीचे सदस्य डॉ. नरेंद्र पाठक उपस्थित होते. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या साहित्याचा लोकतत्वीय अभ्यास या विषयावरही कार्यशाळा घेण्यात आली. या कर्याशाळेचे बीजभाषक डॉ. साहेब खंदारे उपस्थित होते.

एम.ए. द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना या मंडळामार्फत निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता. अशा विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांचे साहित्याविषयी अभिरूची निर्माण करण्याचे कार्य या मंडळाने वर्षभर केले. या मंडळाचे प्रभारी म्हणून डॉ. सुभाष कदम यांनी काम पाहिले.

**-डॉ. सुभाष कदम**
प्रभारी,
मराठी वाङ्मय मंडळ

# प्रशासकीय सेवा विभाग

दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित दयानंद कला महाविद्यालयामध्ये बी.ए. प्रशासकीय सेवा विभाग जून २०१६ मध्ये सुरू करण्यात आला. अलीकडच्या काळात स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचे महत्त्व लक्षात घेऊन संस्थेच्या वतीने हा विभाग सुरू करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना पदवीसोबतच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्याची उत्तम सोय झाली. बी.ए. प्रशासकीय सेवा ही तीन वर्षांची पदवी असून या पदवीचा अभ्यासक्रम हा शिपाई पदापासून ते उपजिल्हाधिकारी पदापर्यंतचा आहे. या अभ्यासक्रमात मराठी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, गणित, विज्ञान इत्यादी विषयांचा समावेश आहे. विभागामध्ये सध्या प्रा.डॉ. संतोष पाटील हे विभागप्रमुख म्हणून कार्यरत असून एकूण आठ प्राध्यापक अध्यापनाचे कार्य करीत आहेत. आजतागायत विभागातून अनेक विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या शासकीय पदांवर नेमणूक झालेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये विभागातर्फे वर्गातील अध्यापनाव्यतिरिक्त विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला जुलै २०२४ मध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास प्राचार्य एस. पी. गायकवाड सर, विभागप्रमुख डॉ. संतोष पाटील, प्रा. उत्तम दुधभाते, प्रा. शिवलिंग गोरे, प्रा. यशवंत जगताप, प्रा. गोविंद जाधव, प्रा. माळी मॅडम, प्रा. हलगरे व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दि. १८-०१-२०२५ रोजी बी.ए. प्रशासकीस सेवा विभागामध्ये 'स्पर्धा परीक्षा : एक आव्हान' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दयानंद कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे होते तर आय.पी.एस. डॉ. सागर खर्डे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रा. प्रशांत दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचे सूत्रसंचालन रोहित पाल व गायत्री कुंभार यांनी केले. या कार्यशाळेस बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. तसेच विभागाचे विभागप्रमुख डॉ. संतोष पाटील, प्रा. शिवलिंग गोगे, प्रा. गोविंद जाधव, प्रा. यशवंत जगताप यांची उपस्थिती होती.

बी.ए. प्रशासकीय सेवा विभागाच्या वतीने दिल्ली येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीमध्ये विभागप्रमुख डॉ. संतोष पाटील, प्रा. शिवलिंग गोगे, प्रा. महेश मोरे, प्रा. गोविंद जाधव, प्रा. माळी मॅडम, श्री. व्यास सर व ४८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या सहलीत संसद भवन, राष्ट्रपती भवन, लाल किल्ला इत्यादी स्थळे विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

या विभागातून उत्तीर्ण विद्यार्थ्यांची पुढे विविध पदांवर नेमणूक झालेली आहे. गोविंद जगताप- न्यायालय लिपीक, विशाल नारके- महसूल सहाय्यक, प्रेरणा चव्हाण- उत्पादन शुल्क कॉन्स्टेबल, सचिन जाधव- आरोग्य सेवक, वैष्णवी शिंदे- रत्नागिरी पोस्टमॅन, धरती राठोड- चंद्रपूर पोस्टमॅन, प्रांजली गवाळे- पोस्ट ऑफिस, मठपती संगमेश्वर- सॅक, धनराज नागरगोजे- मनपा कर्मचारी, लातूर, बालाजी सातपुते- अग्निशामक या विद्यार्थ्यांचा विभागाच्या वतीने

सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रमास प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, प्रा.डॉ. संतोष पाटील, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात विभागप्रमुख डॉ. संतोष पाटील व प्रा. शिंदे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सई शिंदे या विद्यार्थिनीने केले. कार्यक्रमास प्राध्यापक व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. विभागाच्या वतीने विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे, त्यांची विविध शासकीय पदांवर निवडीसाठी यशस्वी प्रयत्न करणे हे विभागाचे उद्दिष्ट आहे.

**–डॉ. संतोष पाटील**
समन्वयक

# कमवा व शिका

दयानंद कला महाविद्यालयात आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांसाठी 'कमवा व शिका' योजना राबविली जाते. या महाविद्यालयात येणारे बहुसंख्य विद्यार्थी हे ग्रामीण भागातून शेतकरी, शेतमजूर अशा कुटूंबातून आलेले असतात, त्यांची आर्थिक परिस्थिती कमालीची नाजूक असते. त्यामुळे त्यांना स्वकमाईतून शिक्षण घेण्यास मदत व्हावी या हेतूने ही योजना महाविद्यालयात राबविली जाते. दरवर्षी आर्थिकदृष्ट्या कमकुवत विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी महाविद्यालयाकडून सूचना काढून इच्छूक विद्यार्थ्यांची प्राचार्य कक्षात मुलाखत घेण्यात येते. उपस्थित विद्यार्थ्यांमधून त्यांची गरज लक्षात घेऊन निवड करण्यात येते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात हलकेसे एक तासाचे काम देण्यात येते. यामध्ये कार्यालय, ग्रंथालय, वर्ग खोल्यांची स्वच्छता, झाडाला पाणी घालणे, ग्रंथालयातील पुस्तकांची व्यवस्था, पुस्तक देव-घेव इत्यादी कामे विद्यार्थ्यांना दिली जातात. अशा विद्यार्थ्यांना महिन्याला ठराविक मानधन देण्यात येते. यामुळे संबंधित विद्यार्थ्याला शैक्षणिक खर्चासाठी महाविद्यालयाकडून थोडीफार मदत होते. दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्येही विद्यार्थ्यांना 'कमवा व शिका' योजनेतून मदत झाली. याशिवाय विद्यार्थ्यांमध्ये विद्यार्थी दशेपासूनच श्रम प्रतिष्ठेचे महत्त्वही पटवून देण्याचे कार्य महाविद्यालय करते. या योजनेचे प्रभारी प्राध्यापक म्हणून प्रा.डॉ. रामेश्वर खंदारे यांनी काम पाहिले.

**–डॉ. रामेश्वर खंदारे**
प्रभारी

# हिंदी साहित्य मंडल

प्रतिवर्ष की तरह शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मे महाविद्यालय में हिंदी साहित्य मंडल की स्थापना की गई। साहित्य मंडल के पदाधिकारी निम्नलिखित है-

अध्यक्ष- भगवती गायकवाड (एम.ए. द्वितीय)
उपाध्यक्ष- मयुरी पाटील (एम.ए. प्रथम)
सचिव- महेश सहाणे (बी.ए. तृतीय)
वेध प्रतिनिधी- कल्पना गाजरे (एम.ए. द्वितीय)
सदस्य- १. शरद कांबळे (एम.ए. द्वितीय)
२. तिरूमला नरहरे (बी.ए. द्वितीय)
३. अंजली शिंदे (बी.ए. द्वितीय)
४. महेश कसबे (बी.ए. द्वितीय)
५. तेजस पाटोळे (बी.ए. प्रथम)
६. दलाल अपेक्षा (बारावी)
७. पिंपळे ममता (अकरावी)

यह मंडल छात्रों को प्रोत्साहित कर उनकी प्रतिभाओ को पंख लगाने का अवसर देता है। इस मंडल का उद्‌घाटन हिंदी के जानेमाने नव समीक्षक प्रो. सतीश यादवजी के करकमलों द्वारा संपन्न हुआ।

हिंदी साहित्य मंडल की ओर से हिंदी पखवारे का आयोजन किया गया। संपूर्ण पखारे में विभिन्न स्पर्धाओं का आयोजन किया गया जैसे, शुद्ध वर्तनी, सुंदर हस्ताक्षर, निबंध स्पर्धा आदी। इन स्पर्धा के विजेताओं को वार्षिक स्नेहसंमेलन के प्रमुख अतिथी के हाथों सम्मानित किया गया।

वार्षिक स्नेहसंमेलन के निमित्त विविध स्पर्धाओं का आयोजन किया गया। जिसमें कथा कथन और काव्य वाचन सामिल है। विजेताओं को स्नेहसंमेलन के उद्‌घाटक सौ. आसावरी बोधनकर-जोशी के करकमलों द्वारा प्रोत्साहित किया गया।

एम.ए. द्वितीय वर्ष की छात्रा कु. सुजाता खटके जो विश्वविद्यालय मे हिंदी विषय में सर्वप्रथम आकर स्वर्णपदक विजेता हुई उसको प्रा. सतीश यादवजी की ओर से सम्मानित किया गया।

इसके अतिरक्ति वर्षभर में विभिन्न साहित्यिक गतिविधियों का आयोजन कर हिंदी प्रेमी छात्रों को प्रोत्साहित किया गया। साहित्य मंडल को महाविद्यालय के छात्रप्रिय प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड की ओर से निरंतर मार्गदर्शन मिलता गया। इस लिए उनके प्रति मैं आभार प्रकट करती हूँ।

**डॉ. प्रणिता फड**
प्रभारी
हिंदी साहित्य मंडल

# कनिष्ठ महाविद्यालय

विद्यार्थ्यांना यशाकडे घेऊन जाणारा सर्वात जवळचा मार्ग म्हणून ओळख असलेले दयानंद कला महाविद्यालय! अशा ख्यातनाम महाविद्यालयाचा उपप्राचार्य म्हणून काम करताना मला सार्थ अभिमान वाटतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा वसा घेऊन त्या दृष्टीने विद्यार्थी घडवण्याचे कार्य करणारे महाविद्यालय म्हणजे दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालय होय. विद्यार्थ्यांचे यश आणि दयानंद कला महाविद्यालय हे दोन शब्द एकमेकांना पर्यायी झाले आहेत. कला शाखेत यशस्वी कारकीर्द करण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील विद्यार्थी इयत्ता दहावी नंतर लातूरच्या दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयास प्रथम प्राधान्य देतात. आधुनिक तंत्र पद्धतीचे अध्ययन-अध्यापनासाठी वापर, सरावातील सातत्य, गुणवत्ता विकास वर्गाचे उत्तम नियोजन, शैक्षणिक सहली, प्रदर्शन, लेखन, वाचन, क्रीडा, सांस्कृतिक व संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी सातत्याने समन्वय असावा यासाठी विद्यार्थी-पालक मेळाव्याचे आयोजन, निवडक गुणवंत विद्यार्थ्यांसाठी शिक्षक पालक योजना यासारख्या अनेक योजना आखून दयानंद कला महाविद्यालय आपल्या यशाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवून यशाची नवनवी शिखरे पादाक्रांत करीत आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षाच्या सुरुवातीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापकांची बैठक घेऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध समित्या गठीत करण्यात आल्या, यामध्ये वर्षभराच्या कामकाजाचे उत्तम नियोजन करण्यात आले.

यश मिळवण्यासाठी आवश्यक असणारी सर्वात मोठी शक्ती म्हणजे आत्मविश्वास! हा आत्मविश्वास सरावातून निर्माण होतो. १२ वी बोर्ड परीक्षेत यश मिळविण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांकडून सातत्याने सराव करून घेण्यासाठी महाविद्यालयातील परीक्षा विभाग प्रमुख डॉ. गोपाल बाहेती, प्रा. जिगाजी बुद्रुके व प्रा. दशरथ ननवरे यांच्याकडे परीक्षा विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली. परीक्षा विभागाने वर्षभराचे उत्तम नियोजन करून इ. १२ वी वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ७ सराव परीक्षांचे आयोजन केले. विद्यार्थ्यांना उत्तेजन देण्यासाठी प्रत्येक सराव परीक्षेत प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे १०००/- , ७००/- व ५००/- रुपये याप्रमाणे रोख पारितोषिके महाविद्यालयाच्या वतीने देण्यात आली.

इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांत गुणात्मक स्पर्धा वाढावी म्हणून त्यांना प्रोत्साहनपर अनेक रोख रकमेची पारितोषिके, सन्मानचिन्ह दिली जातात. दयानंद शिक्षण संस्थेकडून १२ वी बोर्ड परीक्षेत प्रथम येणाऱ्यास रु. १०,०००/-, द्वितीय रु. ७,०००/- व तृतीय ५,०००/- रकमेचे बक्षीस दिले जाते. तसेच संस्था पदाधिकारी, माजी प्राचार्य, प्राध्यापक व माजी विद्यार्थी यांच्याकडूनही विविध रोख असे हजारो रूपयांची पारितोषिके विद्यार्थ्यांना दिली जातात. यामुळे महाविद्यालयाने १२ वी बोर्ड परीक्षेच्या निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे.

विद्यार्थ्यांच्या यशात केवळ महाविद्यालयाचा वाटा नसतो तर त्यांच्या कुटुंबाचाही मोलाचा वाटा असतो. त्यामुळे शिक्षक व पालकांमध्ये संवाद असणे आवश्यक असते. असा संवाद साधला जावा यासाठी दर शुक्रवारी व शनिवारी प्रत्येकी वीस विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बैठकीचे आयोजन करण्यात येते. बैठकीत विद्यार्थी व पालकांच्या समस्या समजून घेऊन व त्या समस्या सोडवून विद्यार्थी व पालकांत एक विश्वासाचे वातावरण निर्माण करण्यात येते.

उपस्थिती समितीद्वारे दर महिन्याला अनुपस्थित विद्यार्थ्यांची दखल घेऊन विद्यार्थ्यांच्या पालकांपर्यंत अनुपस्थिती बाबत लघु संदेशाद्वारे व प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे संपर्क करून माहिती देण्यात येते. विद्यार्थ्यांची ग्रामीण जीवनाशी नाळ जोडून ठेवण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचा एन.एस. एस. विभाग नेहमी अग्रेसर असतो. यासाठी महाविद्यालयात रा.से.योचे दोन युनीट कार्यरत आहेत. कार्यक्रम अधिकारी प्रा. विलास कोमटवाड व प्रा. अनिल भूरे यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने अनेक

उपक्रम राबविले जातात. या उपक्रमामध्ये स्वयंसेवक संकेत तेलंगे, राजनंदिनी पाटील, अनुजा सोळंखे, रोहित जाधव यांना उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून गौरविण्यात आले तसेच मौजे खुंटेगाव या ठिकाणी सात दिवसांचे विशेष शिबीर घेण्यात आले.

प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून इयत्ता ११ वी व १२ वी वर्गातील विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा मनसोक्त वापर करता यावा तसेच वाचन संस्कृती वाढावी यासाठी 'गोल्ड कार्ड' ही संकल्पना नव्यानेच राबविण्यात आली. त्यामुळे या योजनेचा अनेक विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. तसेच त्यांच्यासाठी स्वतंत्र अभ्यासिकेची व्यवस्था सुद्धा करण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात महाविद्यालयाचा क्रीडा विभाग देखील मोलाचे योगदान देत आहे. या विभागातर्फे विद्यार्थ्यांसाठी कबड्डी, व्हॉलिबॉल, बॅडमिंटन, टेनीस, मैदानी स्पर्धा, जिम, क्रिकेट, कॅरम, क्रॉस कन्ट्री, बुद्धिबळ, लॉन टेनीस, मल्लखांब, शिकाई मार्श आर्ट, योगा, कराटे इत्यादी इनडोअर व आऊटडोअर क्रीडा प्रकारांचे आयोजन करण्यात आले. या सर्व क्रीडा प्रकारात एकूण १०० मुले-मुली प्रत्यक्षात सहभागी झाले. यातील पार्थ आशिष सोमाणी याची लॉन टेनीसमध्ये राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली. बॉक्सिंग क्रीडा प्रकारात शिंदे रोहन, मोरे सोहम, माळी प्रथमेश, मोरे सोहम शशीकांत, आकाश घोडसे, निकम राज शंकर इत्यादी शटल बॅडमिंटन या क्रीडा प्रकारात, फ्री स्टाईल, १०० मी. गायकवाड वैष्णवी, गायकवाड पायल, फ्री स्टाईल, ५० मी. ब्रेस्ट स्ट्रोक आणि बटरफ्लाय, श्रावणी जगताप, स्ट्रोक आणि फ्लाय- ज्युडो आणि कुस्ती फ्री स्टाईल क्रीडा प्रकारात कु. पवार अपेक्षा, वेट लिफ्टिंग १०९ किलो गट- कृष्णकांत सुमित सुरवसे, चिखलीकर सिद्धी, भालाफेक- कु. रुपाली गोविंद शिंदे व रेश्मा शानूर शेख, धावणे आणि चालणे- लवटे अभिषेक, सोळंके अनुजा, आयुष कांबळे, बांबू उडी- चामे सुजित, गोळा फेक- म्हेत्रे समृद्धी, हाताडा फेक- पवार ऋतुजा, क्रॉसकंट्री- म्हेत्रे समृद्धी, पटाईत पूजा, पाटील राजनंदिनी, साळुंके आश्विनी, बेंद्रे साक्षी या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये राज्य स्तरावर सहभाग नोंदविला. अनेक विद्यार्थ्यांनी जिल्हा व विभाग स्तरावर सहभाग नोंदविला.

प्रा. दिनेश जोशी, प्रा. अंजली बनसोडे, प्रा. मनोज गवरे यांनी सांस्कृतिक विभागाच्या वतीने वर्षभरात गीतगायन, नृत्य, मिमिक्री, नाटक अशा विविध स्पर्धा घेऊन विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्याचे कार्य केले. तसेच अर्थशास्त्र व संगीत विभागाच्या वतीने शैक्षणिक सहलीचे आयोजन डॉ. गोपाल बाहेती, प्रा. दिनेश जोशी, प्रा. अंजली बनसोडे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. शितल कोरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी समाजाचे दायित्व विचारात घेऊन आपल्या आईच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त महाविद्यालयातील गरीब व होतकरून एकूण २१ विद्यार्थिनींचे शैक्षणिक शुल्क रु. २१,०००/- तसेच पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित ५०००/- , प्रा. अंजली बनसोडे रु. ५०००/- व प्रा. मनोज गवरे ५०००/- रूपये भरनू एक नवा आदर्श समाजासमोर निर्माण करण्याचे कार्य केले आहे.

दयानंद महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताचा विचार करता नाविण्यपूर्ण उपक्रम नेहमीच राबविले जातात. महाविद्यालयातील प्रत्येक वर्गात स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पीपीटी, व्हीडीओ, ऑनलाईन लेक्चर व ई-बुक्स संदर्भातील माहिती महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. इ. ११ वी च्या गरीब व होतकरून विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले. तसेच कमवा व शिका या योजनेत विद्यार्थ्यांना सहभागी करून घेऊन त्यांना आर्थिक मदत करण्यातही आमचे महाविद्यालय अग्रेसर आहे.

दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरणमजी लाहोटी, शालेय समितीचे चेअरमन मा. ललितभाई शाह, सचिव मा. रमेश बियाणी यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन तसेच प्राचार्य डॉ. एस. पी. गायकवाड यांचे सुक्ष्म नियोजन व कार्यतत्परता आणि प्राध्यापकांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल यशासाठी आमचे महाविद्यालय नेहमीच कटीबद्ध राहील.

**-डॉ. दिलीप नागरगोजे**
उपप्राचार्य

# दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती

* दयानंद शिक्षण संस्थेतर्फे महाविद्यालयातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची शिष्यवृत्ती मिळत नाही अशा विद्यार्थ्यांना २०१९-२० पासून दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली आहे.
* दयानंद शिक्षण संस्थेच्या वतीने विद्यापीठीय पदवी व पदव्युत्तर परीक्षेत गुणवत्ता यादीत सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रूपये १०,०००/-, सर्वद्वितीय येणाऱ्यास रोख रूपये ७०००/- व सर्वतृतीय येणाऱ्यास रोख रूपये ५०००/- पारितोषिकाच्या स्वरूपात देऊन गौरव करण्यात येतो.
* बी.ए. प्रथम वर्षात, बी. ए. द्वितीय वर्षात, एम.ए प्रथम वर्षात महाविद्यालयात सर्वप्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस अभ्यासक्रम निहाय संस्थेच्या वतीने दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती रु. ५०००/- प्रदान करण्यात येते.
* पूज्य चुडामणी बालासाहेब महाराज ट्रस्ट, लातूरच्या वतीने या महाविद्यालयातून बारावी, बी.ए. प्रथम व बी.ए. द्वितीय वर्ष या वर्गातून प्रथम व द्वितीय येणाऱ्या व याच महाविद्यालयात प्रवेशित अन्य शिष्यवृत्ती न घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी यांना प्रत्येकी ५०००/- रूपये शिष्यवृत्ती डॉ. जी. बी. भुतडा शिष्यवृत्ती देण्यात येईल. तसेच एम.ए. हिंदी मध्ये प्रवेशित प्रथम दोन विद्यार्थी/विद्यार्थिनी ज्यांचे याच महाविद्यालयातून बी.ए.चे शिक्षण झाले आहे व ज्यांना अन्य शिष्यवृत्ती मिळत नाही त्यांनाही प्रत्येकी रू. ५०००/- शिष्यवृत्ती देण्यात येईल.
* इंग्रजी विभागाचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक कै. प्रा. टी. एम. राव यांच्या स्मरणार्थ पदवी व पदव्युत्तर वर्गात इंग्रजी ऐच्छिक विषयात विद्यापीठात सर्वाधिक गुण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने पुढाकार घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पातळीवर पारितोषिक ठेवण्यात आले आहे.
* विद्यापीठीय परीक्षेत बी.ए. तृतीय वर्षात महाविद्यालयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कै. रमाकांतराव कुलकर्णी पारितोषिक रोख १०००/- व प्रशस्तीपत्र व चांदीचे पदक चिन्ह ठेवण्यात आले आहे.
* बारावी कला, बी.ए. व एम.ए. हिंदीमध्ये जो विद्यार्थी/ विद्यार्थिनी बोर्ड/ विद्यापीठ परीक्षेत सर्वाधिक गुण घेऊन उत्तीर्ण होईल त्यांना डॉ. जी. बी. भुतडा या नावाने रौप्य पदक प्रदान करण्यात येईल.
* एम.ए. हिंदी प्रथम वर्षामध्ये प्रवेशित प्रथम पाच विद्यार्थी/ विद्यार्थिनींना प्रत्येकी रू. १०००/- हिंदी विभागाकडून प्रदान करण्याचा उपक्रम सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त प्रारंभ.
* बी.ए.मध्ये प्रथम व एम.ए. हिंदी मध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. घनश्याम भुतडा यांच्या वतीने चांदीचे पदक देऊन गौरविण्यात येते.
* प्रा.डॉ. प्रदीप सूर्यवंशी यांच्या वतीने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्रसेना विभागातील ज्या विद्यार्थ्यांची आर.डी. परेडसाठी निवड होते त्या विद्यार्थ्यांसाठी त्यांचे वडील लान्स नाईक शिवराम सूर्यवंशी पुरस्कार रोख रूपये २०००/- व स्मृतिचिन्ह देवून गौरविण्यात येते.
* प्रा.डॉ. नितेश स्वामी यांच्या वतीने कै. शंकरराव शिवमूर्ती स्वामी यांच्या स्मरणार्थ क्रीडा विभागात तीन वर्षामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यास रोख रूपये १०००/- व स्मृती चिन्ह देवून गौरविण्यात येते.
* सेवानिवृत्त न्यायाधीश अनिल बी. नाईक यांच्या वतीने त्यांच्या मातोश्री स्व. श्रीमती इंदिरा भालचंद्र नाईक व वडील स्व. भालचंद्र श्रीनिवास नाईक यांच्या स्मरणार्थ विद्यापीठ परीक्षेत बी.ए.तृतीय वर्षात महाविद्यालयातून सर्वप्रथम येणाऱ्या एका विद्यार्थ्यास न्या. अनिल बी. नाईक यांच्या स्व. वडीलांच्या नावाने व एका विद्यार्थिनीस त्यांच्या मातोश्री यांच्या नावाने प्रत्येकी रू. ५०००/- रोख पारितोषिक देण्यात येते.
* माजी इंग्रजी विभागप्रमुख डॉ. ए. पी. विठ्ठल यांच्या वतीने एम.ए. इंग्रजी प्रथम वर्षात महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या पण द्वितीय वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यास रोख पारितोषिक.
* श्री. विनोद पुरुषोत्तम घार यांच्या वतीने स्व.प्रा. पुरुषोत्तम घार यांच्या स्मरणार्थ समाजशास्त्र विषयात बी.ए.मध्ये महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रू. ११००/- रोख पुरस्कार.
* प्राचार्य डॉ. पुनम नथवी, प्राचार्य डॉ. क्रांती सातपुते, प्रा. मेघा पंडीत व प्रा. डॉ. अनुराधा सावरीकर यांच्या वतीने स्व. डॉ. पुष्पलता अग्रवाल यांच्या स्मरणार्थ बी.ए.तृतीय वर्षातील हिन्दी विषयात महाविद्यालयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास रोख पुरस्कार.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड परीक्षेत विद्यापीठ गुणवत्ता यादीत गुणानुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय येणाऱ्या खालील विद्यार्थ्यांना अनुक्रमे रु. 10000/-, रु. 7000/- व रु. 5000/- दयानंद गुणवत्ता शिष्यवृत्ती वितरीत करण्यात आली**

| अ.क्र. | वर्ग | नाव | गणुवत्ता क्र. | शिष्यवृत्ती रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| | | **पदवी** | | |
| १ | बी.ए.पारंपारिक | गाडे वैष्णवी मधुकर | २ | ७००० |
| २ | बी.ए. प्रशासकीय सेवा | काळे मयुरी नामदेव | १ | १०००० |
| | | गुलंगे स्नेहा नागेश | २ | ७००० |
| | | कोंडमगिरे अश्विनी शिवानंद | ३ | ५००० |
| ३ | बी.ए. ॲनिमेशन | जाधव शुभम संजय | १ | १०००० |
| | | गुंडले सागर राजकुमार | २ | ७००० |
| | | जाधव समर्थ संजय | ३ | ५००० |
| ४ | बी.ए. फॅशन | पवार सायली दत्तात्रय | १ | १०००० |
| | | मुळे मानसी चंद्रकांत | २ | ७००० |
| | | पठाण सबमा सालारखा | ३ | ५००० |
| ५ | बी.व्होक | हाडोळे ऋतुजा बलभीम | १ | १०००० |
| | | चौंडे ओमकार राजकुमार | २ | ५००० |
| | | **पदव्युत्तर** | | |
| १ | एम.ए. मराठी | सावंत सुधीर श्रीकांत | १ | १०००० |
| | | सोनार वैष्णवी गोविंद | ३ | ५००० |
| २ | एम.ए. हिंदी | खटके सुजाता | १ | १०००० |
| ३ | एम.ए. लोकप्रशासन | लोले सरोजा तानाजी | १ | १०००० |
| | | कदम निकिता उत्तमराव | २ | ७००० |
| ४ | एम.ए. संगीत | कुलकर्णी ऋचा रविंद्र | २ | ७००० |
| | | देव पद्मजा दामोधर | ३ | ५००० |
| ५ | एम.ए. फॅशन डिझाईन | कुलकर्णी भाग्यश्री उदयराव | १ | १०००० |
| | | ऐतबोने वैष्णवी ज्योतिराम | २ | ७००० |
| | | मुसळे संध्या अर्जुन | ३ | ५००० |

## महाविद्यालयात पदवी / पदव्युत्तर वर्गात
## प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांना देण्यात आलेली दयानंद गुणवंत शिष्यवृत्ती

| अ.क्र. | वर्ग | नाव | शिष्यवृत्ती रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | बी.ए.प्रथम | पाटील अर्णव शेषेराव | ५००० |
| २ | बी.ए. द्वितीय | वाघमारे आरती अशोक | ५००० |
| ३ | बी.ए. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्रथम | राठोडे धरती धनराज | ५००० |
| ४ | बी.ए.ॲडमिनीस्ट्रेटिव्ह द्वितीय | खानापुरे मेराज अख्तर | ५००० |
| ५ | बी.ए. फॅशन प्रथम | वायलोपिल्ली श्रीलक्ष्मी मोहनरॉय | ५००० |
| ६ | बी.ए. फॅशन द्वितीय | काळे रोहन नामदेवराव | ५००० |
| ७ | बी.ए. ॲनिमेशन प्रथम | ओव्हाळ संज्योत सुरेंद्रकुमार | ५००० |
| ८. | बी.ए. ॲनिमेशन द्वितीय | किरवे प्रणव किशोर | ५००० |
| ९. | बी.व्होक. फॅशन प्रथम | तापडिया रेणुका श्रीनिवास | ५००० |
| १०. | बी.व्होक. फॅशन द्वितीय | बोले पूजा अंकुश | ५००० |
| ११. | बी.व्होक.ॲनिमेशन प्रथम | अंबर धनश्री महेश | ५००० |
| १२. | बी.व्होक.ॲनिमेशन द्वितीय | आडे प्रवीण बिभीषण | ५००० |
| १३. | एम.ए. मराठी प्रथम | पांचाळ व्यंकट विलास | ५००० |
| १४. | एम.ए. इंग्रजी प्रथम | जाधव पोर्णिमा बालाजी | ५००० |
| १५. | एम.ए. हिंदी प्रथम | गाजरे कल्पना ज्ञानोबा | ५००० |
| १६. | एम.ए. लोकप्रशासन प्रथम | यादव दीपिका राम | ५००० |
| १७. | एम.ए. संगीत प्रथम | जोशी आकाश अरुणराव | ५००० |
| १८. | एम.ए. ॲनिमेशन प्रथम | साळुंके नचिकेत सुनीलराव | ५००० |
| १९. | एम.ए. फॅशन प्रथम | जोशी गौरी सत्यनारायण | ५००० |

### दयानंद कला महाविद्यालय, लातूर युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ-२०२४'

### सांस्कृतिक विभाग

## विविध कलाप्रकार व गुणवंत कलावंतांची नावे

| अ.क्र. | कला प्रकार | कलावंताचे नाव | पदक | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | सुगम भारतीय संगीत | स्वरांजली पांचाळ | सुवर्ण | १००००/- |
| २. | सुगम पाश्चात्य गायन | | सुवर्ण | १००००/- |
| ३. | पाश्चात्य समुह गायन | ऋचा कुलकर्णी | सुवर्ण | १००००/- |
| ४. | शास्त्रीय नृत्य | | सुवर्ण | १००००/- |
| ५. | दिग्दर्शन | पवन माने | सुवर्ण | १००००/- |
| ६. | नक्कल | अर्जुन पवार | सुवर्ण | १००००/- |
| ७. | स्त्री अभिनय | तनुजा शिंदे | सुवर्ण | १००००/- |
| ८. | स्थळ छायाचित्र | सौदागर सूर्यवंशी | सुवर्ण | १००००/- |
| ९. | चित्रकला | ज्ञानेश्वर साठे | सुवर्ण | १००००/- |
| १०. | पोस्टर | ज्ञानेश्वर साठे | सुवर्ण | १००००/- |
| | | १. यशश्री पाठक | | |
| | | २. स्वरांजली पांचाळ | | |
| ११. | कव्वाली | ३. अधिराज जगदाळे | प्रथम | १००००/- |
| | | ४. यशराज शेवाळे | | |
| | | ५. योगेश्वरी बेलुरे | | |
| | | ६. ऋचा कुलकर्णी | | |
| १२. | एकांकिका | यशराज शेवाळे | प्रथम | १००००/- |
| १३. | शास्त्रीय गायन | यशराज शेवाळे | द्वितीय | ७०००/- |
| १४. | लावणी | तनुजा शिंदे | द्वितीय | ७०००/- |
| | | १. सायली बेंबळे | | |
| १५. | फोक ऑर्केस्ट्रा | २. दिनेश पोखरकर | द्वितीय | ७०००/- |
| | | ३. अनमोल कांबळे | | |
| १६. | प्रहसन स्किट | १. रोहन गायकवाड | द्वितीय | ७०००/- |
| | | २. तनुजा शिंदे | | |
| | | १. रोहन गायकवाड | | |
| | | २. श्रीनिवास बरीदे | | |
| १७. | मुक अभिनय | ३. मनस्वी कांबळे | तृतीय | ५०००/- |
| | | ४. अर्जुन पवार | | |
| | | ५. अस्मिता ढवळे | | |
| | | ६. सिद्धी गोरे | | |

**दयानंद कला महाविद्यालय, लातूर युवक महोत्सव 'ज्ञानतीर्थ–२०२४'**

**क्रीडा विभाग**

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, 'अ' विभाग व सेंटर झोन स्पर्धांमध्ये**

**विशेष प्राविण्य मिळवलेले संघ व गुणवंत विद्यार्थी**

| अ.क्र. | खेळाडूचे नाव | खेळाचा प्रकार | गुणवंत क्र. | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | मगरकुमार राजु | वेटलिफ्टींग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| २. | दिनडगे शुभम नारायण | वेटलिफ्टींग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| ३. | गुप्ता हेमंत रमेश | वेटलिफ्टींग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| ४. | आडे अक्षता राजाभाऊ | व्हॉलीबॉल (मुली) | सहभाग | ३०००/– |
| ५. | सय्यद बिलालउद्दीन शाबोद्दीन | व्हॉलीबॉल (मुले) | सहभाग | ३०००/– |
| ६. | पाटील ऋषिकेश सुनील | व्हॉलिबॉल (मुले) | सहभाग | ३०००/– |
| ७. | मंठाळे रूद्र नागनाथ | व्हॉलिबॉल (मुले) | सहभाग | ३०००/– |
| ८. | येमले अमर अंगद | मैदानी स्पर्धा (१०० मी.) | सहभाग | ३०००/– |
| ९. | शेवाळे पंकज दयानंद | बॉक्सिंग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| १०. | मडके रोहन संजय | बॉक्सिंग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| ११. | सोळंके अविनाश उद्धव | बॉक्सिंग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| १२. | पडवले अवधुत | बॉक्सिंग (मुले) | सहभाग | ३०००/– |
| १३. | कांबळे हर्षवर्धन पी | क्रिकेट (मुले) | सहभाग | ३०००/– |
| १४. | सुतार श्रेयु राजाराम | बॅडमिंटन (मुली) | सहभाग | ३०००/– |
| १५. | शिंदे वैष्णवी | खो–खो (मुली) | सहभाग | ३०००/– |

## दयानंद कला महाविद्यालय, लातूर
## विद्यापीठ परीक्षेतील महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी

| अ.क्र. | नाव | विद्यापीठ गुणवत्ता यादीतील क्रमांक |
|---|---|---|
| १. | गाडे वैष्णवी मधुकर | बी.ए. तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| २. | कैले मयुरी नामदेव | बी.ए. प्रशासकीय सेवा तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ३. | गुलांगे स्नेहा नागेश | बी.ए. प्रशासकीय सेवा तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| ४. | कोंडमगिरे अश्विन शिवानंद | बी.ए. प्रशासकीय सेवा तृतीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| ५. | हाडोळे ऋतुजा बलभीम | बी.व्होक ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ६. | चौंडे ओंकार राजकुमार | बी.व्होक ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| ७. | जाधव शुभम संजय | बी.ए. ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ८. | गुंडाळे सागर राजकुमार | बी.ए. ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| ९. | जाधव समर्थ संजय | बी.ए. ॲनिमेशन तृतीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| १०. | पवार सायली दत्तात्रय | बी.ए. फॅशन ड्रेस डिझाईन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| ११. | मुळे मानसी चंद्रकांत | बी.ए. फॅशन ड्रेस डिझाईन तृतीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| १२. | पठाण सायमा सालारखा | बी.ए. फॅशन ड्रेस डिझाईन तृतीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| १३. | सावंत सुधीर श्रीकांत | एम.ए. मराठी द्वितीय वर्ष विद्यापीठात सर्वप्रथम |
| १४. | सोनार वैष्णवी गोविंद | एम.ए. मराठी द्वितीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| १५. | खटके सुजाता सुदाम | एम.ए. हिंदी द्वितीय वर्ष विद्यापीठात सर्वप्रथम |
| १६. | लोले सरोजा तानाजी | एम.ए. लोकप्रशासन द्वितीय वर्ष विद्यापीठात सर्वप्रथम |
| १७. | कदम निकिता उत्तमराव | एम.ए. लोकप्रशासन द्वितीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| १८. | कुलकर्णी ऋजा रविंद्र | एम.ए. संगीत द्वितीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| १९. | देव पद्मजा दामोधर | एम.ए. संगीत द्वितीय वर्ष विद्यापीठात तृतीय |
| २०. | कुलकर्णी भाग्यश्री उदयराव | एम.ए फॅशन ड्रेस डिझाईन द्वितीय वर्ष विद्यापीठात प्रथम |
| २१. | आयतनबोने वैष्णवी जोतिराम | एम.ए. फॅशन ड्रेस डिझाईन द्वितीय वर्ष विद्यापीठात द्वितीय |
| २२. | मुसळे संध्या अर्जुन | एम.ए. फॅशन ड्रेस डिझाईन द्वितीय वर्ष विद्यापीठात तृतीय |

## दयानंद कला महाविद्यालय, लातूर
## इ. १२ बोर्ड परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थी

| अ.क्र. | नाव | गुणवत्ता यादीतील क्रमांक | शिष्यवृत्ती रक्कम |
|---|---|---|---|
| १. | कु. शिंदे अस्मिता भास्कर | प्रथम (९४.५०%) | १०,०००/- |
| २. | कु. जोशी ईश्वर अमोद | द्वितीय | ७,०००/- |
| ३. | कु. बस्तापुरे गार्गी संतोष | तृतीय | ५,०००/- |

## शैक्षणिक वर्ष २०२४–२५ मध्ये प्राध्यापकांच्या संशोधन कार्याचा अहवाल

| अ.क्र. | प्राध्यापकाचे नाव | संशोधन पत्रिकेतील लेख | चर्चा सत्रात सादर केलेले लेख | | | | चर्चासत्र अध्यक्ष/ विषय प्रवक्ता | पुस्तकात लेख प्रकाशित | | प्रकाशित पुस्तके | | संशोधक मार्गदर्शक विद्यार्थी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | विद्यापीठ स्तरीय | राज्य स्तरीय | राष्ट्रीय | आंतरराष्ट्रीय | | चर्चासत्र स्मरणिकेत | अन्य पुस्तकात लेख | लेखक | संपादक | एम.फील | पीएच.डी. |
| १. | डॉ. एस. पी. गायकवाड | २ | – | – | १ | – | – | २ | – | – | – | – | – |
| २. | डॉ. ए. बी. जोशी | ६ | – | १ | १ | – | १ | १ | १ | – | – | – | – |
| ३. | डॉ. आर. एस. पारवे | २ | – | – | १ | – | १ | १ | – | – | – | – | – |
| ४. | डॉ. एस. व्ही. साळुंके | – | – | – | – | – | २ | – | – | – | – | – | – |
| ५. | डॉ. एस. पी. सांगोले | २ | – | – | – | – | ३ | – | २ | १ | २ | – | १ |
| ६. | डॉ. पी. एस. सूर्यवंशी | – | – | – | – | – | – | – | – | – | – | २ | १ |
| ७. | डॉ. बी. टी. घुटे | १ | – | – | १ | – | – | १ | – | – | ३ | – | – |
| ८. | डॉ. ए. एन. चव्हाण | – | – | २ | २ | – | १ | – | – | – | – | – | – |
| ९. | डॉ. एस. जी. पाटील | २ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १०. | डॉ. एस. एम. कदम | १ | – | – | २ | – | – | १ | १ | १ | – | – | – |
| ११. | डॉ. एम. एच. खंडागळे | २ | १ | – | – | १ | – | – | १ | – | १ | – | – |
| १२. | डॉ. एन. एन. डोके | – | – | – | – | १ | २ | – | २ | – | – | – | – |
| १३. | डॉ. आर. एम. खंदारे | २ | – | – | – | – | – | २ | – | १ | – | – | – |
| १४. | डॉ. ए. एम. वाघमारे | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – |
| १५. | डॉ. एस. बी. राऊतराव | – | – | – | – | १ | – | – | २ | – | २ | – | – |

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## शिक्षक कर्मचारी वर्ग

### वरिष्ठ विभाग

**प्राचार्य**– डॉ. गायकवाड एस. पी.

**उपप्राचार्य**– डॉ. जोशी ए. बी.

**मराठी विभाग**

डॉ. सांगोले एस. पी.

डॉ. चव्हाण ए. एन.

डॉ. कदम. एस. एम.

**हिंदी विभाग**

डॉ. सूर्यवंशी पी. एस.

**इंग्रजी विभाग**

डॉ. खंडागळे एम. एच.

डॉ. डोके एन. एन.

डॉ. राऊतराव एस. बी.

**अर्थशास्त्र विभाग**

डॉ. घुटे बी. टी.

**लोकप्रशासन विभाग**

डॉ. खंदारे आर. एम.

**तत्त्वज्ञान विभाग**

डॉ. साळुंके एस. व्ही.

**इतिहास विभाग**

डॉ. पारवे आर. एस.

**समाजशास्त्र विभाग**

डॉ. गायकवाड एस. पी.

डॉ. जोशी ए. बी.

**राज्यशास्त्र विभाग**

डॉ. पाटील एस. जी.

**क्रीडा विभाग**

डॉ. ए. एम. वाघमारे

●●●

### कनिष्ठ विभाग

**उपप्राचार्य** डॉ. नागरगोजे डी. एन.

**पर्यवेक्षक** डॉ. दीक्षित पी. बी.

मराठी विभाग

श्री. दशरथ ननवरे

**इंग्रजी विभाग**

प्रा. भालेराव ए. डी.

प्रा. गवरे मनोज

प्रा. भुरे अनिल

**हिंदी विभाग**

डॉ. बाहेती जी. वाय.

प्रा. सूर्यवंशी एस. ए.

प्रा. भालेराव सिद्धार्थ

**राज्यशास्त्र विभाग**

डॉ. गाडवे सुधीर

**अर्थशास्त्र विभाग**

प्रा. जोशी. डी. एम.

प्रा. क्षीरसागर एस. के.

**तत्त्वज्ञान विभाग**

डॉ. नागरगोजे डी. एन.

**इतिहास विभाग**

प्रा. कोमटवाड व्ही.डी.

प्रा. बनसोडे ए. ए.

**समाजशास्त्र विभाग**

प्रा. कोटे एस.एन.

प्रा. बुद्रुके जे. आर.

**क्रीडा विभाग**

डॉ. दीक्षित पी. बी.

**भूगोल विभाग**

डॉ. शिरूरे डी. एस.

**संगीत विभाग**

डॉ. कुलकर्णी डी. बी.

डॉ. जगदाळे एस. जी.

**संस्कृत विभाग**

प्रा. सुवर्णा कारंजे

●●●

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## अनुदानित, विनाअनुदानित प्रशासकीय कर्मचारी

### अनुदानित प्रशासकीय कर्मचारी

| | |
|---|---|
| श्री. व्यास एस. आर. | अधीक्षक |
| श्री. देशपांडे व्ही. आर. | मुख्य लिपीक |
| श्री. आडसूळ बी. एस. | कनिष्ठ लघुलेखक |
| श्री. वाजपाई एम. एस. | वरिष्ठ लिपीक |
| श्री. ढोले पी. व्ही. | वरिष्ठ लिपीक |
| श्री. जोशी एस. व्ही. | कनिष्ठ लिपीक |
| श्री. खोगरे व्ही. बी. | कनिष्ठ लिपीक |
| श्री. शिंदे आर. बी. | कनिष्ठ लिपीक |
| श्रीमती सुरवसे ए. ए. | कनिष्ठ लिपीक |
| श्री. ठाकूर व्ही. आय. | ग्रंथालय परिचर |
| श्रीमती दहिरे एन. आर. | ग्रंथालय परिचर |
| श्री. गिरबने डी. एम. | ग्रंथालय परिचर |
| श्री. गायकवाड एम. एस. | ग्रंथालय परिचर |
| श्रीमती आदमाने सी. एम. | सेवक |
| श्री. बैनबोने जी. व्ही. | सेवक |
| श्री. मुगळे पी. व्ही. | सेवक |
| श्रीमती जाधव आर. आर. | सेवक |
| श्रीमती सोनवणे एम. एम. | सेवक |

### विनाअनुदानित प्रशासकीय कर्मचारी

| | |
|---|---|
| श्री. इंडे डी. पी. | लिपिक |
| श्री. प्रयाग एच. डी. | लिपिक |
| श्री. वांगस्कर एस. एस. | लिपिक |
| श्री. सूर्यवंशी टी. व्ही. | लिपिक |
| कु.. सांडूर आर. बी. | लिपिक |
| श्री. अतनुरे डी. एम. | लिपिक |
| कु. शिंदे बी. एल. | लिपिक |
| श्री. उटगे ए. एम. | लिपिक |
| श्री. वाघमारे एन. पी. | कॉम्प्युटर ऑपरेटर |
| श्री. भालेराव आर. व्ही. | लिपिक |
| श्रीमती स्वामी सोनाली | लिपिक |
| श्री. अकनगिरे पी. आर. | लिपीक |
| श्रीमती धर्माधिकारी अंजली | लिपीक |
| श्री. गायकवाड एस. आर. | लिपीक |
| श्री. पुजारी जी. के. | ग्रंथालय परिचर |
| श्री. शिंदे एच. एस. | प्र. परिचर |
| श्री. भोसले ए. ए. | प्र. परिचर |
| श्री. कोरे डी. जी. | सेवक |
| श्री. लागले एन. एम. | सेवक |
| श्रीमती आदमाने ए. एस. | सेवक |
| श्री. सूर्यवंशी एन. ए. | सेवक |
| श्री. आदमाने ए. बी. | सेवक |
| श्री. चौंडे डी. एस. | सेवक |
| श्रीमती मोरे एस. डी. | सेवक |
| श्री. गोदाम पी. बी. | सेवक |
| श्री. आदमाने एस. बी. | सेवक |
| श्रीमती शेंद्रे यु. डी. | सेवक |
| श्री. धडे के. एस. | सेवक |
| श्री. बचाटे ए. डी. | सेवक |
| श्री. उटगे एस. जी. | सेवक |
| श्रीमती धावारे एस. आर. | सेवक |

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

## अनुदानित व विनाअनुदानित कंत्राटी तत्वावरील प्राध्यापक २०२४-२५

**ॲनिमेशन विभाग**

प्रा.डॉ. शर्मा डी. एस.
प्रा. काकडे एस. व्ही.
प्रा. शेख आय. ए.
प्रा. पतंगे एस. पी.
प्रा. खोंडे पुजा
प्रा. साळुंके एन. एस.

**फॅशन विभाग**

प्रा. लवंद एस. बी.
प्रा. पिपडा एच. एम.
प्रा. देशमुख पी. के.
प्रा. निलावार डी. एस.
प्रा. बिराजदार पी. व्ही.
प्रा. नाईक आर. जी.
प्रा. आग्रे एम. ए.
प्रा. कुलकर्णी बी. व्ही.
प्रा. कोरे एस. के.

**संगीत विभाग**

प्रा. पाडे शरद
प्रा. पवार सोमनाथ

**ग्रंथालय विभाग**

डॉ. पसारकर एस. सी. ग्रंथपाल

**ॲडमिनिस्ट्रेटिव विभाग**

प्रा. यशवंत जगताप
प्रा. महेश मोरे
प्रा. मनोज तावडे
प्रा. उत्तम दुधभाते
प्रा. गोविंद जाधव
प्रा. सुरज ठोंबरे
प्रा. सुमीत स्वामी

## अनुदानित व विनाअनुदानित घड्याळी तासिका तत्वावरील प्राध्यापक २०२४-२५

**मराठी विभाग**

प्रा. मोरे राजकुमार
प्रा. भुरे अंगद श्रीपती
प्रा.डॉ. गिराम विद्या
प्रा.डॉ. वाघमारे स्नेहा

**हिंदी विभाग**

डॉ. फड पी. ए.
डॉ. सुरकुटे एस.आर.
डॉ. आग्रे व्ही. के.
डॉ. शेंडगे एस. व्ही.
डॉ. सिरसट एम. व्ही.
डॉ. घुमे एम. बी.
प्रा. कांबळे वर्षा

**नाट्यशास्त्र विभाग**

प्रा. विजय मस्के

**भूगोल विभाग**

श्रीमती यादव एस.सी.
प्रा. शिंदे पल्लवी पी.
डॉ. बिराजदार अश्लेषा बी.

**इंग्रजी विभाग**

प्रा. पुजा मेडे
प्रा. तोडकर क्रांती
प्रा. स्वामी एस. एस.

**अर्थशास्त्र विभाग**

प्रा. पाठक स्वप्नजा

**इतिहास विभाग**

प्रा. आल्टे मनिषा

**राज्यशास्त्र विभाग**

प्रा. घायाळ गजानन

**लोकप्रशासन विभाग**

प्रा. समुद्रे एस. एस.
प्रा. धायगुडे ए. ए.
प्रा. चैतन्य शिंदे

**समाजशास्त्र विभाग**

प्रा.डॉ. आदमाने बी. बी.

**फॅशन व ॲनिमेशन इंग्रजी विभाग**

प्रा. सविता कोत्तावार




मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनात मार्गदर्शन करताना मा. आ. अमितभैय्या देशमुख.
यावेळी लंडन येथून ऑनलाईन उपस्थित अधिवेशनाचे उद्घाटक हाऊस ऑफ लॉर्डसचे मेंबर तथा
लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिचे प्रोफेसर पद्‌भूषण लॉर्ड मेघनाथजी देसाई.



मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाच्या समारोप समारंभास मार्गदर्शन करताना
मा. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर. व्यासपीठावर संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी, म.अ.प. अध्यक्ष डॉ. अनिलकुमार वावरे,
डॉ. लक्ष्मण पाटील, डॉ. के. के. पाटील, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, स्थानिक कार्यवाह व
विभागप्रमुख डॉ. बालाजी घुटे, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य.



मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून संबोधित करताना संस्थाध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी. व्यासपीठावर मा.आ. अमितभैय्या देशमुख, सचिव रमेशजी बियाणी, म.अ.प. अध्यक्ष डॉ. अनिलकुमार वावरे, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, स्थानिक कार्यवाह व विभागप्रमुख डॉ. बालाजी घुटे, परिषदेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य.




मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४७ व्या वार्षिक राष्ट्रीय अधिवेशनाच्या समारोप समारंभास मार्गदर्शन करताना दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव रमेशजी बियाणी. व्यासपीठावर मा. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, म.अ.प. अध्यक्ष डॉ. अनिलकुमार वावरे, डॉ. लक्ष्मण पाटील, डॉ. के. के. पाटील, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्या डॉ. अंजली जोशी, स्थानिक कार्यवाह व विभागप्रमुख डॉ. बालाजी घुटे, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, परिषदेचे पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य.

Shree, Ltr.-9637117601